60 YEARS OF ENLIGHTENMENT THROUGH EDUCATION

नवीन पाठ्यपुस्तकावर आधारित

# समाजशास्त्र

# नवनीत

## इयत्ता बारावी

नवनीत मार्गदर्शक म्हणजे → सुनियोजित अभ्यास, उज्ज्वल यश हमखास



NAVNEET®

नवीन पाठ्यपुस्तकावर आधारित

# समाजशास्त्र

# नवनीत

## इयत्ता बारावी

● **ठळक वैशिष्ट्ये :**

१. प्रत्येक प्रकरणाची अध्ययन-घटकनिहाय रचना.

२. प्रत्येक प्रकरणाच्या सुरुवातीला सर्वसमावेशक 'महत्त्वाचे मुद्दे'.

३. संपूर्ण अभ्यासक्रमाचा प्रश्नोत्तररूपात समावेश.

४. वस्तुनिष्ठ, लघूत्तरी व दीर्घोत्तरी अशा सर्व प्रकारच्या प्रश्नांची सुबोध भाषेत अचूक, मुद्देसूद व आदर्श उत्तरे.

५. संपूर्ण, प्रमाणभूत आणि अद्ययावत माहिती.

६. प्रत्येक पाठातील उपयोजनात्मक प्रश्नांचा उत्तरांसह समावेश.

**नवनीत मार्गदर्शक म्हणजे** → **सुनियोजित अभ्यास, उज्ज्वल यश हमखास**

: लेखक :

**श्री. नवनीत**

नवीन आवृत्ती : २०२०

Balbharati Registration No. 2018MH0014

E0358

नवनीत एज्युकेशन लिमिटेड

## नवनीत – शैक्षणिक क्षेत्रातील देदीप्यमान यशाची ६० वर्षे!

सन १९५९ मध्ये रुजवलेल्या **नवनीत एज्युकेशन लिमिटेड** या रोपट्याचे आता ६० व्या वर्षी डेरेदार वृक्षात रूपांतर झाले आहे. तब्बल साठ वर्षांच्या या यशस्वी वाटचालीत **नवनीत**ने प्रकाशन आणि स्टेशनरी व्यवसायात भारतातच नव्हे, तर परदेशांतही अढळ स्थान मिळवले आहे. शैक्षणिक पुस्तके, वह्या, स्टेशनरी आणि पुढे जाऊन काळानुरूप ई-लर्निंग क्षेत्रामध्येही नवनीतने चांगलाच जम बसवला आहे. 'शैक्षणिक क्षेत्रात योगदान देणारी परिपूर्ण संस्था' हे अभिमानाचे बिरुद मिरवत षष्ट्यब्दिपूर्ती आनंदाने साजरी करताना आम्ही कृतकृत्य आहोत.

असं म्हणतात की, गुणवत्ता हा अपघात नसून ती बुद्धिमान व्यक्तींच्या प्रयत्नांची फलश्रुती असते. नवनीतच्या गुणवत्तेचे श्रेयही निर्विवादपणे नवनीतच्या संस्थापकांचे आहे. त्यांनी दिलेल्या ध्येयधोरणांशी बांधील राहून, त्यांचा वारसा पुढे चालवण्याचे प्रामाणिक प्रयत्न आम्ही करीत आहोत.

सुजाण आणि दक्ष विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, शैक्षणिक संस्था आणि शैक्षणिक साहित्य विक्रेते ही आमची खरी ताकद आहे. त्यांचा गुणवत्तेविषयीचा आग्रही दृष्टिकोन आम्हांला अतिशय मोलाचा वाटतो. त्यांचे सहकार्य आणि सदिच्छा घेऊनच आम्ही यशाचे अधिक उच्चांक प्रस्थापित करू इच्छितो.

'उत्तम गुणवत्तेची खात्री म्हणजे नवनीत,' असा नवनीतचा ठसा उमटवण्यात आमच्या ६० वर्षांच्या या प्रदीर्घ वाटचालीत आमचे सर्व हितचिंतक आणि कर्मचारीवृंद या सर्वांचे योगदान अमूल्य आहे. म्हणूनच आम्ही या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करतो.

**– नवनीत एज्युकेशन लिमिटेड**


**नवनीत एज्युकेशन लिमिटेड**

**मुंबई :** नवनीत भवन, भवानीशंकर रोड, दादर (प.), **मुंबई–४०० ०२८.** (फोन : ६६६२ ६५६५)

www.navneet.com • **e-mail :** publications@navneet.com

**पुणे :** नवनीत भवन, १३०२, शुक्रवार पेठ, बाजीराव रोड, सणस प्लाझाजवळ, **पुणे–४११ ००२.** (फोन : २४४३ १००७)

**नागपूर :** ६३, शिवाजी सायन्स कॉलेजसमोर, काँग्रेसनगर, **नागपूर – ४४० ०१२.** (फोन : २४२ १५२२)

**नाशिक :** निर्माण इन्स्पायर, दुसरा मजला, कान्हेरे वाडी, जुन्या सीबीएसच्या समोर, **नाशिक–४२२ ००१.** (फोन : २५९ ६९५०)



**© All rights reserved. No part of this book may be copied, adapted, abridged or translated, stored in any retrieval system, computer system, photographic or other system or transmitted in any form or by any means without a prior written permission of the copyright holders, M/s. Navneet Education Limited.** ***Any breach will entail legal action and prosecution without further notice.***



**Published by :** Navneet Education Limited, Dantali, Gujarat.

**Printed by :** Navneet Education Limited, Dantali, Gujarat.

2001
CTP
(29-6-2020)

# मनोगत

बोर्डाने निर्धारित केलेला नवीन अभ्यासक्रम आणि त्यावर आधारित नवीन पाठ्यपुस्तकाचा सखोल अभ्यास करून **'समाजशास्त्र नवनीत : इयत्ता बारावी'** प्रकाशित करताना आम्हांला आनंद होत आहे.

**इयत्ता बारावीचा अभ्यासक्रम भारतीय समाजशास्त्रावर आधारित आहे.** त्यात भारतीय समाजाची जडणघडण, भारतीय समाजाचे वर्गीकरण, भारतीय समाजातील विविधता आणि एकता, भारतातील सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया, भारतातील सामाजिक चळवळी आणि भारतातील सामाजिक समस्या या घटकांचा समावेश करण्यात आला आहे. त्यातून आपण भारतीय असण्याचा अर्थ, भारतीय समाजावर प्रभाव टाकणारे घटक, भारतीय समाजातील आदिवासी, ग्रामीण आणि नागरी समुदायांचे स्वरूप व त्यांच्या समस्या यांचे अध्ययन करणे अपेक्षित आहे. भारतातील सामाजिक परिवर्तन, सामाजिक चळवळी, राष्ट्रीय एकात्मतेसमोर असलेली आव्हाने आणि भारतीय समाजाला भेडसावणाऱ्या समस्यांचे अध्ययन आपण करणार आहात. अध्यापन–अध्ययनाची ही प्रक्रिया अर्थपूर्ण व्हावी या उद्देशाने या मार्गदर्शकाची रचना करण्यात आली आहे.

या मार्गदर्शकातील प्रत्येक प्रकरणात सुरुवातीला महत्त्वाच्या मुद्द्यांचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. त्यावरून त्या त्या प्रकरणात समाविष्ट असलेल्या पाठ्यवस्तूच्या आशयाचे विद्यार्थ्यांना सहज आकलन होईल. अभ्यासाची उजळणी करण्यासाठी सारांशरूपाने देण्यात आलेले महत्त्वाचे मुद्दे विद्यार्थ्यांना खूपच उपयोगी ठरतील.

प्रस्तुत मार्गदर्शकात वस्तुनिष्ठ, लघूत्तरी व दीर्घोत्तरी अशा सर्व प्रकारच्या प्रश्नांचा समावेश केलेला असून, त्यांची सुबोध भाषेत मुद्देसूद, समर्पक व आदर्श उत्तरे देण्यात आली आहेत. अभ्यासक्रमात आणि पाठ्यपुस्तकात नव्याने समाविष्ट केलेल्या उपयोजनात्मक प्रश्न व त्या प्रश्नांची समर्पक उत्तरे यांचा प्रत्येक प्रकरणात समावेश करण्यात आला आहे.

या मार्गदर्शकाच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांची **'समाजशास्त्र'** या विषयाची परिपूर्ण तयारी होईल आणि त्यांना बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेत उज्ज्वल यश मिळेल, असा दृढ विश्वास आम्हांला वाटतो.

या मार्गदर्शकाची उपयुक्तता वाढवण्याच्या दृष्टीने येणाऱ्या सर्व सूचना स्वागतार्ह आहेत.

**– प्रकाशक**

# अनुक्रमणिका

**विभाग – १**


| | पृष्ठ क्र. |
|---|---|
| १. भारतीय समाजाचा परिचय | ... ५ |
| २. भारतीय समाजाचे वर्गीकरण | ... २५ |
| ३. भारतीय समाजातील विविधता आणि एकता | ... ४६ |
| ४. भारतातील समाज परिवर्तनाच्या प्रक्रिया | ... ६५ |
| ५. भारतातील सामाजिक चळवळी | ... ७९ |
| ६. भारतातील सामाजिक समस्या | ... ९६ |


**विभाग – २**


उतारे ... ११४


NAVNEET ®

# १ भारतीय समाजाचा परिचय

**अध्ययनघटक :**
१.१ प्राचीन आणि मध्ययुगीन भारत
१.२ वसाहतकालीन भारत
१.३ स्वातंत्र्योत्तर काळातील भारत.

## महत्त्वाचे मुद्दे

**• प्रास्ताविक :**

(१) समाजशास्त्राचा उदय १९ व्या शतकाच्या मध्यावधीस युरोपात झाला, तर भारतीय संस्कृतीचा उगम सुमारे ४००० वर्षांपूर्वी झाला. प्राचीन काळातील समाजजीवन समजून घेण्याचे प्रमुख स्रोत म्हणजे पुरातत्त्वज्ञ आणि इतिहास संशोधकांनी शोधून काढलेल्या 'पुरातनवस्तू', घटनेच्या प्रत्यक्षदर्शींनी केलेल्या नोंदी, चरित्रग्रंथ, साहित्य, कोरलेल्या किंवा लिखित राजाज्ञा, दरबारी दप्तरे इत्यादी लिखित पुरावे.

(२) पुरातनवस्तू म्हणजे हत्यारे आणि अवजारे, भांडी, दागिने, कलावस्तू, शिल्पे, उत्खनित वस्तू, चित्रे, दफनस्थळे आणि समाधीस्थळे, नाणी, शस्त्रास्त्रे इत्यादी मानवनिर्मित वस्तू.

(३) मानवी अस्थी, प्राण्यांची हाडे आणि जीवाश्म प्राचीन संस्कृतीवर प्रकाश टाकतात.

(४) आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे प्राचीन अवशेषांचे वय आणि अन्य गुणधर्मांचे विश्लेषण करता येते आणि प्राचीन संस्कृतीचे आकलन करता येते.

### १.१ प्राचीन आणि मध्ययुगीन भारत :

• प्राचीन आणि मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचे प्रमुख कालखंड पुढीलप्रमाणे आहेत :

**प्राचीन आणि मध्ययुगीन भारताची कालरेषा**

| हडप्पा संस्कृती | वेदकालीन भारत | दुसरे नागरीकरण |
|---|---|---|
| इ.स.पू. २६००–१५०० | इ.स.पू. १५००–५०० | इ.स.पू. ५००–२०० |

| अभिजात काळ | मध्ययुगीन भारत |
|---|---|
| इ.स.पू. २००–इ.स. ६५० | इ.स.६५०–१५०० |

प्राचीन आणि मध्ययुगीन समाजाचे अध्ययन पुढील बाबींच्या आधारे करण्यात आले आहे :

(अ) धार्मिक श्रद्धाप्रणाली आणि आचार नियम (प्राचीन कालखंड)
(ब) भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान
(क) शिक्षणपद्धती
(ड) कला
(ई) समाजजीवन
(फ) नागरीकरण.

**(अ) धार्मिक श्रद्धाप्रणाली आणि आचार-नियम (प्राचीन कालखंड) :**

(१) प्राचीन धार्मिक श्रद्धाप्रणाली आणि आचार-नियमांविषयी उपलब्ध साहित्य गुंतागुंतीचे आहे. कारण त्याविषयी निश्चित पुरावे उपलब्ध नाहीत.

(२) **हडप्पा संस्कृतीच्या** उत्खननात मिळालेल्या स्त्री आणि पुरुषांच्या मातीच्या मूर्त्या देवी-देवतांच्या असाव्यात असे समजले जाते. मात्र त्या काळात मूर्तिपूजा अस्तित्वात असल्याचे निश्चित पुरावे उपलब्ध नाहीत.

(३) **वैदिक संस्कृतीत** नैसर्गिक घटकांना देवतास्वरूप मानून त्यांना इंद्र, अग्नी, वायू इत्यादी देवता समजून त्यांना महत्त्व प्राप्त झाले.

**जाणून घ्या :**

**मानवशास्त्र :** युरोपीय नसलेल्या विदेशी समाज आणि संस्कृतींच्या अभ्यासाची गरज निर्माण झाल्यामुळे वसाहतकाळा-मध्ये मानवशास्त्राचा उदय झाला. मानवशास्त्र हे भौतिक/शारीरिक मानवशास्त्र व सामाजिक/सांस्कृतिक मानवशास्त्र अशा दोन विस्तृत शाखांमध्ये विभागले गेले आहे.

वसाहतिक अभ्यासाचा भाग म्हणून मानवशास्त्राचे टीकाकार एडवर्ड सैद यांनी 'प्राच्यविद्याशाखे'चा अभ्यास केला.

(४) **वैदिक – हिंदू धर्मातील** श्रद्धाप्रणाली आणि आचारविषयक नियमांची माहिती वेदसंहिता, उपवेद, वेदांगे, ब्राह्मणग्रंथ, आरण्यके, पुराणे, धर्मशास्त्र आणि रामायण व महाभारतांसारख्या महाकाव्यांत प्राप्त होते.

(५) वैदिक धर्मातील आचारविषयक नियम कर्मसिद्धांतावर आधारित आहेत. त्यात चार पुरुषार्थ (उद्दिष्टांचा) समावेश आहे.

**चार पुरुषार्थ :**

| धर्म | अर्थ |
|---|---|
| • फलाची आशा न धरता निरपेक्ष वृत्तीने विहित कर्मे करीत राहणे. | • विहित मार्गाने संपत्ती मिळवणे. |
| **काम** | **मोक्ष** |
| • विहित मार्गाने शारीरिक सुखांची आणि आनंदाची प्राप्ती करून घेणे. | • जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून सुटका मिळवण्याचे आयुष्यातील परमोच्च ध्येय. |

(६) **पूर्व वैदिक कालखंडात** समाजात व्यवसायाधिष्ठित चार वर्ण – ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अस्तित्वात असले, तरी वर्णव्यवस्था लवचीक होती.

(७) **उत्तर वैदिक कालखंडात** वर्णपद्धती ताठर होऊन जन्मावर आधारित जातिव्यवस्था निर्माण झाली. या व्यवस्थेवर पुरोहित-वर्गाचे वर्चस्व प्रस्थापित झाल्याने 'पवित्र-अपवित्र' या कल्पनांवर आधारित जातींची उतरंड प्रस्थापित झाली. जातिअंतर्गत विवाहाची सक्ती, धार्मिक आचारविधींना प्रमाणाबाहेर महत्त्व आणि जाति-जातींतील सीमा अत्यंत ताठर होत गेल्या.

**जाणून घ्या :**

भारतीय तत्त्वज्ञानातील षड्दर्शनांपैकी जैन आणि बौद्ध दर्शने यांना 'नास्तिक' (म्हणजे ईश्वराचे अस्तित्व अमान्य करणारी) असे म्हटले जाते. उरलेल्या दर्शनांमधील 'चार्वाक दर्शन' तसेच 'आजीविका' या पंथांचा अपवाद वगळता भारतीय दर्शने आणि पंथ 'आस्तिक' (म्हणजे ईश्वराचे अस्तित्व मान्य करणारी) आहेत.

चार्वाक दर्शन आणि आजीविका पंथ हेही भारतीय तत्त्वज्ञानाच्या परंपरेचा भाग आहेत. चार्वाकाचे तत्त्वज्ञान हे निरीश्वरवादी आणि ऐहिक विचारसरणीच्या पायावर आधारलेले आहे. आजीवक पंथाचा उगम दैववाद आणि तापसी जीवनपद्धती यांतून झालेला आहे.

(८) **वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध** यांनी वेदप्रामाण्याला आणि पुरोहितांच्या वर्चस्वाला विरोध करणाऱ्या तत्त्वज्ञानाची शिकवण लोकांना दिली. यज्ञविधी, पशुबळी आणि जातिनिष्ठ सामाजिक उतरंड या गोष्टींना विरोध केला. म्हणून त्यांनी पुरस्कृत केलेले जैन व बौद्ध हे धर्म 'बंडखोर धर्म' समजले गेले.

(९) **जैन धर्माच्या** परंपरेतील २४ तीर्थंकरांपैकी वर्धमान महावीर हे २४ वे तीर्थंकर होत. जैन तत्त्वप्रणालीत कर्मसिद्धांताला स्वीकृती होती. 'अहिंसा' आणि 'तपस' या तत्त्वांना सर्वाधिक महत्त्व देण्यात आले. 'देव' या संकल्पनेऐवजी महावीरांनी 'निर्वाण' या तत्त्वावर भर दिला. त्यांनी आपला उपदेश अर्धमागधी या लोकभाषेत केला. कालांतराने श्वेतांबर आणि दिगंबर हे जैन धर्माचे दोन पंथ अस्तित्वात आले.

(१०) **बौद्ध धर्म** हा गौतम बुद्धांनी प्रतिपादित केलेल्या 'चार आर्यसत्ये' आणि 'अष्टांग मार्गावर' आधारित 'मध्यम मार्ग' यांवर आधारित आहे. बौद्ध धर्माचे हे नियम, जैन धर्माच्या तुलनेत, सौम्य असल्याने आणि गौतम बुद्धांनी आपला उपदेश पाली या लोकभाषेत केल्याने सर्वसामान्य लोक त्याकडे आकृष्ट झाले. धर्मप्रसारासाठी 'भिक्खू संघा'ची स्थापना करण्यात आली. मौर्य सम्राट अशोकाच्या आश्रयामुळे बौद्ध धर्माचा प्रसार भारताबाहेर श्रीलंका, म्यानमार, चीन, तिबेट, मंगोलिया, जावा, सुमात्रा इत्यादी देशांमध्ये झाला.

### (ब) धार्मिक प्रणाली (मध्ययुग) :

(१) **पारशी धर्माचा** उगम मध्य-पूर्व आशियात झाला होता. धार्मिक छळाला कंटाळून त्यांनी भारतात स्थलांतर केले. गुजरातमध्ये या धर्माचे अनुयायी स्थिरावले.

**पारशी धर्म :** हा जगातील प्राचीन धर्मांपैकी एक आणि आजतागायत टिकून राहिलेला धर्म आहे. चांगले आणि वाईट अशा ध्रुवीय संकल्पना या धर्माच्या मध्यवर्ती आहेत. (उदाहरणार्थ, स्वर्ग आणि नरक). 'अवेस्ता' हा या धर्माचा पवित्र ग्रंथ आहे. त्यामध्ये 'अहुर मज्द' हा विश्वाचा निर्माता असून 'आशा' म्हणजे वैश्विक सत्याचा उगम त्याच्यापासून होतो, असे म्हटलेले आहे. अग्नी आणि जल ही दोन तत्त्वे 'शुद्धते'ची माध्यमे आहेत. 'अग्यारी' म्हणजे अग्निमंदिर हे पारशी धर्माचे पूजास्थान असते. इराणहून गुजरातमधील नवसारी येथे येताना पारशी पुरोहितांनी स्वतःबरोबर पवित्र अग्नी आणला (इ.स. ९ वे शतक).

स्वतःची मूळ सांस्कृतिक ओळख हरवू न देता, संख्याबळ उत्तरोत्तर कमी होत असतानाही, पारशी समाजाने भारतीय जनजीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये

महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. दादाभाई नौरोजी, फिरोजशाह मेहता, फिल्ड मार्शल सॅम माणेकशॉ, माएस्ट्रो झुबीन मेहता ही पारशी समाजातील काही प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वे आहेत. तसेच भारतातील आधुनिक उद्योगांची उभारणी करण्यात टाटा, गोदरेज आणि वाडिया या पारशी कुटुंबांची कामगिरी फार मोलाची आहे. भारताला आण्विक सत्ता म्हणून ओळख मिळवून देण्यात डॉ. होमी भाभा यांचा सहभाग महत्त्वाचा होता. नानी पालखीवाला, सोली सोराबजी आणि फली नरिमन यांच्यासारख्या सुप्रसिद्ध कायदेपंडितांनी भारतीय समाजाला कायद्याची ओळख करून दिली.

(२) **ज्यू धर्माचे** अनुयायी राजा सॉलोमन याच्याबरोबर व्यापारासाठी भारतात आले. कोचीमधील ज्या लोकांनी ज्यू धर्माचा स्वीकार केला, त्यांना 'कोची ज्यू'; तर मुंबईत स्थायिक झालेल्या अनुयायांना 'बेने इस्त्राईल ज्यू' असे म्हणतात. ज्यूधर्मीय 'तोरा' या धर्मग्रंथातील नियमांचे पालन करतात. सिनेगॉग त्यांचे प्रार्थनास्थळ आहे. हा एकेश्वरवादी धर्म आहे.

(३) **ख्रिस्ती धर्माचे** संस्थापक येशू ख्रिस्त आहेत. इसवी सनाच्या पहिल्या शतकात येशू ख्रिस्त यांचे शिष्य सेंट थॉमस मलबारच्या किनाऱ्यावर ख्रिस्ती धर्म घेऊन आले. सेंट थॉमसच्या मलबारमधील स्थानिक अनुयायांना 'सिरियन ख्रिश्चन' असे म्हणतात. ख्रिस्ती धर्म एकेश्वरवादी असून, जीवनविषयक त्याचा दृष्टिकोन एकरेषीय आहे.

(४) भारतामध्ये **इस्लामचे** आगमन इसवी सनाच्या ६ व्या शतकात झाले असले तरी त्याचा प्रभाव ठळकपणे दृश्यमान होण्यास बराच अवधी जावा लागला. इस्लाम हा धर्मही एकेश्वरवादी आहे आणि 'पवित्र कुराण' हा ग्रंथ इस्लामच्या श्रद्धाप्रणालीचा स्रोत आहे.

(५) अकबर बादशहाने इसवी सन १५७९ मध्ये नैतिक तर्कवादाच्या आधारावर '**दिन-ई-इलाही**' या नवीन धर्माची स्थापना केली. तसेच सर्व धर्मांच्या तत्त्वज्ञानाचे मंथन करून त्यातून पुढे आलेल्या 'वैश्विक सहिष्णुता' या तत्त्वाच्या आधारावर अकबर बादशहाने या धर्माची उभारणी केलेली होती. या धर्मपद्धतीमध्ये पुरोहित-धर्मगुरू, धार्मिक विधी, श्रद्धाप्रणाली आणि धर्मग्रंथ यांपैकी काही नव्हते. विविध पवित्र ग्रंथांतील शिकवणीचे सार या धर्मामध्ये होते.

(६) गुरू नानक यांनी १५व्या शतकात **शीख धर्माची** स्थापना केली. समतेच्या तत्त्वावर आधारित या धर्मात उच्चनीचतेला स्थान नाही. शीखांच्या दहा गुरूंनी केलेला उपदेश हा शीख धर्मीयांच्या श्रद्धाप्रणालीचा पाया आहे. 'श्रीगुरुग्रंथसाहिब' हा त्यांचा पवित्र ग्रंथ आहे.




**शीख धर्मातील पंचकार**

(७) भक्तितत्त्वाला प्राधान्य देणाऱ्या **भक्ती चळवळीचा** उदय भारतात १५ व्या शतकात झाला. भारतीय समाजातील सर्व जातींमधील आणि स्तरांमधील लोकांना सामावून घेणारे भक्तिपंथ भारतातील विविध प्रदेशांमध्ये उदयाला आले. कीर्तन आणि अखंड नामस्मरण यांना भक्तिपंथांमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. भक्तितत्त्वावर भर देणारा इस्लाममधील सुफीपंथही याच काळात उदयाला आला. संत कबीर आणि रहीम यांनी विधी, अंधश्रद्धेवर आधारलेल्या प्रथा, मूर्तिपूजा आणि तीर्थयात्रा यांसारख्या धार्मिक बाह्योपचारांचा निषेध केला. गुरू नानक यांनी जातिव्यवस्था, धार्मिक विधी आणि मूर्तिपूजा इत्यादींना मनाई केली.

**महाराष्ट्रातील भक्ती चळवळ :** महाराष्ट्रामध्ये भक्ती-चळवळीचा उगम इसवी सनाच्या १३व्या शतकात संत ज्ञानेश्वरांच्या



काळात झाला. पंढरपूरचा विठोबा हे दैवत या चळवळीचा केंद्रबिंदू होते. संत नामदेव (इ.स. १२७०–१३५०) हे संत ज्ञानेश्वरांचे समकालीन होते. त्यांनी उपवास तीर्थयात्रा आणि इतर सर्व प्रकारचा धार्मिक बाह्योपचारांवर टीका केली.

## (क) भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान :

पूर्व वैदिक काळात स्त्रियांचे सामाजिक स्थान तुलनेने अधिक उच्च दर्जाचे होते. उत्तर वैदिक काळात समाजावर जातिव्यवस्था आणि पुरोहितवर्गाचे वर्चस्व खोलवर रुजल्याने स्त्रियांचा दर्जा खालावत गेला. मध्ययुगात स्त्रियांचे स्थान अधिक घसरणीस लागले.

**(ड) शिक्षणपद्धती :**

वैदिक काळात गुरुकुलात राहून संस्कृत भाषेतील वैदिक साहित्य मौखिक पठण पद्धतीने आकलन केले जात असे. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य वर्णांतील अध्ययनार्थ्यांना त्यांच्या वर्णाच्या व्यवसायास अनुरूप असे शिक्षण दिले जात असे. जैन आणि बौद्ध हे धर्म समतेच्या तत्त्वावर आधारित असल्याने साधूंच्या बरोबरच साध्वींना, देखील धार्मिक शिक्षण दिले जात असे.

मध्ययुगात इस्लामच्या शिक्षणपद्धतीला महत्त्व प्राप्त झाले. इस्लामिक शिक्षण मक्ताब, मदरसा आणि खानक्वामध्ये दिले जात असे.

**(ई) कला :**

गुप्त साम्राज्याच्या कालखंड हा भारतीय इतिहासातील सुवर्णयुग होता. इस्लामी राज्यकर्ते आणि धनिकांच्या आश्रयाने मध्ययुगात कलांची जोपासना झाली.

**(फ) समाजजीवन :**

हडप्पा संस्कृतीत कौशल्यावर आधारित वर्ग समाजात होते. पूर्व वैदिक कालखंडात व्यवसायाधिष्ठित वर्णव्यवस्था होती. उत्तर वैदिक कालखंडात वर्णव्यवस्थेचे जातिव्यवस्थेत परिवर्तन झाले. उच्च-नीच भेदभाव तीव्र झाला. सुलतानशाही राजवटीतही अधिकारांची उतरंड होती.

**(य) नागरीकरण :**

आधुनिक औद्योगिकीकरणाचा मागमूस नसतानाही हडप्पा संस्कृतीत पूर्वनियोजित नगरे अस्तित्वात होती. इ.स.पू. ५०० ते इ.स.पू. २०० या कालखंडात दुसरे नागरीकरण घडून आले.

## १.२ वसाहतकालीन भारत :

(१) सर्वसाधारण भारतातील वसाहत कालखंड या भागात युरोपियन देशांनी सत्ता प्रस्थापित करण्याचा कालखंड समजला जातो.

(२) १६व्या शतकात व्यापाराच्या उद्देशाने पोर्तुगीज भारतात आले. सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात डच आणि ब्रिटिशही भारताच्या किनाऱ्यावर उतरले. फ्रेंचसुद्धा भारतात पोहोचले. ब्रिटिशांनी विसाव्या शतकापर्यंत भारतावर राज्य केले.

(३) ब्रिटिश सत्तेचा भारतीय समाजावरील परिणाम पुढीलप्रमाणे :

(i) पाश्चात्त्य शिक्षणपद्धती

(ii) पाश्चिमात्यीकरण

(iii) प्रशासकीय यंत्रणेची निर्मिती

(iv) औद्योगिक वाढ आणि शहरीकरण

(v) दळणवळण आणि संपर्क साधनांचा विकास

(vi) सामाजिक सुधारणा चळवळी :

| समाजसुधारणेच्या चळवळी | संस्थापक |
|---|---|
| ब्राह्मो समाज | राजा राममोहन रॉय |
| आर्य समाज | स्वामी दयानंद सरस्वती |
| प्रार्थना समाज | आत्माराम पांडुरंग तर्खडकर |
| सत्यशोधक समाज | महात्मा जोतीराव फुले |
| हरिजन सेवक संघ | महात्मा गांधी |
| थिऑसॉफिकल सोसायटी | ॲनी बेझंट |
| सेवा सदन | बेहरामजी मलबारी |
| धर्म सभा | राधाकांत देब |
| वहाबी चळवळ | सैद वलीउल्लाह |
| सेल्फ रिस्पेक्ट मूव्हमेंट | इरोदे व्ही रामस्वामी पेरियार |

(vii) सामाजिक कायदे :

| वर्ष | कायद्याचे नाव |
|---|---|
| १८२९ | सती प्रतिबंधक कायदा |
| १८४३ | इंडियन स्लेव्हरी कायदा |
| १८५० | कास्ट डिसॅबिलिटी रिमूव्हल कायदा |
| १८५६ | विधवा पुनर्विवाह कायदा |
| १८७० | स्त्री-भ्रूणहत्या प्रतिबंध कायदा |
| १८७२ | स्पेशल मॅरेज कायदा |
| १८२९ | बालविवाहविरोधी कायदा |


(viii) राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळ.

## १.३ स्वातंत्र्योत्तर काळातील भारत :

- स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतीय समाजात घडून आलेले उल्लेखनीय बदल पुढीलप्रमाणे आहेत :

(i) भारतीय संविधानाची निर्मिती.

**तुम्हांला हे माहीत आहे का?**




भारताच्या संविधानाचा मसुदा तयार करताना मसुदा समितीने अनेक संदर्भ विचारात घेतले. त्यामध्ये 'गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट–१९३५' तसेच अमेरिका, ऑस्ट्रेलिया, ग्रेट ब्रिटन, कॅनडा, आयर्लंड, दक्षिण आफ्रिका, सोव्हिएत रशिया आणि जर्मनी या देशांच्या संविधानांचा समावेश होता.

(ii) सामाजिक सुधारणा करणारे पुढील कायदे पारित करण्यात आले :

| वर्ष | कायदेविषयक तरतुदी |
|---|---|
| १९५४ | स्पेशल मॅरेज कायदा |
| १९५५ | हिंदू कोड बिल |
| १९५५ | अन्टचेबिलिटी (आफेन्सेस) कायदा. (१९७६ मध्ये या कायद्याचे नाव बदलून 'प्रोटेक्शन ऑफ सिव्हिल राइट्स' (PCR Act) असे करण्यात आले.) |
| १९५६ | द सप्रेशन ऑफ इम्मॉरल ट्रॅफिक इन वूमेन अॅन्ड गर्ल्स कायदा (SITA) |
| १९६१ | हुंडा प्रतिबंधक कायदा |
| १९७१ | मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी (MTP) |
| १९८५ | नार्कोटिक ड्रग्ज अॅन्ड सायकोट्रॉपिक सब्स्टन्सेस कायदा |
| १९८६ | चाईल्ड लेबर (प्रोहिबिशन अॅन्ड रेग्युलेशन) कायदा |
| १९९५ | पर्सन्स वुईथ डिसॅबिलिटिज (इक्वल अपॉर्च्युनिटिज, प्रोटेक्शन ऑफ राइट्स अॅन्ड फुल पार्टिसिपेशन) कायदा |
| २००५ | प्रोटेक्शन ऑफ वूमेन फ्रॉम डोमेस्टिक व्हॉयलन्स कायदा |
| २०१२ | प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्स्युअल ऑफेन्सेस (POCSO) कायदा. या कायद्यामध्ये २०१९ मध्ये सुधारणा करण्यात आली. |
| २०१३ | प्रोहिबिशन ऑफ एम्प्लॉयमेंट अॅज मॅन्युअल स्कॅव्हेन्जर्स अॅन्ड देयर रिहॅबिलिटेशन कायदा |
| २०१५ | ज्युवेनाइल जस्टिस (केअर अॅन्ड प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन) कायदा |
| २०१९ | ट्रान्सजेन्डर पर्सन्स (प्रोटेक्शन ऑफ राइट्स्) कायदा |

(iii) १९५१ ते २०१७ या कालखंडात पंचवार्षिक योजनांद्वारा आर्थिक विकास – १९९१ साली आर्थिक विकासासाठी जागतिकीकरणाचा स्वीकार.

(iv) साक्षरतेचा प्रसार – निरक्षरतेचे निर्मूलन.

(v) संघराज्यात्मक शासन प्रणाली – स्थानिक स्वराज्य संस्था – बहुपक्ष पद्धती.

## प्रश्नोत्तरे

### वस्तुनिष्ठ प्रश्न

**प्र. १ कंसातील पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण करा :** ***(प्रत्येकी १ गुण)***

**[ १ ]**

*(१) दीक्षा घेऊन बौद्ध विहारांमध्ये राहणाऱ्या पुरुषांना -------- म्हणत असत. *(भिक्खू, भिक्खुणी, ऋषी)*

*(२) 'स्पेशल मॅरेज अॅक्ट' -------- या वर्षी पारित करण्यात आला. *(१९५०, १९५२, १९५४)*

(३) मानवशास्त्राचे टीकाकार --------- यांनी प्राच्य विद्याशाखेचा अभ्यास केला.

*(एडवर्ड सैद, मॉरिस गिन्सबर्ग, रॉबर्ट लोनी)*

(४) इ.स.पू. १५०० ते १००० हा --------- कालखंड आहे.

*(हडप्पा संस्कृती, पूर्व वैदिक, उत्तर वैदिक)*

(५) 'कार्यकारण परंपरे'च्या सिद्धांताला --------- सिद्धांत असेही म्हणतात. *(कर्म, धर्म, तर्क)*

**उत्तरे :**

(१) दीक्षा घेऊन बौद्ध विहारांमध्ये राहणाऱ्या पुरुषांना भिक्खू म्हणत असत.

(२) 'स्पेशल मॅरेज अॅक्ट' १९५४ या वर्षी पारित करण्यात आला.

(३) मानवशास्त्राचे टीकाकार एडवर्ड सैद यांनी प्राच्य विद्याशाखेचा अभ्यास केला.

(४) इ.स.पू. १५०० ते १००० हा पूर्व वैदिक कालखंड आहे.

(५) 'कार्यकारण परंपरे'च्या सिद्धांताला कर्म सिद्धांत असेही म्हणतात.

**[ २ ]**

(१) --------- हे (हिंदू धर्माच्या अनुयायांचे) आयुष्याचे परमोच्च ध्येय असते. *(धर्म, अर्थ, मोक्ष)*

(२) भारतीय तत्त्वज्ञानातील षड्दर्शनांपैकी जैन आणि बौद्ध दर्शने यांना --------- (ईश्वराचे अस्तित्व अमान्य करणारी) म्हटले जाते. *(नास्तिक, दैववाद, सुधारक)*

(३) --------- परंपरेत एकूण २४ तीर्थंकर होऊन गेले.

*(जैन, बौद्ध, वैदिक)*

(**सूचना :** पाठ्यपुस्तकातील प्रश्न * या चिन्हाद्वारे दर्शवण्यात आले आहेत.)

(४) वर्धमान (महावीर) हे --------- तीर्थंकर होते.
*(पहिले, दुसरे, चोविसावे)*

(५) बौद्ध धर्माचे पवित्र ग्रंथ --------- या लोकभाषेत लिहिलेले आहेत. *(अर्धमागधी, पाली, प्राकृत)*

**उत्तरे :**

(१) मोक्ष हे (हिंदू धर्माच्या अनुयायांचे) आयुष्याचे परमोच्च ध्येय असते.

(२) भारतीय तत्त्वज्ञानातील षड्दर्शनांपैकी जैन आणि बौद्ध दर्शने यांना नास्तिक (ईश्वराचे अस्तित्व अमान्य करणारी) म्हटले जाते.

(३) जैन परंपरेत एकूण २४ तीर्थंकर होऊन गेले.

(४) वर्धमान (महावीर) हे चोविसावे तीर्थंकर होते.

(५) बौद्ध धर्माचे पवित्र ग्रंथ पाली या लोकभाषेत लिहिलेले आहेत.

**[ ३ ]**

(१) --------- कालखंड हा दक्षिण भारतातील प्राचीन इतिहासाचा काळ आहे. *(संघम, यादव, चालुक्य)*

(२) --------- धर्माचा उगम वैदिक काळाच्याही पूर्वीचा आहे.
*(जैन, पारशी, बौद्ध)*

(३) ज्यूधर्मीय लोक '---------' या ग्रंथातील नियमांचे पालन करतात. *(बायबल, तोरॉ, कुराण-ए-शरीफ)*

(४) गुरू --------- यांनी शीख धर्माची स्थापना केली.
*(नानक, अर्जुन, गोबिंदसिंग)*

(५) --------- हे दान आणि समानता या तत्त्वाचे एकमेवाद्वितीय असे प्रतीक आहे. *(लंगर, शबाद, जकात)*

**उत्तरे :**

(१) संघम कालखंड हा दक्षिण भारतातील प्राचीन इतिहासाचा काळ आहे.

(२) पारशी धर्माचा उगम वैदिक काळाच्याही पूर्वीचा आहे.

(३) ज्यूधर्मीय लोक 'तोरॉ' या ग्रंथातील नियमांचे पालन करतात.

(४) गुरू नानक यांनी शीख धर्माची स्थापना केली.

(५) लंगर हे दान आणि समानता या तत्त्वाचे एकमेवाद्वितीय असे प्रतीक आहे.

**[ ४ ]**

(१) हिंदू कोड बिल हा सामाजिक सुधारणांविषयक कायदा सन --------- मध्ये पारित करण्यात आला.
*(१९५४, १९५५, १९५६)*

(२) हुंडाप्रतिबंधक कायदा सन --------- मध्ये पारित करण्यात आला. *(१९५५, १९५६, १९६१)*

(३) कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा सन --------- मध्ये पारित करण्यात आला. *(१९९५, २००५, २०१५)*

(४) सत्यशोधक समाज या समाजसुधारणा चळवळीचे संस्थापक --------- हे होते. *(स्वामी दयानंद सरस्वती, महात्मा जोतीराव फुले, महात्मा गांधी.)*

(५) इंडियन युनिव्हर्सिटीज ॲक्ट --------- अन्वये कलकत्ता (कोलकाता), बॉम्बे (मुंबई) आणि मद्रास (चेन्नई) येथे भारतातील पहिल्या विद्यापीठांची स्थापना केली.
*(१८३५, १८५६, १८६१)*

**उत्तरे :**

(१) हिंदू कोड बिल हा सामाजिक सुधारणांविषयक कायदा सन १९५५ मध्ये पारित करण्यात आला.

(२) हुंडाप्रतिबंधक कायदा सन १९६१ मध्ये पारित करण्यात आला.

(३) कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा सन २००५ मध्ये पारित करण्यात आला.

(४) सत्यशोधक समाज या समाजसुधारणा चळवळीचे संस्थापक महात्मा जोतीराव फुले हे होते.

(५) इंडियन युनिव्हर्सिटीज ॲक्ट १८५६ अन्वये कलकत्ता (कोलकाता), बॉम्बे (मुंबई) आणि मद्रास (चेन्नई) येथे भारतातील पहिल्या विद्यापीठांची स्थापना केली.

**[ ५ ]**

(१) --------- संस्कृती ही भारतातील सर्वांत प्राचीन संस्कृती आहे. *(वैदिक, सिंधू, ब्रिटिश)*

(२) ख्रिस्ती धर्माचा भारतात सर्वप्रथम प्रसार सेंट --------- यांनी केला. *(थॉमस, फ्रान्सिस, पीटर)*

(३) '---------' हा बौद्ध धर्माचा पवित्र ग्रंथ आहे.
*(त्रिपिटक, आगम, जातक कथा)*

(४) --------- या राज्यकर्त्याने भारतात धर्मनिरपेक्ष शासन-व्यवस्था प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.
*(बाबर, अकबर, शाहजहान)*

(५) --------- हे परकीय (युरोपीय) भारतात सर्वप्रथम आले.
*(फ्रेंच, पोर्तुगीज, ब्रिटिश)*

**उत्तरे :**

(१) सिंधू संस्कृती ही भारतातील सर्वांत प्राचीन संस्कृती आहे.

(२) ख्रिस्ती धर्माचा भारतात सर्वप्रथम प्रसार सेंट थॉमस यांनी केला.

(३) 'त्रिपिटक' हा बौद्ध धर्माचा पवित्र ग्रंथ आहे.

(४) अकबर या राज्यकर्त्याने भारतात धर्मनिरपेक्ष शासनव्यवस्था प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

(५) पोर्तुगीज हे परकीय (युरोपीय) भारतात सर्वप्रथम आले.

**प्र. २ पुढील प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व दुरुस्त करून लिहा :** ***(प्रत्येकी १ गुण)***

[ १ ]

*(१) (अ) राजमार्ग – हिंदू धर्म
(ब) तीर्थंकर – जैन धर्म
(क) सेंट थॉमस – शीख धर्म
(ड) अष्टांग मार्ग – बौद्ध धर्म.

(२) (अ) धर्म – निरपेक्ष वृत्तीने विहित कार्ये करणे
(ब) अर्थ – विहित मार्गाने संपत्ती मिळवणे
(क) काम – विहित मार्गाने शारीरिक सुख प्राप्त करणे
(ड) मोक्ष – विहित मार्गाने स्वर्गारोहण करणे.

(३) (अ) अहिंसा – जैन धर्म
(ब) आस्तिक – ख्रिस्ती तत्त्वज्ञान
(क) चार आर्यसत्ते – बौद्ध धर्म
(ड) नास्तिक – चार्वाक दर्शन.

(४) (अ) कर्म सिद्धांत – जैन धर्मास मान्य
(ब) यज्ञविधी – वैदिक परंपरा
(क) त्रिपिटक – बौद्ध धर्माचा पवित्र ग्रंथ
(ड) आजीविका – आस्तिक तत्त्वज्ञान.

(५) (अ) मानक कथा – बौद्धविषयक कथांचा संग्रह
(ब) चार्वाक दर्शन – हिंदू धर्माचे समर्थन
(क) बंडखोर धर्म – जैन धर्म
(ड) दैववाद आणि तापसी जीवनपद्धती – आजीवक पंथ.

**उत्तरे : दुरुस्त जोड्या :**

(१) (क) सेंट थॉमस – ख्रिस्ती धर्म.
(२) (ड) मोक्ष – जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून सुटका मिळवण्याचे ध्येय.
(३) (ब) आस्तिक – भारतीय तत्त्वज्ञान.
(४) (ड) आजीविका – नास्तिक तत्त्वज्ञान.
(५) (ब) चार्वाक दर्शन – ईश्वराचे अस्तित्व नाकारणारे तत्त्वज्ञान.

[ २ ]

(१) (अ) पारशी धर्माचा उगम – मध्य-पूर्व आशिया
(ब) ज्यूधर्माचे अनुयायी – भारतात सर्वप्रथम आलेले परकीय
(क) विस्थापित ज्यू लोकांनी दुसऱ्या महायुद्धानंतर स्थलांतर केलेला देश – अमेरिका
(ड) इसवी सनाच्या पहिल्या शतकात दक्षिण भारतात आलेले ख्रिस्ती संत – सेंट थॉमस.

(२) (अ) सेंट थॉमस यांचे अनुयायी – सिरियन ख्रिश्चन
(ब) भारतात इस्लाम धर्माचे आगमन – ११ व्या शतकात
(क) अकबर बादशहाने स्थापन केलेला नवीन धर्म – दीन-ई-इलाही
(ड) शीख धर्माचा उदय – १५ व्या शतकात.

(३) (अ) एकेश्वरवादी धर्म – ख्रिश्चन धर्म
(ब) इस्लामचा पवित्र ग्रंथ – कुराण
(क) पारशी धर्माचे पवित्र स्थान – सिनेगॉग
(ड) ज्यू धर्माच्या लोकांच्या अनन्वित छळाचे वर्णन – होलीकॉस्ट.

(४) (अ) पंचकार – इस्लाम
(ब) संत ज्ञानेश्वर – महाराष्ट्रातील भक्ती चळवळ
(क) श्रीगुरुग्रंथसाहिब – शीख धर्म
(ड) वेदविद्येत पारंगत स्त्रिया – ब्रह्मवादिनी.

(५) (अ) सती प्रतिबंधक कायदा – १८२९
(ब) विधवा पुनर्विवाह कायदा – १८३५
(क) स्त्री-भ्रूणहत्या प्रतिबंधक कायदा – १८७०
(ड) बालविवाह प्रतिबंधक कायदा – १९२९.

**उत्तरे : दुरुस्त जोड्या :**

(१) (क) विस्थापित ज्यू लोकांनी दुसऱ्या महायुद्धानंतर स्थलांतर केलेला देश – इस्राईल.
(२) (ब) भारतात इस्लाम धर्माचे आगमन – ६ व्या शतकात.
(३) (क) पारशी धर्माचे पवित्र स्थान – अग्यारी.
(४) (अ) पंचकार – शीख धर्म.
(५) (ब) विधवा पुनर्विवाह कायदा – १८५६.

[ ३ ]

(१) (अ) इंडियन स्लेव्हरी ॲक्ट – १८३५
(ब) कास्ट डिसॅबिलिटी रिमूव्हल ॲक्ट – १८५०
(क) स्पेशल मॅरेज ॲक्ट – १९५४
(ड) इंडियन युनिव्हर्सिटीज ॲक्ट – १८५६.

(२) (अ) आर्य समाज – स्वामी दयानंद सरस्वती
(ब) प्रार्थना समाज – राजा राममोहन रॉय
(क) सत्यशोधक समाज – महात्मा फुले
(ड) हरिजन सेवक संघ – महात्मा गांधी.

**(३)** (अ) थिऑसॉफिकल सोसायटी – डॉ. ॲनी बेझंट
(ब) सेवा सदन – बेहरामजी मलबारी
(क) धर्मसभा – स्वामी दयानंद सरस्वती
(ड) वहाबी चळवळ – सैयद वलीउल्लाह.

**(४)** (अ) सेल्फ रिस्पेक्ट मूव्हमेंट –ई. व्ही. आर. पेरियार
(ब) क्वीट इंडिया मूव्हमेंट – महात्मा गांधी
(क) भारतीय संविधानाचा मसुदा – डॉ. बी. आर. आंबेडकर
(ड) भारतातील जागतिकीकरणाची सुरुवात – नरेंद्र मोदी.

**(५)** (अ) गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट – १९३५
(ब) सुएझ कालवा सुरू करण्यात आला – १८६९
(क) बंगाल आणि ओडिसा येथील दुष्काळ – १८५६
(ड) इंडियन सिव्हिल सर्व्हिस ॲक्ट – १८३५.

**उत्तरे : दुरुस्त जोड्या :**

**(१)** (अ) इंडियन स्लेव्हरी ॲक्ट – १८४३.
**(२)** (ब) प्रार्थना समाज – आत्माराम पांडुरंग तर्खडकर.
**(३)** (क) धर्मसभा – राधाकांत देब.
**(४)** (ड) भारतातील जागतिकीकरणाची सुरुवात – डॉ. मनमोहन सिंग.
**(५)** (ड) इंडियन सिव्हिल सर्व्हिस ॲक्ट – १८६१.

---

**[ ४ ]**

**(१)** (अ) अहिंसा आणि तपस – जैन धर्माची तत्त्वे
(ब) यज्ञविधी आणि पशुबळी – वैदिक परंपरा
(क) चार आर्यसत्ये आणि अष्टांग मार्ग – बौद्ध धर्माची तत्त्वे
(ड) दैववाद आणि तापसी जीवनपद्धती – चार्वाकचे तत्त्वज्ञान.

**(२)** (अ) जैन आणि बौद्ध धर्म – बंडखोर धर्म
(ब) अग्नी आणि जल ही दोन तत्त्वे शुद्धतेचे माध्यम – पारशी धर्म
(क) दीन-ई-इलाही – इस्लाम धर्म
(ड) जीवनाबद्दलचा एकरेषीय दृष्टिकोन – ख्रिस्ती धर्म.

**(३)** (अ) कीर्तन आणि अखंड नामस्मरण – भक्ती संप्रदाय
(ब) आजीवनवेदांचे अध्ययन आणि अध्यापन – ब्रह्मवादिनी
(क) विधवा पुनर्विवाह निषिद्ध – वैदिक काळ
(ड) गुरुपदी पोहोचलेल्या ज्ञानी भिक्खुणी – थेरी.

**(४)** (अ) कौशल्याधारित वर्ग – हडप्पा संस्कृती
(ब) व्यवसायाधिष्ठित वर्णव्यवस्था – पूर्व वैदिक कालखंड
(क) जातिव्यवस्थेची उतरंड – उत्तर वैदिक कालखंड
(ड) सरंजामी पद्धतीतील अधिकारांची उतरंड – गुप्त राजवट कालखंड.

**(५)** (अ) नवीन शैक्षणिक धोरणाचा मसुदा – २०१९
(ब) मतदान अधिकाराची वयोमर्यादा – २१ वर्षे
(क) आर्थिक विकासासाठीचे उपक्रम – पंचवार्षिक योजना
(ड) समाज सुधारणेच्या चळवळी – वसाहती राजवटीचा कालखंड.

**उत्तरे : दुरुस्त जोड्या :**

**(१)** (ड) दैववाद आणि तापसी जीवनपद्धती – आजीवक पंथ
**(२)** (क) दीन-ई-इलाही – अकबर बादशहाने स्थापन केलेला नवीन धर्म.
**(३)** (क) विधवा पुनर्विवाह निषिद्ध – मध्ययुग
**(४)** (ड) सरंजामी पद्धतीतील अधिकारांची उतरंड – सुलतानशाही कालखंड.
**(५)** (ब) मतदान अधिकाराची वयोमर्यादा – १८ वर्षे.

---

**[ ५ ]**

**(१)** (अ) हिंदू धर्म – पुरुषार्थाची संकल्पना
(ब) जैन धर्म – चार आर्यसत्ये
(क) इस्लाम – एका देवावर श्रद्धा
(ड) बौद्ध धर्म – त्रिपिटके.

**(२)** (अ) शीख धर्म – पंचकार
(ब) जैन धर्म – अष्टांग मार्ग
(क) बौद्ध धर्म – पंचशील
(ड) इस्लाम धर्म – पाच धर्माज्ञा.

**(३)** (अ) जैन परंपरा – १६ पूजनीय 'सती'
(ब) बौद्ध धर्म – परंपरानिष्ठ धर्म
(क) पारशी धर्म – 'अवेस्ता' हा पवित्र ग्रंथ
(ड) शीख धर्म – श्रीगुरुग्रंथसाहिब.

**(४)** (अ) संत कबीर – भक्ती चळवळ
(ब) संत नामदेव – संत ज्ञानेश्वरांचे समकालीन
(क) मैत्रयी – ब्रह्मवादिनी
(ड) अनुलोम विवाह – उच्च वर्णाच्या वधूचा कनिष्ट वर्णातील वराशी विवाह.

**(५)** (अ) प्रतिलोम विवाह – उच्च वर्णाच्या वधूचा कनिष्ठ वर्णाच्या वराबरोबर विवाह
(ब) विनय पिटक – भविष्यात स्त्री-बुद्ध होण्याची शक्यता व्यक्त केली

(क) पूर्व वैदिक काळ – विधवा पुनर्विवाहाला मान्यता

(ड) खानक्वा –ख्रिस्ती मठांशी साधर्म.

**उत्तरे : दुरुस्त जोड्या :**

**(१)** (ब) जैन धर्म – त्रिरत्न.

**(२)** (ब) जैन धर्म – पाच महाव्रते.

**(३)** (ब) बौद्ध धर्म – बंडखोर धर्म.

**(४)** (ड) अनुलोम विवाह – उच्च वर्णाच्या वराचा कनिष्ठ वर्णातील वधूशी विवाह.

**(५)** (ब) विनय पिटक – भविष्यात स्त्री-बुद्ध होण्याची शक्यता नाकारली.

**प्र. ❸ प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा :** ***(प्रत्येकी १ गुण)***

*[१] | ब्राह्मो समाज, डॉ. बी. आर. आंबेडकर, हरिजन सेवक संघ |

(१) राजा राममोहन रॉय यांनी स्थापन केलेली संघटना

(२) भारतीय संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष.

**उत्तरे :**

(१) राजा राममोहन रॉय यांनी स्थापन केलेली संघटना – ब्राह्मो समाज

(२) भारतीय संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष – डॉ. बी. आर. आंबेडकर.

[२] | हरिजन सेवक संघ, मध्यम मार्ग, पशुबळीचा मार्ग |

(१) महात्मा गांधी यांनी स्थापन केलेली संघटना

(२) गौतम बुद्धाने केलेला उपदेश.

**उत्तरे :**

(१) महात्मा गांधी यांनी स्थापन केलेली संघटना – हरिजन सेवक संघ

(२) गौतम बुद्धाने केलेला उपदेश – मध्यम मार्ग.

[३] | बौद्ध धर्माचा प्रसार, दिगंबर, श्वेतांबर |

(१) मौर्य सम्राट अशोक

(२) दिशा हेच वस्त्र असणारे मुनी.

**उत्तरे :**

(१) मौर्य सम्राट अशोक – बौद्ध धर्माचा प्रसार

(२) दिशा हेच वस्त्र असणारे मुनी – दिगंबर.

[४] | हीनयान, महायान, श्वेतांबर |

(१) बौद्ध धर्माच्या मूळ नियमांचे काटेकोर पालन

(२) श्वेत वस्त्र परिधान करणारे मुनी.

**उत्तरे :**

(१) बौद्ध धर्माच्या मूळ नियमांचे काटेकोर पालन – हीनयान

(२) श्वेत वस्त्र परिधान करणारे मुनी – श्वेतांबर.

[५] | संघम, वज्रयान, महायान |

(१) तमिळ कवी आणि साहित्यिकांची संघटना

(२) आठव्या शतकात उदयास आलेला बौद्ध धर्माचा पंथ.

**उत्तरे :**

(१) तमिळ कवी आणि साहित्यिकांची संघटना – संघम

(२) आठव्या शतकात उदयास आलेला बौद्ध धर्माचा पंथ – वज्रयान.

[६] | मैत्रयी, धम्मदिन्ना, द्रौपदी |

(१) वेदविद्येत पारंगत स्त्री

(२) नावाजलेली बौद्ध भिक्खुणी.

**उत्तरे :**

(१) वेदविद्येत पारंगत स्त्री – मैत्रयी

(२) नावाजलेली बौद्ध भिक्खुणी – धम्मदिन्ना.

[७] | संस्कृत, पाली, जिन |

(१) वैदिक ग्रंथाचे अध्ययन-अध्यापन

(२) भगवान महावीरांचे अनुयायी.

**उत्तरे :**

(१) वैदिक ग्रंथाचे अध्ययन-अध्यापन – संस्कृत

(२) भगवान महावीरांचे अनुयायी – जिन.

[८] | विहार, चैत्य, मक्ताब |

(१) भिक्खूंच्या वास्तव्यासाठी बांधलेले स्थान

(२) मशिदीशी संलग्न असणारी प्राथमिक शिक्षणसंस्था.

**उत्तरे :**

(१) भिक्खूंच्या वास्तव्यासाठी बांधलेले स्थान – विहार

(२) मशिदीशी संलग्न असणारी प्राथमिक शिक्षणसंस्था – मक्ताब.

[९] | मदरसा, खानव्हा, अबुल फझल |

(१) मशिदीशी संलग्न असणारी उच्च शिक्षणसंस्था

(२) अकबर बादशाहचा विद्वान वजीर.

**उत्तरे :**

(१) मशिदीशी संलग्न असणारी उच्च शिक्षणसंस्था – मदरसा

(२) अकबर बादशाहचा विद्वान वजीर – अबुल फझल.

[१०] | गुप्त कालखंड, हडप्पा संस्कृती, सुलतानी राजवट |

(१) भारतीय इतिहासातील सुवर्णयुग

(२) सुनियोजित नगरे.

**उत्तरे :**

(१) भारतीय इतिहासातील सुवर्णयुग – गुप्त कालखंड

(२) सुनियोजित नगरे – हडप्पा संस्कृती.

**प्र. ४ अधोरेखित शब्दांच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा :** ***(प्रत्येकी १ गुण)***

**[ १ ]**

*(१) मध्ययुगीन काळात खानक्वा या धार्मिक स्वरूपाच्या संस्थांमध्ये प्राथमिक शिक्षण दिले जाई.

*(२) थिऑसॉफिकल सोसायटी स्थापन करण्यात महात्मा गांधींचा पुढाकार होता.

(३) हीनयान पंथाचे नियम अधिक व्यवहार्य आणि सहज आचरता येण्याजोगे होते.

(४) जैन धर्माचा प्रसार भारताच्या सीमा ओलांडून दूरवर झाला.

(५) वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांचा जन्म ब्राह्मण कुळामध्ये झाला.

**उत्तरे :**

(१) मध्ययुगीन काळात खानक्वा या धार्मिक स्वरूपाच्या संस्थांमध्ये अल्लाह विषयाच्या परमोच्च तत्त्वांचे शिक्षण दिले जाई.

(२) थिऑसॉफिकल सोसायटी स्थापन करण्यात श्रीमती ॲनी बेझंटांचा पुढाकार होता.

(३) महायान पंथाचे नियम अधिक व्यवहार्य आणि सहज आचरता येण्याजोगे होते.

(४) बौद्ध धर्माचा प्रसार भारताच्या सीमा ओलांडून दूरवर झाला.

(५) वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांचा जन्म क्षत्रिय कुळामध्ये झाला.

**[ २ ]**

(१) मदरशामध्ये उर्दू आणि पर्शियन भाषा शिकवल्या जात असत.

(२) इ.स.पू. ५०० ते २०० या कालखंडात भारतात पहिले नागरीकरण झाले.

(३) १६व्या शतकात व्यापाराच्या उद्देशाने सर्वप्रथम ब्रिटिश भारतात आले.

(४) डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी ब्रिटिशांचे अनुकरण करण्याच्या प्रक्रियेस आधुनिकीकरण असे म्हटले आहे.

(५) सन २०१९ मध्ये जम्मू आणि काश्मीर राज्याला विशेष दर्जा देणारे कलम ३७१ रद्द केले गेले.

**उत्तरे :**

(१) मदरशामध्ये अरेबिक आणि पर्शियन भाषा शिकवल्या जात असत.

(२) इ.स.पू. ५०० ते २०० या कालखंडात भारतात दुसरे नागरीकरण झाले.

(३) १६व्या शतकात व्यापाराच्या उद्देशाने सर्वप्रथम पोर्तुगीज भारतात आले.

(४) डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी ब्रिटिशांचे अनुकरण करण्याच्या प्रक्रियेस पाश्चात्त्यीकरण असे म्हटले आहे.

(५) सन २०१९ मध्ये जम्मू आणि काश्मीर राज्याला विशेष दर्जा देणारे कलम ३७० रद्द केले गेले.

## लघूत्तरी प्रश्न

**प्र. ५ टिपा लिहा :** ***(प्रत्येकी ४ गुण)***

### (१) हिंदू जीवनपद्धतीच्या श्रद्धा आणि आचारपद्धती.

**उत्तर :** (१) वैदिक–हिंदू जीवनपद्धतीतील श्रद्धा आणि आचारपद्धती विषयीची माहिती वेदसंहिता, उपवेद, वेदांगे, ब्राह्मणग्रंथ, आरण्यके आणि महाकाव्ये या लिखित स्वरूपाच्या आणि मौखिक परंपरेने जोपासलेल्या साधनांत मिळते.

(२) आचारपद्धती आणि सामाजिक वर्तनाचे हे नियम कर्मसिद्धांतांवर आधारित आहेत. जन्ममृत्यूच्या चक्रावर हिंदूंचा विश्वास होता. त्यानुसार व्यक्तीच्या एका जन्मातील कर्मसंचित पुढील जन्माचा आलेख निश्चित करते. जीवात्मा हा मोक्षप्राप्ती होईपर्यंत 'पुन्हा पुन्हा जन्म आणि पुन्हा पुन्हा मृत्यू' या चक्रामध्ये अडकलेला असतो.

(३) हिंदू व्यक्तीच्या आयुष्यात चार पुरुषार्थ (उद्दिष्टे) महत्त्वाची मानलेली आहेत. ती पुढीलप्रमाणे :

(अ) **धर्म :** फलाची आशा न धरता निरपेक्ष वृत्तीने विहित कर्मे करीत राहणे.

(ब) **अर्थ :** विहित मार्गाने संपत्ती मिळवणे.

(क) **काम :** विहित मार्गाने शारीरिक सुखांची आणि आनंदाची प्राप्ती करून घेणे.

(ड) **मोक्ष :** मोक्ष हे अंतिम ध्येय आहे. जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून सुटका मिळवण्याचे, म्हणजे मोक्षप्राप्ती आयुष्यातील परमोच्च ध्येय.

(४) वैदिक परंपरेत यज्ञविधी आणि पशुबळी यांना असाधारण महत्त्व होते. यज्ञविधीचे पौरोहित्य करणाऱ्या ब्राह्मण वर्णाचे स्थान सर्वश्रेष्ठ समजले जात होते.

### *(२) पूर्व वैदिक काळातील शिक्षणव्यवस्था.

**उत्तर :** (१) पूर्व वैदिक काळात गुरुकुलात संस्कृत भाषेतील वैदिक ग्रंथाचे अध्ययन-अध्यापन मौखिक पठण पद्धतीने केले जात असे.

(२) वैदिक शिक्षणासाठी गुरुकुलात प्रवेश करण्यापूर्वी ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या वर्णांतील विद्यार्थ्यांवर उपनयन संस्कार होणे आवश्यक होते.

(३) गुरुकुलात वास्तव्य असेतोपर्यंत ब्रह्मधर्माचे पालन करावे लागत असे. शिक्षणाची उद्‌दिष्टे तल्लख बुद्‌धी व व्यक्तिमत्त्वाचा विकास ही होती. सत्यावर आधारित आचरण, विहित कर्तव्यांचे पालन, गुरू आणि माता-पिता यांच्याप्रती निष्ठा आणि औदार्य या गुणांना महत्त्व होते.

(४) क्षत्रिय वर्णाचे विद्यार्थी प्रशासन आणि युद्‌धनीतीचे, वैश्य उद्योग-व्यवसायास उपयुक्त बाबींचे आणि ब्राह्मण चारही वेदांवर प्रभुत्व प्राप्त करण्याचे शिक्षण घेत असत.

(५) ऋषी, मुनी आणि द्रष्ट्या व्यक्तींनी ज्ञाननिर्मिती, ज्ञानसंवर्धन आणि पुढील पिढीस ज्ञानाचे हस्तांतरण करण्याचे काम केले.

(६) स्त्रियांना वेदांचे शिक्षण घेण्याची मुभा होती. वेदविद्या प्राप्त केलेल्या स्त्रियांना समाजात मानाचे स्थान होते.

### * (३) मध्ययुगीन काळातील भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान.

**उत्तर :** (१) स्त्रियांच्या सामाजिक स्थानाच्या उतरणीची सुरुवात उत्तर वैदिक काळात झाली होती.

(२) पुरोहित वर्गाच्या वर्चस्वाखालील समाजव्यवस्था, काटेकोरपणे नियमांचे पालन करण्याचा आग्रह आणि मध्य आशियातून आलेल्या टोळ्यांची आक्रमणे या बाबी स्त्रियांच्या घसरणाऱ्या सामाजिक स्थानास जबाबदार होत्या.

(३) स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर अनेक निर्बंध लादले गेले. त्यांना शिक्षणाचा अधिकार नाकारण्यात आला आणि आयुष्यभर पुरुषांवर अवलंबून राहण्यास भाग पाडण्यात आले. विधवाविवाह पूर्णतः निषिद्‌ध मानला गेला. कौटुंबिक संपत्तीचा वाटा स्त्रियांना नाकारण्याची परंपरा रूढ झाली. स्त्रियांच्या व्यक्तिविकासाच्या वाटा बंद झाल्या.

(४) पितृप्रधानपद्‌धतीवर आधारलेल्या एकत्र कुटुंबपद्‌धतीत स्त्रियांचे स्थान दुय्यम होते. बालविवाह, सती, पडदा पद्‌धत, बहुपत्निकत्व, देवदासी परंपरा इत्यादी अनिष्ट सामाजिक चालीरीती अन्यायमूलक आणि स्त्रियांच्या शोषणास कारणीभूत ठरल्या.

### (४) वर्णाश्रमव्यवस्था.

**उत्तर :** (१) वर्णाश्रमव्यवस्था हा आर्यकालीन, म्हणजेच वैदिक संस्कृतीचा एक महत्त्वपूर्ण घटक होता. त्याअंतर्गत समाजाचे पुढील चार स्तर मानण्यात आले होते :

(२) वर्णाश्रमव्यवस्था ही मूलतः श्रमविभाजनाच्या तत्त्वावर आधारित होती. त्याअंतर्गत–

(i) **ब्राह्मण** या वर्णाचे कार्य धर्म-अध्ययन आणि धर्म-अध्यापन होते.

(ii) **क्षत्रिय** या वर्णाने समाजाच्या संरक्षणाची आणि राज्यकारभाराची जबाबदारी पार पाडणे अपेक्षित होते.

(iii) **वैश्य** या वर्णाने व्यापार-उद्योग, शेती व पशुपालनाद्‌वारा समाजाच्या विविध गरजांची पूर्तता करणे अपेक्षित होते.

(iv) **शूद्र** या वर्णाने समाजातील अन्य तीन वर्णांतील लोकांची सेवा करणे अपेक्षित होते.

(३) कालांतराने वर्णव्यवस्थेचे जातिव्यवस्थेत रूपांतर झाले. जात ही वंशपरंपरागत बनली. म्हणजेच ज्या जातीत व्यक्तीचा जन्म झाला असेल, त्या जातीची कार्ये त्याने करणे निर्धारित झाले.

(४) विशिष्ट जातीचा विशिष्ट व्यवसाय निर्धारित झाल्याने जातिव्यवस्थेचे बंदिस्त वर्गव्यवस्थेत रूपांतर झाले. त्यातून वरिष्ठ जाती व कनिष्ठ जाती असे भेदभाव अस्तित्वात आले.

### (५) आश्रमव्यवस्था.

**उत्तर :** (१) आश्रम म्हणजे हिंदू समाजव्यवस्थेतील आयुष्यातील एक अवस्था/टप्पा आहे. प्रत्येक पुरुष शंभर वर्षे जगणार आहे, असे गृहीत धरून त्याच्या आयुष्याची चार भागांत केलेली विभागणी म्हणजे आश्रम होय.

(२) ब्रह्मचर्याश्रम हा पहिला टप्पा पुरुषाच्या जन्मापासून तारुण्यापर्यंतचा, म्हणजेच वयाच्या २५ वर्षांपर्यंतचा काळ आहे.

(३) गृहस्थाश्रम हा दुसरा टप्पा तारुण्यापासून त्याच्या प्रौढ वयापर्यंतचा, म्हणजेच वयाच्या ५० वर्षापर्यंतचा काळ आहे.

(४) वानप्रस्थाश्रम हा तिसरा टप्पा प्रौढावस्थेपासून वृद्‌धावस्थेपर्यंतचा, म्हणजेच वयाच्या ७५ वर्षांपर्यंतचा काळ आहे.

(५) संन्यासाश्रम हा अंतिम टप्पा पुरुषाच्या वृद्‌धावस्थेपासून त्याच्या मृत्यूपर्यंतचा आहे.

### (६) जैन धर्म.

**उत्तर :** (१) उत्तर वैदिक काळात वेदप्रामाण्य, पुरोहितांचे वर्चस्व, यज्ञविधी, पशुबळी आणि जातिभेद यांना विरोध करणारे, म्हणजेच प्रस्थापित वैदिक धर्माला विरोध करणारे तत्त्वज्ञान वर्धमान महावीर यांनी प्रतिपादिले. भारतीय तत्त्वज्ञान परंपरेत त्यास जैन धर्म असे म्हणतात.

(२) प्राचीन परंपरा असलेल्या जैन धर्मात २४ तीर्थंकर होवून गेले. वर्धमान महावीर त्यांतील २४वे तीर्थंकर होते.

(३) कर्मसिद्‌धांताला जैन धर्मात मान्यता आहे. 'अहिंसा' आणि 'तपस' या दोन तत्त्वांना अधिक महत्त्व दिले जाते. या धर्मात 'निर्वाण' या तत्त्वावर अधिक भर दिला जातो.

(४) जैन धर्माने समाजातील सर्व थरांतील स्त्रिया व पुरुषांना प्रवेश दिला. म्हणजेच मोक्षाचा अधिकार विशिष्ट वर्गापुरता मर्यादित राहिला नाही. महावीरांनी उपदेश करताना अर्धमागधी या लोकभाषेचा उपयोग केला.

(५) कालांतराने जैन धर्माचे श्वेतांबर आणि दिगंबर असे दोन पंथ निर्माण झाले. जैन धर्माचा प्रसार भारतापुरताच सीमित राहिला.

### (७) बौद्‌ध धर्म.

**उत्तर :** (१) वर्धमान महावीर यांचे समकालीन असलेल्या गौतम बुद्‌धांनी वेदप्रामाण्य, पुरोहितांचे वर्चस्व, यज्ञविधी, पशुबळी आणि

सामाजिक उतरंडीला विरोध करणारे तत्त्वज्ञान प्रतिपादिले. भारतीय तत्त्वज्ञान परंपरेत त्यास बौद्‌ध धर्म असे म्हणतात.

(२) जैन धर्माच्या तुलनेत बौद्‌ध धर्माचे नियम अधिक लवचीक व सौम्य असल्याने आणि त्याची शिकवण पाली या लोकभाषेत करण्यात आल्याने लोक मोठ्या संख्येत या धर्माकडे आकृष्ट झाले. मौर्य सम्राट अशोक यांचा राजाश्रय लाभल्याने या धर्माचा प्रसार भारताच्या सीमा ओलांडून श्रीलंका, चीन, म्यानमार, मंगोलिया, तिबेट, जावा, सुमात्रा इत्यादी देशांत झाला.

(३) बौद्‌ध धर्माचा प्रसार करण्यासाठी भिक्खू आणि भिक्खुणींचे संघ स्थापन करण्यात आले. ते आजदेखील भारत आणि भारताबाहेर धर्मप्रसाराचे कार्य करतात.

(४) व्यक्तीच्या नैतिक उन्नतीला आणि त्यावर आधारित जीवनपद्‌धतीला बौद्‌ध धर्मात महत्त्वाचे स्थान देण्यात आले. विचार आणि कृतीतील अहिंसा, संयम, स्वार्थत्याग, दानवृत्ती, समता इत्यादींवर भर देण्यात आला.

(५) कालांतराने बौद्‌ध धर्माचे 'हीनयान' आणि 'महायान' हे पंथ निर्माण झाले. ८व्या शतकात वज्रयान हा तिसरा पंथ उदयास आला.

### (८) जातक कथा.

**उत्तर :** (१) जातक कथांचे लिखाण इ.स.पू. ३०० ते इ.स. ४०० या कालखंडात बौद्‌ध साहित्यिकांनी केले आहे.

(२) जातक कथासाहित्याचा विस्तार मोठा आहे. त्यामध्ये गौतम बुद्‌धांच्या मानवीरूपातील आणि प्राणीरूपातील पूर्वजन्मांच्या कथांचा समावेश आहे.

(३) भविष्यातील बुद्‌धांचा जन्म राजा, जातीबाहेरील व्यक्ती किंवा हत्ती अशा कोणत्याही रूपात असू शकेल. कोणत्याही स्वरूपात बुद्‌धांनी जन्म घेतला तरी त्यांच्यातील काही लक्षणे आणि त्यांची नैतिकता यांवरून बुद्‌धांची ओळख जातक कथांमधून पटते.

(४) या कथांमध्ये विविध प्रकारची अनेक पात्रे एकमेकांशी संबंधित असतात. ती पात्रे वेगवेगळ्या संकटात सापडतात आणि बुद्‌ध स्वतः त्यांच्या समस्या दूर करतात. जीवसृष्टीतील नैसर्गिकतेचा संदर्भ हा या कथांचा अनिवार्य भाग आहे.

### (९) संघम कालखंड.

**उत्तर :** (१) इ.स.पू. ६ वे शतक ते इ.स.चे ३ रे शतक या कालखंडातील दक्षिण भारताच्या प्राचीन इतिहासाचा कालखंड संघम कालखंड म्हणून ओळखला जातो. मदुराई येथील प्राचीन कवी आणि साहित्यिकांचा काल हा 'संघम'शी निगडित असल्याने त्यास संघम कालखंड असे म्हणतात.

(२) या साहित्यावरून हे स्पष्ट होते की लोकांचे धार्मिक आचरण हे धार्मिक विधी आणि देवतांच्या उपासनेशी निगडित होते.

(३) वृक्ष, पाषाण, जल, प्राणी, ग्रह व तारे यांना देवतास्वरूप मानून त्यांची पूजा केली जात असे. त्यांचा असा समज होता की चैतन्यरूपी आत्म्याचे स्वतंत्र अस्तित्व असते, परंतु आत्म्याशिवाय शरीराला स्वतंत्र अस्तित्व नसते.

(४) संघम साहित्य हे पूर्वजपूजा, पुनर्जन्म, मृत्यू आणि मृत्यूनंतरचे जीवन यासंबंधीच्या विचारांवर आधारित होते.

### (१०) पारशी धर्म.

**उत्तर :** (१) मध्य-पूर्व आशियातील इराण देशात पारशी धर्माचा उगम झाला.

(२) या धर्माच्या अनुयायांचा धार्मिक छळ होत असल्याने त्यांनी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर गुजरातमध्ये असलेल्या नवसारीत स्थलांतर केले आणि तेथील स्थानिक लोकांशी ते एकरूप झाले.

(३) चांगले आणि वाईट **उदा.,** स्वर्ग आणि नरक या ध्रुवीय संकल्पनांवर आधारित त्यांचे धर्मतत्त्वज्ञान आहे. त्यांच्या मते, 'अहुर मज्द' हा विश्वाचा निर्माता आहे. त्यांचा धर्म एकेश्वरवादी आहे.

(४) 'अवेस्ता' हा त्यांचा पवित्र ग्रंथ असून, अग्यारी – अग्निमंदिर हे त्यांचे पूजास्थान आहे. पारशी धर्माबाहेरच्या व्यक्तीला आपल्या धर्मात घेण्यास ते परवानगी देत नाहीत. त्यांच्या अग्यारीत पारशी व्यक्तीखेरीज इतरांना प्रवेश करण्यास बंदी असते.

### (११) भारतातील ख्रिस्ती धर्म.

**उत्तर :** (१) येशू ख्रिस्ताचे शिष्य सेंट थॉमस इसवी सनाच्या पहिल्या शतकात दक्षिण भारताच्या मलबारच्या किनाऱ्यावर ख्रिस्ती धर्म घेऊन आले. त्यांच्या स्थानिक अनुयायांना 'सिरियन ख्रिश्चन' असे म्हणतात.

(२) ख्रिस्ती धर्म एकेश्वरवादी आहे. त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन एकरेषीय आहे. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या वर्तणुकीच्या आधारे स्वर्गात प्रवेश मिळतो किंवा नाकारला जातो.

(३) या धर्माचे पायाभूत तत्त्व प्रेम हे आहे. प्रेषित येशू ख्रिस्ताचा मृत्यू आणि पुनरुत्थान यांवर त्यांची श्रद्‌धा आहे.

(४) वसाहती कालखंडात ख्रिस्ती धर्माचा भारतात प्रसार झाला. शिक्षण, आरोग्य आणि समाजसेवेच्या क्षेत्रात ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

### (१२) शीख धर्म.

**उत्तर :** (१) इ.स.च्या १५व्या शतकात गुरू नानक यांनी पंजाबमध्ये शीख धर्माची स्थापना केली. त्यानंतर दहा धर्मगुरूंनी या पंथाचे नेतृत्व केले. या दहा गुरूंनी केलेला उपदेश या धर्माच्या श्रद्‌धाप्रणालीचा पाया आहे. 'श्रीगुरुग्रंथसाहिब' या धर्माचा पवित्र ग्रंथ आहे.

(२) जातीवर आधारलेल्या उच्चनीयतेला या धर्मात स्थान नाही. हा धर्म सामाजिक समतेचा पुरस्कार करतो. प्रत्येक गुरुद्वारात असलेल्या 'लंगर' मध्ये कोणताही भेदभाव न करता 'सेवेदार' प्रत्येक व्यक्तीला शाकाहारी भोजन पुरवतात.

(३) किरपान, कच्छ, केश, कडा आणि कंगा हे पंचकार या धर्माच्या अनुयायांची ओळख आहे.

(४) हिंदू धर्म आणि इस्लाम मधील तत्त्वज्ञानाचा समन्वय शीख धर्मात दिसून येतो. गुरू नानक यांनी जातिव्यवस्था, धार्मिक विधी आणि मूर्तिपूजा इत्यादींना मनाई केली. भारतातील भक्ती संप्रदायात गुरू नानक यांचे स्थान आदरणीय आहे.

**(१३) प्राचीन भारतातील राज्यसंस्था.**

**उत्तर :** (१) वैदिक लोकांच्या सुरुवातीच्या 'जनपद' या नावाने उल्लेख केल्या जाणाऱ्या छोट्या राज्यांनी विस्तार करण्यास प्रारंभ केला.

(२) विविध जनपदांच्या एकत्रीकरणातून 'महाजनपदे' निर्माण झाली.

(३) काही महाजनपदांमध्ये राजेशाही सत्ता होती तर काहींमध्ये गणराज्य पद्धतीची राज्यव्यवस्था होती. या महाजनपदांनी अफगाणिस्तानपासून ते बंगालपर्यंत आणि महाराष्ट्राचा काही प्रदेश व्यापलेला होता.

(४) मगध महाजनपदाच्या राजांनी या प्रदेशात प्रभुत्व प्रस्थापित केले. त्यातूनच मौर्य साम्राज्याचा उदय झाला.

(५) राज्यकारभारामध्ये राजाला साहाय्य करण्यासाठी मंत्री आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची नेमणूक केली जात असे.

**(१४) इस्लामिक शिक्षणपद्धती.**

**उत्तर :** (१) प्रेषित मुहम्मद पैगंबर यांचा असा आदेश होता की, इस्लामच्या सर्व अनुयायांना कुराण, हदिय आणि अन्य संबंधित बाबींचे ज्ञान प्राप्त झाले पाहिजे.

(२) इस्लामी शिक्षण सर्व अनुयायांसाठी तीन टप्प्यांत दिले जात असे.

(३) धार्मिक शिक्षणाचा पहिला टप्पा असणाऱ्या मक्ताबमध्ये वयाच्या चौथ्या वर्षी धार्मिक विधीनंतर प्रवेश दिला जाई. वाचन, पठण, लेखन आणि अंकगणित या विषयांच्या अध्ययनावर भर दिला जाई.

(४) वयाच्या साधारण सातव्या वर्षी मदरशांमध्ये कुराणच्या अध्ययनास सुरुवात होत असे. कुराण आणि त्याचे स्पष्टीकरण करणाऱ्या ग्रंथांचा सखोल अर्थ समजावून घेणे यांवर भर असे. त्याखेरीज शेती, हिशेब, ज्योतिष, खगोलशास्त्र, इतिहास, भूगोल, गणित, इस्लाममधील कायदेकानून आणि न्यायव्यवस्था तसेच प्रशासन यांसारखे व्यवहारविषयक विषयही शिकवले जात. त्याचबरोबर अरेबिक आणि पर्शियन भाषाही शिकवल्या जात असत. मदरशांमध्ये शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या निवास व भोजनाची सुविधा उपलब्ध केली जात असे. त्यासाठी लागणारा निधी राज्यकर्ते आणि अमीर-उमरावांकडून उपलब्ध करून दिला जात असे.

(५) मदरशांतील शिक्षण संपल्यानंतर प्रतिभावंत विद्यार्थी खानक्वा या तिसऱ्या टप्प्यात प्रवेश घेत असत. विद्वान शिक्षकांच्या हाताखाली धार्मिक उच्च शिक्षण घेत असत. खानक्वांची तुलना मध्ययुगीन युरोपातील मोनॅस्टरीशी करता येईल.

**(१५) मध्ययुगीन शिक्षणव्यवस्था.**

**उत्तर :** (१) मध्ययुगामध्ये बदललेल्या राजकीय परिस्थितीमुळे शिक्षणपद्धतीवर विपरीत परिणाम झाला होता. दिल्ली आणि आग्रा या राजधान्यांच्या शहरांतील मुस्लीम शासकांनी शिक्षणासाठी विशेष प्रयत्न केले नाहीत.

(२) शहरे आणि खेडी येथील विद्वान व्यक्ती व्यक्तिगत पातळीवर अध्यापनाचे कार्य करीत असत. हे अध्यापन संस्कृत, अरेबिक आणि पर्शियन भाषांमधून केले जाई.

(३) अशा प्रकारे शिक्षण घेणाऱ्यांमध्ये फक्त संपन्न वर्गातील लोक आणि मुस्लीम उलेमा तसेच ब्राह्मण आणि उच्चवर्णीय जातींमधील लोक यांचा समावेश होता.

(४) मुस्लीम कुटुंबातील स्त्रियांना घरच्या घरी राहून खासगी शिक्षकांकडून शिकण्याची परवानगी दिली जात असे. अर्थातच समाजाच्या या वरच्या थरातील लोकांची संख्या अत्यंत कमी असल्याने स्त्री-शिक्षण दुर्लक्षित राहिले.

**(१६) हडप्पा येथील पहिली नागरी संस्कृती.**

**उत्तर :** (१) हडप्पा संस्कृतीमध्ये दिसणारे नागरीकरण हे औद्योगिकीकरणाचा परिणाम आहे, या दृष्टिकोनाला छेद देणारे आहे.

(२) औद्योगिकीकरणाचा मागमूस नसतानाही हडप्पा संस्कृती-मध्ये पूर्वनियोजित नगरे अस्तित्वात होती. तेथील जीवनप्रणालीला 'पहिली नागरी संस्कृती' असे म्हणतात.

(३) पुरातत्त्वीय पुराव्यांवरून असे दिसते की, हडप्पा संस्कृतीच्या लोकांचे नागरी जीवन विकसित स्वरूपाचे होते. काही घरांमधून विहिरी आणि स्नानगृहे होती. नगरांमध्ये बंद आणि भूमिगत गटारे होती.

(४) मेसोपोटेमिया आणि इजिप्त येथील समकालीन प्रगत नागरी संस्कृतींसारखीच हडप्पा संस्कृती प्रगत होती.

(५) सुमेरियन इष्टिकालेखांमध्ये हडप्पा संस्कृतीच्या प्रगत व्यापाराचे उल्लेख केलेले आहे.

**प्र. ६ फरक स्पष्ट करा :** *(प्रत्येकी ४ गुण)*

***(१) पूर्व वैदिक काळातील स्त्रियांची सामाजिक स्थिती आणि उत्तर वैदिक काळातील स्त्रियांची सामाजिक स्थिती.**

| उत्तर : पूर्व वैदिक काळातील स्त्रियांची सामाजिक स्थिती | उत्तर वैदिक काळातील स्त्रियांची सामाजिक स्थिती |
|---|---|
| (१) उत्तर वैदिक काळाच्या तुलनेत पूर्व वैदिक काळातील स्त्रियांचे सामाजिक स्थान उच्च दर्जाचे होते. | (१) उत्तर वैदिक काळात स्त्रियांच्या सामाजिक स्थानाची घसरण होऊन, ते दुय्यम झाले. |
| (२) पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांचा दर्जा पुरुषांच्या बरोबरीचा नसला तरी प्रतिष्ठित होता. | (२) पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांचे स्थान हे पुरुषांच्या तुलनेत दुय्यम झाले होते. |
| (३) स्त्रियांना उपनयन संस्काराचा अधिकार आणि वैदिक शिक्षण घेण्याची मुभा होती. वेदविद्या प्राप्त केलेल्या लोपामुद्रा आणि गार्गीसारख्या स्त्रियांना समाजात मानाचे स्थान होते. | (३) स्त्रियांना उपनयन संस्काराचा अधिकार आणि शिक्षण संपादन करण्याचा अधिकार नाकारण्यात आला. राजघराण्यातील व उच्च वर्णीय स्त्रियांना खाजगीरीत्या शिक्षण प्राप्त करण्याची मुभा होती. मात्र बहुसंख्य स्त्रियांचे सामाजिक स्थान गौण होते. |
| (४) स्त्रियांची भूमिका समाजोपयोगी आणि अर्थोत्पादक समजली जायची. त्यांना त्यांच्या आयुष्याचा जोडीदार स्वतः निवडण्याची मुभा होती. विधवाविवाहाला समाजाची स्वीकृती होती. एकपत्नित्वाला प्राधान्य होते. कुटुंबाच्या स्थावर संपत्तीवर त्यांचा अधिकार मान्य करण्यात आला होता. | (४) स्त्रियांची भूमिका घरगुती कर्तव्यांशी बांधली गेली. मुलीचा जन्म अवांच्छित मानला जाऊ लागला. त्यांच्याविषयीचे सर्व निर्णय कुटुंबातील पुरुष घेत असत. स्त्रियांनी जन्मापासून मृत्यूपर्यंत कुटुंबातील पुरुषांच्या आज्ञेत राहावे असा दंडक घातला गेला. विधवांना पुनर्विवाहाचा अधिकार नाकारण्यात आला. |

***(२) प्राचीन काळातील भारतीय शिक्षणपद्धती आणि वसाहतीच्या काळातील भारतीय शिक्षणपद्धती.**

| उत्तर : प्राचीन काळातील भारतीय शिक्षणपद्धती | वसाहतीच्या काळातील भारतीय शिक्षणपद्धती |
|---|---|
| (१) प्राचीन वैदिक काळात संस्कृत भाषेतील वैदिक ग्रंथांचे अध्ययन-अध्यापन मौखिक पठण पद्धतीने केले जात असे. | (१) वसाहती राजवटीच्या कालखंडात उच्च शालेय पातळीवरील शिक्षण इंग्रजी भाषेतून दिले जात असे. |
| (२) स्त्रियांसह सर्व वर्णांतील व्यक्तीला शिक्षण घेण्याचा अधिकार आहे, असे प्रतिपादन करण्यात आले असले तरी शिक्षण सार्वत्रिक नव्हते. | (२) सर्व वंश, जाती, धर्म आणि वर्गांच्या मुला-मुलींना शाळा व महाविद्यालयांत प्रवेश घेण्याची मुभा होती. शिक्षण औपचारिक अर्थाने सार्वत्रिक होते. |
| (३) उपनयन संस्कारानंतर वैदिक शिक्षणासाठी विद्यार्थी गुरुकुलात जात असत आणि शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांचे वास्तव्य गुरुकुलात असे. | (३) शिक्षणासाठी मुले व मुली शाळा व महाविद्यालयांत प्रवेश घेत असत. बहुसंख्य विद्यार्थी स्वगृही राहूनच शाळेत/महाविद्यालयात जात असत. परगावच्या विद्यार्थ्यांचे वास्तव्य वसतिगृहात असे. |
| (४) वैदिक काळात लेखनकला अवगत नसल्याने विद्यार्थी वेदांमधील ज्ञान मुखोद्गत करीत असे. क्षत्रिय वर्णाच्या व्यक्तीला प्रशासन व युद्धनीतीचे, तर उद्योग-व्यवसायासाठी उपयुक्त शिक्षण वैश्य वर्णातील व्यक्तींना दिले जात असे. | (४) आधुनिक काळातील शिक्षणाचे विषय व अभ्यासक्रम धार्मिक नव्हे, तर लौकिक जीवनाशी संबंधित असत. यात गणित, विज्ञान, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, इतिहास इत्यादी विषयांचा समावेश असे. तांत्रिक व वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या उच्च शैक्षणिक संस्था स्थापन करण्यात आल्या. |

**प्र. ७ पुढे दिलेल्या संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा :** *(प्रत्येकी ४ गुण)*

***(१) वर्ण.**

**उत्तर :** वैदिक कालखंडातील वर्णव्यवस्था समाजातील व्यवसायाधिष्ठित वर्गवारीवर आधारलेली होती. समाजाची ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशा चार वर्णात विभागणी करण्यात आली होती. त्यामध्ये व्यवसायानुसार वर्ण बदलण्याइतकी लवचिकता होती. वैदिक कालखंडाच्या उत्तरार्धात मात्र यात बदल होत गेले आणि अधिक कडक निर्बंध असलेली 'पावित्र्य व विटाळ' या कल्पित गोष्टींवर उभारलेली जातिव्यवस्थेची उतरंड प्रस्थापित होत गेली. अन्न, पाणी यांचे प्राशन करणे, पोशाख, व्यवसाय, पूजापद्धती, सामाजिक व्यवहार, प्रवास इत्यादी सर्व गोष्टींवर या कल्पनांचा पगडा होता.

**उदाहरण :** पुरोहित व बुद्धिजीवी वर्गांचा समावेश ब्राह्मण वर्णांत; राज्यकर्ते व प्रशासक वर्गाचा समावेश क्षत्रिय वर्णात;

व्यापारी, शेतकरी व व्यावसायिकांचा समावेश वैश्य वर्णात; हीन आणि हलक्या दर्जाची कामे करणाऱ्यांचा समावेश क्षुद्र वर्णात करण्यात आला होता.

***(२) सामाजिक कायदे.**

**उत्तर :** सामाजिक कायद्यांचा संबंध हा सामाजिक न्याय, समाजकल्याण, अपेक्षित सामाजिक सुधारणा तसेच भारतीय समाजातील दुर्बल घटकांना संरक्षण देणे या गोष्टींशी आहे. समाजसुधारणांचा प्रयत्न करणारे गट आणि संघ यांची संख्या वाढल्यामुळे प्रचलित दुष्ट प्रथांवर बंदी आणणारे कायदे अमलात आणण्यासाठी ब्रिटिश सरकारवर दडपण आणणे त्यांना शक्य झाले. हे लक्षात घ्यायला हवे की, केवळ कायदे करून समाजपरिवर्तन साधता येत नाही. मात्र अन्याय, दडपशाही आणि शोषण यांसारख्या गोष्टींना बळी पडलेल्यांसाठी त्यातून आशा निर्माण होते.

**उदाहरण :** ब्रिटिश राजवटीत अनेक अनिष्ट प्रथा व रूढींचे निर्मूलन करणारे कायदे करण्यात आले. सन १८२९ मध्ये सती प्रतिबंध कायदा, तर सन १८५६ मध्ये विधवा पुनर्विवाह कायदा पारित करण्यात आला. स्वातंत्र्योत्तर कालखंडात सन १९६१ मध्ये हुंडा प्रतिबंधक कायदा, तर सन २००५ मध्ये कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा करण्यात आला.

**(३) नास्तिक.**

**उत्तर :** (१) भारतीय तत्त्वज्ञानातील षड्दर्शनांपैकी जैन आणि बौदध दर्शने यांना 'नास्तिक', म्हणजे ईश्वराचे अस्तित्व अमान्य करणारी, असे म्हटले जाते.

(२) चार्वाक दर्शन आणि आजीविका पंथ हेही भारतीय तत्त्वज्ञानाच्या नास्तिक परंपरेचे भाग आहेत.

(३) चार्वाकाचे तत्त्वज्ञान हे निरीश्वर आणि ऐहिक विचारसरणीच्या पायावर आधारलेले आहे.

(४) आजीवक पंथाचा उगम दैववाद आणि तापसी जीवनपद्धती यांतून झालेला आहे.

**(४) दीन-ई-इलाही.**

**उत्तर :** (१) इ.स. १५७९ मध्ये तत्कालीन मुघल बादशहा अकबर याने नैतिक तत्त्ववादाच्या आधारावर 'दीन-ई-इलाही' या नवीन धर्माची स्थापना केली.

(२) अस्तित्वात असलेल्या सर्व धर्मांचे मंथन करून त्याचे साररूप असलेल्या 'वैश्विक सहिष्णुते'च्या तत्त्वावर या धर्माची स्थापना केली.

(३) या धर्मात पुरोहित–धर्मगुरू, धार्मिक विधी, श्रद्धाप्रणाली आणि धर्मग्रंथास स्थान नव्हते.

(४) विविध धर्मांतील पवित्र ग्रंथांचे सार या धर्मात होते.

**(५) वंशविच्छेदाची भट्टी.**

**उत्तर :** (१) दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या काळात जर्मनीतील नाझी राजवटीने युरोपमध्ये प्रस्थापित केल्या गेलेल्या छळछावण्या वंशविच्छेदाची भट्टी म्हणून ओळखल्या जातात. इंग्रजी भाषेत त्यास Holocost असे म्हणतात.

(२) 'होलोकॉस्ट' या शब्दाला भयावह परिमाण प्राप्त झाले आहे. युरोपमधील लाखो ज्यू तसेच जिप्सी, समलैंगिक, समाजवादी, साम्यवादी आणि इतर लोकांना जिवंत जाळण्यात आले त्या घटनांचा निर्देश करण्यासाठी हा शब्द वापरला जातो.

(३) दुसऱ्या जागतिक महायुद्धात नाझी राजवटीने अमानुषपणे भट्टीत जिवंत जाळण्यात आलेल्यांची संख्या सुमारे ११ दशलक्षांच्या जवळपासची असल्याचा अंदाज आहे.

(४) स्वसंस्कृती श्रेष्ठतावादाच्या भ्रामक संकल्पनेतून 'अशुद्ध वंशाच्या लोकांच्या हत्ये'चे (Cleansing) हे भयावह उदाहरण आहे.

**(६) जैन.**

**उत्तर :** (१) जैन म्हणजे वर्धमान महावीरांचे अनुयायी.

(२) घोर तपश्चर्या केल्यानंतर वर्धमान महावीर यांना 'केवलज्ञान' प्राप्त झाले. केवलज्ञानाची प्राप्ती करणारे वर्धमान महावीर 'केवलिन', म्हणजेच 'सर्वज्ञ' म्हणून मान्यता पावले.

(३) 'केवलिन' (सर्वज्ञ) पदाची प्राप्ती झाल्यानंतर वर्धमान हे 'महावीर' आणि 'जिन' म्हणून ओळखले जाऊ लागले. ते 'निर्ग्रंथ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संप्रदायाचा भाग झाले. कालांतराने याच संप्रदायाला 'जैन' या नावाने संबोधण्यात येऊ लागले.

**(७) चैत्य.**

**उत्तर :** (१) चैत्य ही बौद्धधर्मीयांची प्रार्थनास्थळे हे स्पष्ट करतात की गौतम बुद्धांची तत्त्वप्रणाली ही स्थानिक श्रद्धाप्रणालींशी सुसंगत होती.

(२) तत्कालीन चैत्य हे पृथ्वीतत्त्व आणि भूतमात्रांची स्थानके असल्याचे मानले जाई.

(३) सामान्यजनांसाठी ती विनासायास आणि विनामूल्य प्रवेश असणारी पूजास्थाने होती. सनातनी समाजाबाहेरील साधू या चैत्यांभोवतीच्या प्रदेशात उभारण्यात आलेल्या विहारांत वास्तव्य करीत असत.

(४) चैत्यांत पूजेसाठी येणाऱ्या लोकांकडून भिक्खूंना भिक्षा मिळत असे. गौतम बुद्धांनीही प्रचलित प्रथेला मान देऊन आपल्या जनसामान्यांमधील अनुयायांनाही तसे करण्यास प्रवृत्त केले.

**(८) इस्लामी शिक्षण.**

**उत्तर :** (१) प्रेषित मुहम्मद पैगंबर यांच्या आदेशानुसार इस्लाम धर्माच्या सर्व अनुयायांनी ज्ञानप्राप्ती करणे बंधनकारक होते.

(२) मात्र इस्लामी राजवट असलेल्या भारतीय समाजात निरक्षरता सार्वत्रिक असल्याने कुराण व हदिथचे ज्ञान संपादन करणे कठीण होते.

(३) सर्व अनुयायांना इस्लाम धर्माचे ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी भारतातील इस्लामधर्मीय राज्यकर्त्यांनी इस्लाम धर्माचे शिक्षण देणारी पुढील त्रिस्तरीय यंत्रणा उभारली.

(अ) **मक्ताब :** मशिदीशी संलग्न असणारी प्राथमिक शिक्षण देणारी संस्था.

(ब) **मदरशा :** मशिदीशी संलग्न असणारी उच्च शिक्षण देणारी संस्था.

(क) **खानक्वा :** 'अल्लाह'विषयीच्या परमोच्च तत्त्वांचे शिक्षण देणारी केंद्रे.

**(९) पाश्चात्त्य शिक्षणपद्धती.**

**उत्तर :** (१) ब्रिटिशांनी भारतात प्रस्थापित केलेली शिक्षणपद्धती पाश्चात्त्य शिक्षणपद्धती म्हणून ओळखली जाते.

(२) शाळा आणि महाविद्यालये या संस्थात्मक आकृतिबंधाद्वारा आधुनिक, उदारमतवादी आणि धर्मनिरपेक्ष शिक्षण हे इंग्रजी भाषेतून दिले जाते.

(३) लॉर्ड मेकॉले याच्या शिफारशीनुसार गव्हर्नर-जनरल लॉर्ड बेंटिक यांनी १८३५ साली भारतात पाश्चात्त्य शिक्षण देण्याचा उपक्रम सुरू केला. सन १८५६ मध्ये मुंबई, कोलकाता आणि चेन्नई या शहरात विद्यापीठांची स्थापना झाली.

(४) गणित, विज्ञान, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, इतिहास इत्यादी विषयांचा अभ्यासक्रमात समावेश असतो. या शिक्षणाच्या मुशीतून भारतातील नवीन बुद्धिवादी वर्ग जन्माला आला.

(५) व्यक्तिवाद, स्वातंत्र्य, समता, न्याय, लोकशाही इत्यादी सामाजिक मूल्ये पाश्चात्त्य शिक्षणाने भारतात रुजवली.

**(१०) पाश्चात्त्यीकरण.**

**उत्तर :** (१) १९व्या शतकाच्या उत्तरार्धात सुशिक्षित अभिजन वर्गाने ब्रिटिश जीवनसरणीचे अनुकरण करण्याची सुरुवात केली.


(२) या प्रक्रियेला समाजशास्त्रज्ञ डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी westernisation पाश्चात्त्यीकरण असे नाव दिले.

(३) त्यांनी ब्रिटिशांच्या प्रभावाचे व्ययमूलक, वृद्धिमूलक, पुष्टिमूलक आणि संमिश्रतामूलक बदल असे वर्गीकरण केले आहे.


(४) खाद्य संस्कृती, पेहराव, सामाजिक रितीभाती, भाषा इत्यादी बाबतींत अभिजन वर्गात घडून येणारे बदलही पाश्चिमात्यीकरणाची उदाहरणे आहेत.

## प्र. ८ पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा : (४ गुण)


***(१) स्वातंत्र्योत्तर भारतातील राज्यसंस्था.**





**उत्तर :**





**(२) वर्णव्यवस्था.**




**उत्तर :**




**(३) आश्रम व्यवस्था.**




**उत्तर :**




**(४) इस्लाम धर्माचे पाच दंडक.**




**उत्तर :**




**प्र. ❾ पुढील विधान चूक की *बरोबर* हे सांगून सकारण स्पष्ट करा : *(प्रत्येकी ४ गुण)***

***(१) वसाहतवाद्यांच्या कायद्यांचा भारतीय समाजावर लक्षणीय प्रभाव पडला.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारणे :** (१) सन १८६१ च्या इंडियन कौन्सिल्स ॲक्टद्वारा भारतातील विधिमंडळाची स्थापना झाली. सन १८९२, १९०९ आणि १९१९ मध्ये त्यांची व्याप्ती विस्तृत करण्यात आली. सन १९३५ चा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट हा भारतीय संविधानाचा मूलाधार आहे.

(२) सन १८५६ च्या इंडियन युनिव्हर्सिटीज ॲक्टद्वारा भारतातील आधुनिक उच्च शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. त्यातून नवीन बुद्धिवादी वर्ग जन्माला आला आणि त्याने सामाजिक सुधारणेच्या चळवळी हाती घेतल्या.

(३) सन १८६१ च्या इंडियन सिव्हिल सर्व्हिस ॲक्टद्वारा आधुनिक भारतातील प्रशासकीय व्यवस्था निर्माण करण्यात आली. तर १८६१ च्या इंडियन हायकोर्ट ॲक्टद्वारा न्यायव्यवस्था निर्माण झाली.

(४) ब्रिटिश राज्यकर्त्यांनी अनिष्ट सामाजिक रूढी व प्रथांचे निर्मूलन करणारे कायदे केले. त्यांतून सामाजिक सुधारणांना चालना मिळाली.

***(२) बौद्ध धर्म हा भारत व भारताबाहेरील अनेक भागांमध्ये पसरला गेला.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारणे :** (१) गौतम बुद्धांनी वैदिक धर्मातील अनिष्ट प्रथा, वर्णभेद, पुरोहित वर्गाचे वर्चस्व, यज्ञविधी व पशुबळी यांना विरोध केला. समाजातील सर्व स्तरांतील व्यक्ती या धर्माकडे आकृष्ट झाल्याने त्याचा भारतात वेगाने प्रसार झाला.

(२) सम्राट अशोकासारख्या राज्यकर्त्यांनी बौद् धर्माला आश्रय दिल्याने त्याचा प्रसार भारतात आणि भारताबाहेर दूरवर झाला.

(३) तिबेट, चीन, मंगोलिया, म्यानमार, जावा, सुमात्रा, श्रीलंका इत्यादी बाहेरील देशांत बौद्ध धर्माचा प्रसार झाला.

(४) गौतम बुद्धांनी आपला उपदेश पाली या लोकभाषेत केल्याने त्यांचे विचार समाजातील सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचले.

**(३) जैन आणि बौद्ध धर्म बंडखोर धर्म होते.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारणे :** (१) वेदप्रामाण्य आणि पुरोहिताच्या वर्चस्वाला जैन व बौद्ध धर्मांनी विरोध केला.

(२) यज्ञविधी आणि पशुबळी या पद्धतींना त्यांनी विरोध केला.

(३) वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांच्या उपदेशात देव-मूर्तिपूजा या संकल्पनांचा समावेश नव्हता.

(४) त्यांनी समाजाच्या सर्व थरांतील व्यक्तींना प्रवेश दिला. त्यामुळे मोक्षप्राप्तीचा मार्ग विशिष्ट वर्गापुरता मर्यादित राहिला नाही.

**(४) भक्ती चळवळ सुधारणावादी होती.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारणे :** (१) भक्ती चळवळीने समाजातील स्तर आणि जातींमधील लोकांना सामावून घेतले.

(२) त्यांनी धार्मिक विधींच्या अतिरेकावर टीका केली. त्याऐवजी त्यांनी कीर्तन आणि अखंड नामस्मरणाचा मार्ग सुचवला.

(३) संत कबीर, संत रहीम आणि संत नानक यांनी अंधश्रद्धा, मूर्तिपूजा आणि जातिव्यवस्थेचा निषेध केला.

(४) त्यांनी समानता आणि मानवतेची शिकवण दिली.

**(५) गुप्त सत्तेचा काळ हा भारतातील अभिजात संस्कृतीचा काळ समजला जातो.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारणे :** (१) गुप्त सत्तेच्या काळात भारतीय समाजाने जीवनाच्या सर्व क्षेत्रांतील समृद्धी अनुभवली.

(२) ज्या गोष्टींमुळे भारतीय संस्कृतीची स्वतःची खास ओळख निर्माण झाली, त्या कला, विज्ञान, राजनीती, धर्म, तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र अशा सर्वच क्षेत्रांतील विकासाचा मूलभूत पाया या काळात घातला गेला.

(३) त्यांनी संपूर्ण भारत एकछत्री अमलाखाली आणला आणि भारत उपखंडात साम्राज्याचा विस्तार केला. दूरवरच्या देशांशी व्यापारसंबंध प्रस्थापित करून आर्थिक समृद्धी आणली.

(४) गुप्त राजांचे दरबार हे कलानिर्मिती आणि बौद्धिक मंथनाचा केंद्रबिंदू बनले होते. आर्यभट्टाने भूमिती, त्रिकोणमिती, विश्वोत्पत्तीशास्त्र या विषयांवर लेखन केले. पृथ्वी गोल असल्याचा सिद्धांतही त्याने मांडला.

(५) वराहमिहिराने खगोलशास्त्र आणि ज्योतिषशास्त्र यांविषयी लेखन केले. धन्वंतरीने औषधोपचारांविषयी लेखन केले.

(६) गुप्तकालीन समाजात शिक्षण आणि लेखन-वाचनाला विशेष महत्त्व होते.

**(६) उत्तर वैदिक कालखंडाच्या अखेरच्या टप्प्यात सोळा महाजन पदांचा उदय झाला.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारणे :** (१) सप्तसिंधूंच्या प्रदेशातून स्थलांतर केलेले वैदिक जन गंगा-यमुनेच्या दुआबात स्थिरावले.

(२) कालांतराने भौगोलिक सीमांनी बांधलेली आणि स्वतःची प्रशासनयंत्रणा असलेली जनपदे अस्तित्वात आली.

(३) या जनपदांत पुढे भौगोलिक विस्ताराची महत्त्वाकांक्षा निर्माण होऊन त्यांच्यात संघर्ष झाले.

(४) या सत्तासंघर्षात प्रबळ ठरलेल्या जनपदांनी जिंकून घेतलेल्या जनपदांचा भूप्रदेश आपल्या जनपदात सामावून घेऊन आपल्या सीमा विस्तारल्या.

त्यातूनच इसवी सन पूर्व ६०० च्या दरम्यान भारतीय उपखंडात सोळा महाजनपदांचा उदय झाला.

**(७) भारतात दुसऱ्या नागरीकरणाची सुरुवात झाली.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारणे :** (१) भारतात स्वतःची स्वतंत्र प्रशासनयंत्रणा असणारी जनपदे निर्माण झाली.

(२) कालांतराने त्यांच्यात भौगोलिक सीमांचा विस्तार करण्याची महत्त्वाकांक्षा निर्माण होऊन सत्तासंघर्ष सुरू झाला. या संघर्षातून भारतीय उपखंडात सोळा महाजनपदे अस्तित्वात आली.

(३) या महाजनपदांच्या राजधान्या आकारात आल्या. अनेक नगरे विकसित झाली. या जनपदांच्या काळातील मातीची भांडी, अवजारे, नाणी सापडली आहेत.

(४) या महाजनपदांचा व्यापार वाढला. नगरांचे सांस्कृतिक संबंध वाढले. त्यातूनच प्राचीन नागरी हडप्पा संस्कृतीप्रमाणे भारतात दुसऱ्या नागरीकरणाची सुरुवात झाली.

**प्र. १० आपले मत नोंदवा :** ***(प्रत्येकी ४ गुण)***

***(१) जैन आणि बौद्ध धर्मांमुळे लोकांमध्ये आशा निर्माण झाली.**

**उत्तर :** (१) उत्तर वैदिक काळात वर्णपद्धती अधिकाधिक ताठर होत गेली आणि तिचे रूपांतर उच्चनीचतेच्या स्तरांमध्ये झाले. पुरोहित वर्गाच्या वर्चस्वामुळे 'पवित्र आणि अपवित्र' या विचारांच्या आधारे समाजात बहुसंख्य असलेल्या शूद्र आणि अतिशूद्रांना सामाजिक अवहेलना व शोषणाला सामोरे जावे लागले.

(२) पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांना गौणत्व प्राप्त झाले.

(३) या प्रतिकूल परिस्थितीत वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांनी प्रस्थापित रूढी व परंपरांना विरोध केला. मोक्षाचा हक्कही समाजातील सर्व घटकांना असल्याचे प्रतिपादन केले.

(४) स्त्री-पुरुष समतेचा विचार लोकभाषेत मांडला. त्यामुळे सर्वसामान्य लोकांचा आत्मविश्वास वाढला आणि जीवनाविषयी आशा निर्माण झाली.

***(२) समाजसुधारणेच्या चळवळी २१व्या शतकातही सुरू आहेत.**

**उत्तर :** (१) सामाजिक विषमता, दुर्बल घटकांचे शोषण आणि त्यांच्यावर होणारे अन्याय हे प्राचीन काळापासून आजतागायत कायम आहे.

(२) वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांच्या बंडखोरीमुळे समाजाच्या सर्व स्तरांतील व्यक्ती आश्वस्त झाल्या.

(३) भक्तिसंप्रदायातील संतांच्या प्रयत्नांमुळे समतेचा आणि मानवतेचा संदेश सर्वदूर पोहोचला.

(४) ब्रिटिश राजवटीत काही अनिष्ट रूढी व प्रथांचे निर्मूलन करणारे कायदे झाले.

(५) स्वातंत्र्योत्तर कालखंडात समता आणि स्वातंत्र्य या विचारांना प्रतिष्ठा प्राप्त झाली.

(६) असे असूनही पर्यावरणाचा नाश, स्त्रियांवरील अत्याचार, दलित आणि आदिवासींचे शोषण चालूच आहे. त्यामुळेच त्या विरुद्ध संघर्ष करणाऱ्या २१व्या शतकात समाजसुधारणा चळवळी सुरूच आहेत.

**(३) जागतिकीकरण ही एक सामाजिक प्रक्रिया आहे.**

**उत्तर :** या विधानाशी मी सहमत आहे; कारण –

(१) जागतिकीकरण हे मूलतः देशाची अर्थव्यवस्था ही जागतिक अर्थव्यवस्थेशी संलग्न करण्याची प्रक्रिया आहे.

(२) जागतिकीकरणामुळे परंपरानिष्ठ भारतीय समाजव्यवस्था प्रभावित झाली आहे. आधुनिकतेकडे वाटचाल करणाऱ्या या पारंपरिक समाजात संक्रमणावस्थेतील मूल्य-संघर्ष उद्भवत आहे.

(३) विभक्त कुटुंबपद्धतीपलीकडचे अवस्था म्हणजेच, परदेशात स्थायिक झालेली मुले-मुली, सुना-नातवंडे आणि मायदेशी एकाकी

जीवन जगणारे वृद्ध पालक ही परिस्थिती असंख्य मध्यमवर्गीय कुटुंबांत निर्माण झाली आहे.

(४) जातिव्यवस्थेची जागा ही वर्गव्यवस्था घेत आहे. प्रत्येक व्यक्तीचा दर्जा त्याच्या आर्थिक प्राप्ती आणि संपत्तीच्या आधारे निर्धारित होत आहे. स्त्री-पुरुष समानता ही बाब सार्वत्रिकरीत्या स्वीकारली जात आहे.

म्हणजेच व्यापक अर्थाने जागतिकीकरण ही एक सामाजिक प्रक्रिया आहे.

**(४) जागतिकीकरणामुळे भारतात तीव्र असंतोष उद्भवला आहे.**

**उत्तर :** वरील विधानाशी मी सहमत आहे; कारण –

(१) जागतिकीकरणामुळे नव्या प्रकारची श्रमविभागणी उदयास आली आहे. त्याअंतर्गत विकसनशील देशांतील साधनसंपत्ती व श्रम शक्तीचा उपयोग करून बहुराष्ट्रीय कंपन्या प्रचंड नफा कमावत आहेत.

(२) विकसनशील आणि विकसित देशांतील आर्थिक दरी अधिक विस्तृत झाली आहे. या परिस्थितीस जागतिकीकरण जबाबदार आहे.

(३) जागतिकीकरणाचे फायदे हे विकसित देशांनी लाटल्याने विकसनशील देशांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते.

(४) जागतिकीकरण हा नव-साम्राज्यवाद आहे, अशी विकसनशील देशांतील लोकांची धारणा आहे.

**(५) उत्तर वैदिक कालखंडात भारतीय समाजाची अधोगती झाली.**

**उत्तर :** वरील विधानाशी मी सहमत आहे; कारण –

(१) पूर्व वैदिक काळात स्त्रियांना असणारी प्रतिष्ठा ही उत्तर वैदिक कालखंडात नष्ट झाली.

(२) वर्णव्यवस्थेचे ताठर जातिव्यवस्थेत परिवर्तन झाले.

(३) स्त्रिया व कनिष्ठ जातींच्या शोषणाला सैद्धांतिक आधार मिळाला.

(४) यज्ञविधी आणि पशुबळी या धार्मिक विधींचे महत्त्व वाढत जाऊन पौरोहित्य करणाऱ्या ब्राह्मण वर्गाचे श्रेष्ठत्व प्रस्थापित झाले.

## दीर्घोत्तरी प्रश्न

**प्र. ११ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : (कमीत-कमी १५० शब्द) (प्रत्येकी १० गुण)**

***प्रश्न १. पुढील मुद्द्यांच्या आधारे आजचा भारतीय समाज कसा बदलत गेला आहे, याची उदाहरणासहित चर्चा करा :**

[**मुद्दे :** *(अ) इंग्रजी भाषा हे शिक्षणाचे माध्यम (ब) मतदानासाठी असलेली वयोमर्यादा कमी होणे (क) सामाजिक कायदे (ड) वाहतूक आणि संपर्क (दळणवळण)*]

**उत्तर : (अ) इंग्रजी भाषा हे शिक्षणाचे माध्यम :** ब्रिटिश राजवटीत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण आणि इंग्रजी भाषा हे शिक्षणाचे माध्यम हे विचार भारतात रुजले. आपल्या उन्नतीसाठी समाजातील दुर्बल घटक हे इंग्रजी माध्यमातील उच्च शिक्षणाकडे वळले. जागतिकीकरणामुळे कुशल आणि अकुशल कामगारांना जगभर रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. म्हणजेच इंग्रजी माध्यमातील शिक्षण भारतीय समाजातील बदलाचे पायिक (Catalyst) बनला आहे.

**(ब) मतदानासाठी असलेली वयोमर्यादा कमी होणे :** सन १९४७ च्या आधी लोकशाही विचारप्रणालीविषयी सर्वसामान्य भारतीय अनभिज्ञ होते. भारताच्या संविधानाने सार्वत्रिक प्रौढ मताधिकार हे तत्त्व स्वीकारले आणि वयाची २१ वर्षे पूर्ण करणाऱ्या सर्व स्त्री-पुरुष नागरिकांना मताधिकार दिला. त्याचे पुढचे पाऊल म्हणजे मताधिकाराची वयोमर्यादा १८ वर्षे इतकी कमी झाल्याने १८ ते २१ या वयोगटातील तरुणांना मताधिकार प्राप्त झाला. त्याद्वारे राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी तरुणवर्गाला प्राप्त होणे हा एक उल्लेखनीय सामाजिक बदल आहे.

**(क) सामाजिक कायदे :** परंपरानिष्ठ आणि पुरुषसत्ताक भारतीय समाजात आदिवासी, शूद्र व अतिशूद्र आणि स्त्रियांवर अन्याय होत असे. त्यांचे अंशतः परिमार्जन ब्रिटिश राजवटीत सामाजिक सुधारणा कायद्यांमुळे झाले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात सामाजिक कायद्यांमुळे सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त झाली. म्हणजेच सामाजिक बदल प्रक्रियेला सामाजिक कायद्यांनी हातभार लावला.

**(ड) वाहतूक आणि संपर्क (दळणवळण) :** स्थितिशील भारतीय समाजात १९व्या शतकाच्या उत्तरार्धात वाहतूक आणि संपर्क साधनांतील प्रगतीमुळे बदलाचे वारे वाहू लागले. २०व्या शतकात वाहतूक व संपर्क साधनांत उत्तरोत्तर प्रगती होत गेली आणि सामाजिक बदलास गती प्राप्त झाली. २०व्या शतकाच्या उत्तरार्धात संगणक, आंतरजाल आणि स्मार्ट फोन हे सर्वसामान्यांच्या आवाक्यात आले. समाजातील सर्व घटक, निदान संपर्क माध्यमांच्या क्षेत्रात, समान पातळीवर आले.

**प्रश्न २. पुढील मुद्द्यांच्या आधारे वसाहती राजवट भारतास कशी उपकारक ठरली त्याचे विवरण करा.**

[**मुद्दे :** *(अ) प्रशासन व्यवस्था (ब) अर्थव्यवस्था (क) दळणवळण आणि संपर्क (ड) समाजसुधारणा चळवळी (ई) राष्ट्रवादी चळवळ*]

**उत्तर : (अ) प्रशासन व्यवस्था :** संपूर्ण भारतीय उपखंड ब्रिटिशांनी आपल्या नियंत्रणाखाली आणून, देश भौगोलिकरीत्या एकसंध केला. भारतासाठी ब्रिटिशांनी नवीन प्रशासकीय यंत्रणा उभारून, कार्यक्षम अधिकाऱ्यांकडे राज्यकारभाराची जबाबदारी सोपवली. प्रादेशिक व मध्यवर्ती विधिमंडळे स्थापन करून लोकशाही पद्धतीचा प्रारंभ केला. स्वतंत्र व निष्पक्ष न्याययंत्रणा उभारली. कायद्यासमोर समानता, कायद्याचे राज्य ही तत्त्वे रुजवली.

**(ब) अर्थव्यवस्था :** भारतात औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेचा प्रारंभ ब्रिटिशांनी केला. त्यातून औद्योगिक शहरे विकसित झाली.

नवीन उद्योगधंदे व कारखानदारी यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन घडून आले. निर्वाह अर्थव्यवस्थेची जागा निर्यातप्रधान अर्थव्यवस्थेने घेतली. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील औद्योगिकीकरणाची आणि आर्थिक विकासाची पायाभरणी ब्रिटीश राजवटीच्या कालखंडात झाली.

**(क) दळणवळण आणि संपर्क :** ब्रिटिशांनी भारतभर रेल्वेमार्ग व रस्त्यांचे जाळे निर्माण करून दळणवळणाच्या प्रगतीला चालना दिली. तार व टपाल या सेवा उपलब्ध करून दिल्या. या सुधारणांमुळे भारतीय कच्च्या मालास जागतिक बाजारपेठ उपलब्ध झाली.

**(ड) समाजसुधारणा चळवळी :** नवशिक्षित भारतीयांना उदारमतवादी मूल्याचा परिचय झाला. अनिष्ट सामाजिक चालीरीती-विरुद्ध त्यांनी आंदोलने उभारली. त्यांच्या दबावाखाली ब्रिटिश सरकारने सामाजिक सुधारणा करणारे सतीबंदी सारखे कायदे केले. कनिष्ठ जातीतील व्यक्तींना व स्त्रियांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली.

**(ई) राष्ट्रवादी चळवळ :** सुशिक्षित भारतीयांत राष्ट्रीय स्वातंत्र्याची आकांक्षा निर्माण करण्याचे कार्य उदारमतवादी शिक्षणाने केले. ब्रिटिशांनी निर्माण केलेले दळणवळण व संपर्काची साधने राष्ट्रवादी चळवळीचा प्रसार होण्यास उपयुक्त ठरली. इंडियन नॅशनल कॉंग्रेसच्या स्थापनेनंतर स्वातंत्र्याचा लढा उत्तरोत्तर तीव्र होत गेला. महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालील १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनानंतर १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले.

**प्रश्न ३. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारतीय समाजाच्या जडणघडणीचे विवरण करा.**

[**मुद्दे :** *(अ) भारतीय संविधान (ब) सामाजिक कायदे (क) अर्थव्यवस्था (ड) शिक्षण (ई) राजकीय/शासकीय यंत्रणा*]

**उत्तर : (अ) भारतीय संविधान :** ६ डिसेंबर १९४६ रोजी संविधान परिषदेने भारतीय संविधान निर्मितीची प्रक्रिया सुरू झाली. डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीने भारतीय संविधानाचा मसुदा तयार केला. स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुभाव या तत्त्वांचा उद्घोष संविधानाच्या सरनाम्यात करण्यात आला. लोकशाही शासनप्रणाली निर्माण करण्यात आली. सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या तत्त्वाच्या आधारे सर्व प्रौढ नागरिकांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. मतदान अधिकाराची वयोमर्यादा १९८९ साली २१ वर्षांवरून १८ वर्षे करण्यात आली.

**(ब) सामाजिक कायदे :** सामाजिक अन्यायाचे निवारण करणारे अनेक कायदे भारतीय संसदेने पारित केले. स्त्रियांच्या अधिकारांची जोपासना करणारे स्पेशल मॅरेज कायदा, हिंदू कोड बिल, हुंडा प्रतिबंधक कायदा, कौटुंबिक अत्याचार प्रतिबंधक कायदा इत्यादी संसदेने पारित केले. अनुसूचित जातींवरील अन्यायाचे परिमार्जन करणारे, बालकांच्या हक्कांचे संवर्धन करणारे आणि अन्य दुर्बल घटकांच्या अधिकारांचे संवर्धन करणारे कायदे करण्यात आले.

**(क) अर्थव्यवस्था :** भारताच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी १९५० साली नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली. १९५१ ते २०१५ या कालखंडात तेरा पंचवार्षिक योजना राबवण्यात आल्या. कृषिक्षेत्रात स्वयंपूर्णता गाठण्यात आली. औद्योगिकीकरणाला वेग मिळाला. १९९१ साली नवीन आर्थिक सुधारणांद्वारा भारताने जागतिकीकरणाचा स्वीकार केला. भारत आज जगातली एक अग्रगण्य अर्थव्यवस्था आहे.

**(ड) शिक्षण :** शिक्षणप्रसार आणि निरक्षरता निर्मूलन या क्षेत्रांत भारताने उल्लेखनीय प्रगती केली आहे. उच्च आणि तांत्रिक शिक्षणाचा देशव्यापी प्रसार झाला आहे. विविध स्तरांवर शिक्षण देणाऱ्या अंगणवाडी, शाळा, महाविद्यालये, व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था व विद्यापीठांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली आहे. उच्च शिक्षण प्राप्ती आणि इच्छुक व्यक्तींच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. सन २०१९ मध्ये नवीन शैक्षणिक धोरणाचा मसुदा तयार करण्यात आला आहे.

**(ई) राजकीय यंत्रणा :** भारतीय संविधानाने संघराज्यात्मक शासनपद्धतीद्वारा केंद्र सरकार, राज्य सरकारे व केंद्रशासित प्रदेश प्रस्थापित केले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सत्ता व अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ व न्यायमंडळ या तीन घटकांची मिळून शासकीय यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. लोकशाही पद्धतीचा स्वीकार केल्याने राष्ट्रीय आणि प्रादेशिक स्तरांवरील राजकीय पक्ष निवडणुकांत सहभागी होतात.

**कृती**

(१) बौद्ध धर्मातील 'अष्टांग मार्गा'ची माहिती गोळा करा.

(२) उत्तर वैदिक काळातील स्त्रिया आणि आधुनिक भारतीय स्त्रिया यांच्या सामाजिक स्थानाची चर्चा करा.

(३) काही अन्यायमूलक प्राचीन प्रथा-परंपरा आजही प्रचलित आहेत का? त्यांचा शोध घ्या.

(४) मध्ययुगीन मुस्लीम राजवटींचा चित्रकला, स्थापत्य आणि संगीत यावरील परिणामाचा शोध घ्या.

(५) समाज सुधारणेच्या चळवळी वर्तमान काळातही सुरू असल्याच्या कारणांची चर्चा करा.

# भारतीय समाजाचे वर्गीकरण

**अध्ययनघटक :**

२.१ भारतातील आदिम समुदाय

२.२ भारतातील ग्रामीण समुदाय

२.३ भारतातील शहरी समुदाय.

## महत्त्वाचे मुद्दे

**• प्रास्ताविक :**

भौगोलिक फरक आणि सामाजिक–सांस्कृतिक वैशिष्ट्यांच्या आधारे भारतीय समाजाचे आदिम (आदिवासी), ग्रामीण आणि शहरी असे तीन विभागांत वर्गीकरण केले जाते. आदिवासी जमातींची संस्कृती, भाषा, अर्थव्यवस्था आणि धर्म वैशिष्ट्यपूर्ण आहेत. आदिवासी जमाती या सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास समजल्या जातात. ग्रामीण आणि शहरी समाजांमध्ये भौतिक पर्यावरण, जीवनपद्धती, जातिव्यवस्था, वर्गव्यवस्था, कौटुंबिक रचना आणि धार्मिक श्रद्धा या बाबतींत भेद आढळतात. शहरी समाजामध्ये उद्योगक्षेत्र आणि सेवाक्षेत्र यांसारख्या बिगरकृषी क्षेत्रांचा समावेश होतो; तर ग्रामीण समाज कृषीप्रधान आहे.

### २.१ भारतातील आदिम समुदाय :

(१) **भौमिक देशमुख** यांच्या मते, 'आदिवासी' ही एक व्यापक संज्ञा आहे. व्यापक अर्थाने, यामध्ये बहुजिनसी वांशिक आणि आदिम गटांचा समावेश होतो. ते भारताचे मूळचे रहिवासी मानले जातात. हा भारतातील महत्त्वपूर्ण अल्पसंख्याक लोकसमूह आहे.

**हार्डीमन** यांच्या मते, आदिवासी म्हणजे 'वासाहतिक काळात 'समान कर्म' असलेल्या लोकांचा गट होय.'

(२) **आदिम समुदायाची व्याख्या : आंद्रे बेते**–ज्या समाजाच्या विशिष्ट भाषिक मर्यादा आणि सुनिश्चित राजकीय मर्यादा आहेत अशा समाजाला आदिम समाज असे म्हणता येईल. राजकीय मर्यादा म्हणजे समाजातील सदस्यांसाठी "वर्तनाच्या सुनिश्चित पद्धती बंधनकारक करणे असा अर्थ अभिप्रेत आहे. आदिम जमातींचे सांस्कृतिक परिक्षेत्रदेखील ठरलेले असते. सांस्कृतिक परिक्षेत्रातील नेमकी व्याख्या नसली तरी, त्यामध्ये ढोबळमानाने, चालीरीती, रूढी आणि सदस्यांच्या औपचारिक आणि अनौपचारिक आंतरक्रिया समाविष्ट असतात."

**तुम्हांला हे माहीत आहे का?**

भारतीय राज्यघटनेतील कलम ३४२ नुसार अनुसूचित केलेले समुदाय म्हणजे अनुसूचित जमाती होत.

यानुसार, भारताच्या राष्ट्रपतींनी जाहीर केल्यानुसार अनुसूचित जमातींची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :

- आदिम गुणवैशिष्ट्ये
- वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती
- भौगोलिक अलिप्तता
- व्यापक समुदायाशी संपर्क साधताना येणाऱ्या मर्यादा
- आर्थिक मागासलेपणा

(३) **भारतीय आदिवासींची भौगोलिक विभागणी :** एल. पी. विद्यार्थी (१९७७) यांनी भारतातील आदिवासींची पाच प्रकारांत विभागणी केली आहे. यासाठी पारिस्थितिकीय, सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय, वांशिक व्यवस्थेशी संबंधित निकषांचा आधार घेण्यात आला.

| प्रदेश | स्थान | आदिम जमातीची नावे |
|---|---|---|
| (१) हिमालय | याचे तीन उपप्रदेश आहेत :<br>(अ) ईशान्येकडील हिमालय प्रदेश<br>(आ) हिमालयाचा मध्य प्रदेश<br>(इ) वायव्येकडील हिमालय प्रदेश. | गारो, खासी, जैन्ता, नागा, मिझो, खासा, लेपचा, गाडी. |

| प्रदेश | स्थान | आदिम जमातीची नावे |
|---|---|---|
| (२) मध्य भारत | बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओदिसा, मध्य प्रदेश आणि छत्तीसगढ. भारतातील ५५% पेक्षा अधिक आदिम लोक याच भागांत राहतात. | गोंड, संथल, मुंडा, हो, ओरओन, बिरहोर. |
| (३) पश्चिम भारत | राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, गोवा, दादरा आणि नगर-हवेली. या प्रदेशांत जवळपास एक कोटी इतकी आदिम लोकांची संख्या आहे. | भिल्ल, कातकरी, वारली, बैना. |
| (४) दक्षिण भारत | आंध्र प्रदेश, तेलंगणा, तमिळनाडू, कर्नाटक आणि केरळ. भारतातील एक-षष्ठांश आदिम लोकसंख्या दक्षिण भागात आढळते. | तोडा, कोटा, इरुला, बदागा, चेंचू, कुरुंबा. |
| (५) बेटे | बंगालच्या उपसागरातील अंदमान आणि निकोबार बेटे, अरबी समुद्रातील लक्षद्वीप बेटे. | अंदमानी, निकोबारी, ओंगे, जरावा, सेंटीनलीज. |

**(४) भारतातील आदिम समुदायांची वैशिष्ट्ये :**

(१) **भौगोलिक अलिप्तता :** आदिम जमाती दूरवरच्या जंगलांत किंवा डोंगराळ भागांत पाडयांमध्ये राहतात.

(२) **आर्थिक जीवन :** त्यांचे आर्थिक जीवन पारंपरिक तंत्रांवर आधारित असते. त्यांच्या उपजीविकेची साधने स्थलांतरित शेती, वनोपज गोळा करणे, मासेमारी आणि शिकार ही आहेत. ते वस्तुविनिमय पद्धतीचा वापर करतात. आर्थिकदृष्ट्या ते मागास आणि दारिद्र्यात जीवन जगणारे आहेत.

(३) **अस्मितेची जाणिव :** आदिम लोक स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण ओळख जपतात. या अस्मितेमुळे आदिम समुदायातील लोक परस्परांशी जोडले जातात. विशिष्ट भौगोलिक सीमा हे आदिम समुदायाच्या अस्मितेचे मूळ होय. अस्मितेच्या जाणिवेमुळेच आदिवासी जमातींचे अस्तित्व टिकून राहते. प्रत्येक आदिम समुदायाचे एक विशिष्ट नाव असते. **उदा.,** वारली.

(४) **अंतर्विवाही समूह :** हा एक अंतर्विवाही समूह आहे. विवाह हा एक करार मानला जातो आणि घटस्फोट किंवा पुनर्विवाह निषिद्ध मानला जात नाही.

(५) **वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती आणि बोलीभाषा :** आदिम समाजाच्या सामाजिक रूढी, लोकसाहित्य ही आणि श्रद्धा याबाबत वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आहेत. प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतःची बोलीभाषा असते.

(६) **साधा समाज :** आदिम जमातींचे सामाजिक संबंध प्राथमिकपणे कौटुंबिक आणि नातेसंबंधांवर आधारित असल्याने या समाजाचे स्वरूप साधे असते.

(७) **साधा धर्म :** 'जीवात्मावाद', 'चेतनावाद', 'कुलप्रतीकवाद', 'निसर्गवाद' आणि 'मानववाद' हे आदिम जमातींच्या धर्माचे प्रकार होत. पवित्र वने हा आदिम समाजाचा अविभाज्य भाग आहे. काळी आणि पांढरी जादू यांवर त्यांचा विश्वास आहे.

| आदिम जमातींचा धर्म | संज्ञेचे प्रणेते |
|---|---|
| जीवात्मावाद | एडवर्ड टेलर |
| चेतनावाद | रॉबर्ट मॅरेट |
| कुलप्रतीकवाद | जेम्स फ्रेझर |
| मानावाद | रॉबर्ट मॅरेट |
| निसर्गवाद | मॅक्सम्युलर |

(८) **समुदायाचे प्रशासन :** प्रत्येक आदिम जमातींची प्रशासन व्यवस्था वैशिष्ट्यपूर्ण असते. जमातप्रमुख आणि ज्येष्ठांचे मंडळ प्रशासनाची जबाबदारी पार पाडतात. जमातीअंतर्गत प्रश्न सोडवण्यासाठी 'जमात पंचायत' असते. कौटुंबिक प्रश्न नातेवाइकांच्या मध्यस्थीने सोडवले जातात.

(९) **कुल संघटन :** कुल म्हणजे रक्तसंबंधाने बांधली गेलेली कुंटुबे. त्या वंशाची सुरुवात वास्तविक वा काल्पनिक व्यक्तीपासून झालेली असते. कुल संघटनेमुळे दृढ नातेसंबंध निर्माण होतात.

(१०) **समतावादी मूल्ये :** आदिम जमातीची सामाजिक संरचना ही समतावादी तत्त्वांवर आधारित असते. सामाजिक संबंधांची कोणतीही श्रेणीबद्ध रचना नसते. त्यामुळे आदिम समाजात जातिव्यवस्था किंवा लिंग-आधारित विषमता आढळून येत नाही.

**(५) आदिम समुदायाच्या समस्या :**

(१) **जंगल व आदिवासी जमिनींपासून अलगता :** बाह्य प्रदेशातील लोक आदिम समाजाची जमीन आणि तेथील संसाधनांचे शोषण करतात; तेव्हा आदिम समाजाचे निसर्गचक्र आणि त्यावर आधारित त्यांचे आयुष्य विस्कळीत होते. आदिम समाज जमिनींपासून अलग होण्याची सुरुवात ब्रिटिश कालखंडापासून झाली.

याखेरीज सावकार, जमीनदार आणि व्यापाऱ्यांनीही आदिम समाजाच्या जमिनींवर ताबा घेतला होता. औद्योगिकीकरण आणि धरण बांधकामांमुळे शासनानेही आदिम समाजाच्या जमिनींचे संपादन केले. आदिम समाजाची भूमी बिगर-आदिम समाजाकडे हस्तांतरित करणे किंवा विकणे याविरोधात अनेक राज्य सरकारांनी विविध कायदे पारित केले आहेत. असे असले तरी, आदिम समाजाची जंगल, जमिनींपासून अलगतेची समस्या पूर्णतः सुटलेली नाही.

(२) **दारिद्र्य आणि कर्जबाजारीपणा :** बहुतांश आदिम जमाती दारिद्र्यरेषेखाली आहेत. त्यांचे दरडोई उत्पन्न अत्यल्प आहे. त्यामुळे ते कर्जबाजारी आहेत. या परिस्थितीचा फायदा घेऊन स्थानिक सावकार/जमीनदार आदिवासींचे शोषण करतात.

(३) **अनारोग्य आणि कुपोषण :** आदिम जमाती पाण्यापासून होणाऱ्या संसर्गजन्य रोगांनी बाधित आहेत. लहान मुले जन्मतःच कुपोषित असतात. बालमृत्यूचे प्रमाण अधिक आहे. वैद्यक आणि आरोग्यरक्षणार्थ सुविधांची कमतरता असल्याने अनारोग्यात भर पडते.

(४) **निरक्षरता :** भारतात सर्वाधिक निरक्षरता आदिवासी समुदायात आहे. दारिद्र्यामुळे आदिवासी मुले शिक्षणापासून वंचित राहतात; कारण पालकांच्या अर्थार्जनात ते मदत करतात. शाळाही आदिवासींच्या वस्तीपासून दूर असतात. शाळेतील अभ्यासक्रम आदिवासींच्या भाषेत शिकवला जात नाही. मुलांना शिक्षणाची रुची निर्माण होत नाही.

(५) **वेठबिगारी :** भारतीय कायदाव्यवस्थेत वेठबिगारी बंदी असली तरी काही आदिम प्रदेशांत या प्रकारचे वेठबिगार आढळतात. आदिवासींची गंभीर दारिद्र्यावस्था, कर्जबाजारीपणा, वेठबिगारी आणि दारिद्र्य या समस्या परस्परांशी संबंधित आहेत.

(६) **स्थलांतरित शेती :** आदिम समाजाच्या स्थलांतरित शेतीमुळे मोठ्या प्रमाणात जंगलतोड व मातीची धूप होत असल्यामुळे ही एक समस्या मानली जाते.

**(६) स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे आदिवासी विकासाचे प्रयत्न :** स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आदिवासींचा विकास घडवून आणावयाचा होता. त्यांनी या संदर्भात दीर्घकालीन मार्गदर्शक तत्त्वे देऊ केली. ती **पंचशील** नावाने ओळखली जातात.

पंचशीलाची तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत :

(१) लोकांच्या गुणांनुसार त्यांचा विकास व्हावा. त्यांच्यावर कोणतीही बाह्य बाब लादणे आपण टाळूया.

(२) वनप्रदेशात आदिवासींच्या हक्कांचे संरक्षण व्हावे.

(३) प्रशासन आणि विकासासाठी आदिवासींना प्रशिक्षण देऊन त्यांची गटबांधणी करावी.

(४) आदिवासींच्या प्रदेशात गरजेपुरतेच प्रशासन करावे. त्यांच्यावर विविध योजनांचा भडिमारदेखील करू नये. त्यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांच्या विरोधात नव्हे तर त्यांच्या आधारानेच काम करावे.

(५) आदिम समाजावर किती पैसा गुंतवला त्याच्या सांख्यिकी मांडणीवरून परिणामांची पडताळणी करू नये; तर मानवी जीवनाच्या गुणवत्तेवरून ही परीक्षा व्हावी.

**शासनाचे आदिम विकास कार्यक्रम –**

आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे बांधणे, आदिवासी प्रदेशातील निरक्षर विभागात आदिवासी महिलांसाठी शैक्षणिक संकुल बांधणे. या योजनांअंतर्गत अशासकीय संस्था/शासन स्थापित स्वायत्त संस्था/शैक्षणिक आणि सहकार संस्थांसारख्या इतर संस्थांना निवडक प्रदेशांमध्ये शैक्षणिक संकुल बांधण्यासाठी संपूर्ण वित्त साहाय्य केले जाते. राज्य आदिवासी विकास सहकारी मंडळ आणि इतर मंडळांना, ग्रामीण धान्य बँकांना मदतनिधीचा पुरवठा करणे. स्वयंसेवी संस्था, आदिवासी विकासासाठी संशोधन आणि प्रशिक्षणासाठी अर्थसाहाय्य दिले जाते.

दहावी उत्तीर्ण आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, परदेशी जाण्यासाठी शिष्यवृत्ती आणि ग्रंथपेढ्या उपलब्ध करून देणे, गुणवत्ता आणि प्रशिक्षणाचा दर्जा सुधारणे, आदिवासी सल्लागार समिती, २० मुद्द्यांच्या कार्यक्रमातील ११ (बी) मुद्दा, आदिवासी विकास नीतीचे नवे स्वरूप इत्यादी. अशा विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून शासनाने आदिवासी लोकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले आहेत. मात्र, यातील सर्व कार्यक्रम यशस्वी झाले असे म्हणता येणार नाही. त्यामुळे आजही आदिवासींच्या समस्या आणि मागासलेपण कायम आहे.

## २.२ भारतातील ग्रामीण समुदाय :

**(१)** ग्रामीण समुदाय म्हणजे खेड्यांमध्ये राहणारे लोक होत. हा समाज नैसर्गिक संसाधनांवर अवलंबून असतो. ग्रामीण अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेती, पशुपालन आणि शेतीपूरक व्यवसायांवर आधारित असते. हा कृषिप्रधान समाज होय. ग्रामीण प्रदेशात लोकसंख्येची घनता कमी असते. ग्रामीण जीवनामध्ये पारंपरिक मूल्यव्यवस्थेला महत्त्व आहे. भारत हा प्रामुख्याने खेड्यांचा देश आहे.

**(२) ग्रामीण समुदायाची व्याख्या : ए. डब्ल्यू. ग्रीन –** ''खेडे समुदाय अथवा ग्रामीण समुदाय मर्यादित भूप्रदेशात निवास करणारा लोकसमूह होय. या प्रदेशातील सर्वांची जीवनपद्धती समान असते.''

सन २०११ च्या जनगणनेनुसार ग्रामीण समुदाय म्हणजे जवळपास ५००० लोकांचा समुदाय होय. हा समुदाय कृषी आणि पूरक व्यवसायांवर अवलंबून असतो. या समुदायाचे विशिष्ट भौगोलिक प्रदेशात कायम-स्वरूपी वास्तव्य असते. समुदायाच्या काही सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक रूढी समान असतात.

२०११ च्या जनगणनेनुसार भारतातील लोकसंख्येच्या ६८.८४% लोक ग्रामीण भागात ६.४ लक्ष खेड्यांमध्ये राहतात.

**(३) ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये :**

(१) **ग्राम समुदाय :** ग्रामीण भागामध्ये रहिवाशांच्या गरजांची पूर्तता केली जाते. ग्रामीण समुदायामध्ये ऐक्यभावना अस्तित्वात असते.

(२) **आकाराने लहान भूप्रदेश :** ग्रामीण प्रदेशाचा आकार लहान आणि तेथील लोकसंख्येची घनता कमी असते.

(३) **कृषी क्षेत्राचे वर्चस्व :** ग्रामीण प्रदेशात कृषी व्यवसाय प्रमुख आहे.

(४) **अनौपचारिकता :** भारतीय खेड्यांमध्ये प्राथमिक संबंधांचा पगडा आहे. ग्रामीण संबंधांमध्ये अनौपचारिकता, व्यक्तिगतता आणि समावेशकता असते.

(५) **सामाजिक एकजिनसीपणा :** ग्रामीण प्रदेशात विचार, वर्तन, पोशाख, कृती आणि जगण्यामध्ये एकजिनसीपणा असतो. परंपरा आणि रूढींना अनुसरून वर्तन करण्याची वृत्ती ग्रामीण भागात आढळते.

(६) **कुटुंबाला महत्त्व :** कुटुंब व्यवस्था ग्रामीण समुदायाच्या केंद्रस्थानी आहे. एकत्र कुटुंबपद्धती हा एकेकाळी ग्रामीण समुदायाचा आधारस्तंभ होता.

(७) **स्त्रियांचे स्थान :** ग्रामीण भागातील स्त्रिया आजही पुरुषप्रधान नियंत्रणाखाली राहतात. येथील स्त्री आणि पुरुषांच्या मनात 'पातिव्रत्य' (स्त्रियांची वैवाहिक निष्ठा) ही आदर्श भावना कोरली गेली आहे. स्त्रियांचे स्थान दुय्यम असते.

(८) **धर्मश्रद्धा :** धर्म, देव आणि धार्मिक परंपरांवर ग्रामीण समुदायाचा प्रगाढ विश्वास आहे. प्रत्येक गावाची एक 'ग्रामदेवता' असते.

(९) **जातिव्यवस्थेचा पगडा :** ग्रामीण समाजाच्या जीवनापासून जातिव्यवस्था वेगळी करता येणार नाही. जातिव्यवस्था श्रेणीरचनेवर आधारित आहे. बलुतापद्धती विविध जातींचे परस्परावलंबत्व दर्शवते.

**(४) ग्रामीण समुदायाच्या समस्या :**

(१) **दारिद्र्य :** ग्रामीण भागातील बहुतांश लोक दारिद्र्यरेषेखाली असतात. ग्रामीण गरीब लोकांमध्ये सीमांत आणि अल्प भूधारक शेतकरी, भूमिहीन शेतमजूर आणि ग्रामीण कारागीर यांचा समावेश होतो.

(२) **निरक्षरता :** शहरी लोकसंख्येशी तुलना करता, ग्रामीण भागात निरक्षरतेचे प्रमाण अधिक असते. याव्यतिरिक्त ग्रामीण भागातील शिक्षणाची गुणवत्ता ही चिंताजनक बाब आहे.

(३) **पारंपरिकता, पुराणमतवाद आणि अंधश्रद्धा :** भारत आजही पुराणमतवादी समाज आहे. येथील लोकांचे विचार आणि श्रद्धा पारंपरिक आहेत.

(४) **जातिव्यवस्थेचा प्रभाव :** जातिव्यवस्था लोकांच्या विचारांत इतकी भिनली आहे की, सामाजिक संबंध या व्यवस्थेमुळे आकार घेतात. असे असले तरी, दैनंदिन व्यवहारांमध्ये लोक एकमेकांना सहकार्य करतात.

(५) **शेतकऱ्यांच्या आत्महत्या :** शेतकरी आत्महत्या ही गंभीर स्वरूपाची समस्या आहे; कारण बहुतांश लोक उपजीविकेसाठी कृषी व्यवसायावर अवलंबून आहेत.

(६) **स्त्रियांचे दुय्यम स्थान :** कुटुंब, धर्म, रूढी आणि परंपरांच्या नियंत्रणामुळे समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान आहे. समाजाच्या प्रत्येक स्तरावर पितृसत्ताक मूल्ये आणि पद्धतींचा पगडा आहे.

(७) **कौटुंबिक वाद :** जमिनींच्या मालकीवरून ग्रामीण भागांमध्ये कौटुंबिक वाद होणे ही बाब नवीन नाही. अशा तंट्यांमुळे अनेक संयुक्त कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. कुटुंबातील अनेक सदस्यांमध्ये जमिनींची वाटणी झाल्याने जमिनींच्या तुकड्यांवर पीक घेणे शक्य होत नाही.

**(५) ग्रामीण विकासाचे प्रयत्न :** स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सन १९५२ मध्ये 'समुदाय विकास कार्यक्रम' राबवण्यात आले. खेड्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला. ग्रामीण समुदायाच्या कल्याणासाठी ग्रामस्थांनी विकास प्रक्रियेत सहभागी व्हावे हा समुदाय विकास कार्यक्रमांचा उद्देश होता. सन १९५९ मध्ये पंचायत-राज व्यवस्था स्थापन करण्यात आली.

**तुम्हांला हे माहीत आहे का?**

**भारत सरकारने ग्रामीण विकासासाठी अलीकडे हाती घेतलेल्या काही योजना :**

(१) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना.
(२) दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना.
(३) स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना (SGSY)
(४) प्रधानमंत्री ग्रामीण विकास शिष्यवृत्ती योजना.
(५) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGS)
(६) सर्व शिक्षा अभियान (SSA)
(७) संसद आदर्श ग्राम योजना (SGSY)
(८) राष्ट्रीय सामाजिक साहाय्य कार्यक्रम
(९) प्रधानमंत्री आवास योजना/इंदिरा आवास योजना.
(१०) अंत्योदय अन्न योजना. (AAY)

## २.३ भारतातील शहरी समुदाय :

**(१)** शहरी भाग किंवा शहरी भागातील लोकांचे एकत्रीकरण ही एक मानवी वसाहत होय; लोकसंख्येची अधिक घनता आणि पायाभूत सोयीसुविधांची उपलब्धता ही या शहरी मानवी वसाहतीची वैशिष्ट्ये होत. शहरे, नगरे आणि उपनगरे असे शहरी भागाचे वर्गीकरण केले जाते.

**(२) शहरी समुदायाची व्याख्या :**

**(अ) मॅक्स वेबर :** पुढील पाच लक्षणांवरून शहरी समुदायाची व्याख्या स्पष्ट होते : (१) ठरावीक भूप्रदेश (२) बाजारपेठ (३) कायदे संहिता आणि न्यायव्यवस्था (४) शहरी नागरिकांच्या संघटनेतून नागरी सहकार्याची जाणीव आणि (५) शहरातील अधिकारी नेमण्यासाठी शहरातील नागरिकांना पुरेशी राजकीय स्वायत्तता.

**(ब) मेरियम–वेब्स्टर शब्दकोश :** ''ज्या समाजामध्ये आधुनिक औद्योगिक स्वरूपाचे नागरीकरण झाले आहे आणि जेथील सांस्कृतिक परंपरा वैविध्यपूर्ण आहे तो समाज शहरी समाज होय. अशा समाजात धर्मनिरपेक्ष मूल्यांवर भर आहे. मात्र, ही मूल्ये समाजकेंद्री नसून व्यक्तिकेंद्री आहेत.''

**(३) शहरी समुदायाची वैशिष्ट्ये :**

(१) **बहुजिनसीपणा :** शहरी समुदायात सामाजिक आणि सांस्कृतिक बहुजिनसीपणा हा विविध वर्ग आणि व्यवसाय यांमध्ये पाहावयास मिळतो. जाती, भाषा आणि धर्म या बाबींमध्ये शहरी भागांमध्ये संमिश्रता आणि विविधता असते.

(२) **लोकसंख्येची अधिक घनता :** शहरांमध्ये आणि नगरांमध्ये लोकसंख्येची घनता अधिक असते.

**तुम्हांला हे माहीत आहे का?**

मुंबई शहराच्या एकूण भूप्रदेशावरील एक-षष्ठांश भाग एक हजार माणसांनी व्यापलेला आहे. प्रत्यक्षात बृहन्मुंबईच्या आराखड्यानुसार, हजार माणसांनी चार एकर भाग व्यापलेला असावा असे सुचवण्यात आले आहे. भारतातील महानगरांमध्ये 'निरपेक्ष' आणि 'सापेक्ष' अशा दोन्ही प्रकारची दाटीवाटी आढळते. शहरांमध्ये लोकसंख्येची घनता प्रचंड आणि म्हणून निरपेक्ष आणि घनता अधिक नसली तरी शहरातील लोकांना सोयी-सुविधा पुरवण्याची समस्या असल्याने त्याचे स्वरूप सापेक्ष आहे. यामुळे निवास, वीजपुरवठा, पाणीपुरवठा, दळणवळण, रोजगार यांसारख्या पायाभूत सोयी-सुविधांवर प्रचंड ताण येत आहे. दिल्ली शहरातील लोकसंख्येची घनता कमी करण्यासाठी दिल्लीच्या परिघामध्ये गावे विकसित करण्याचा प्रयोग फारसा यशस्वी ठरलेला नाही.

(३) **विभिन्न व्यवसाय :** शहरातील व्यवसायांचे विशेषीकरण झालेले आहे. व्यवसायासाठी आवश्यक श्रमविभाजन आणि विशेष संधींची उपलब्धता आहे. उत्पादन, व्यापार आणि वाणिज्य, व्यावसायिक आणि शासकीय सेवा हे शहरी भागातील प्रमुख व्यवसाय आहेत.

(४) **सामाजिक गतिशीलता :** शहरी भागातील लोक जेव्हा सामाजिक वर्गव्यवस्था आत्मसात करतात; तेव्हा जातिव्यवस्था क्षीण होऊन त्यांची सामाजिक गतिशीलता वाढते.

(५) **दुय्यम नातेसंबंध :** शहरी समाजात व्यक्तींतील नातेसंबंध दुय्यम व औपचारिक स्वरूपाचे आहेत.

(६) **बाजारपेठ-आधारित अर्थव्यवस्था :** शहरांतील आर्थिक संघटन हे बाजारपेठ आणि चलन अर्थव्यवस्थेवर आधारित आहे. बाजारपेठ विकसन हे आजच्या शहरी केंद्रांचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

(७) **सुधारित पायाभूत सोयी-सुविधा :** गॅस, टेलिफोन, पिण्याचे पाणी, इंटरनेट, रस्ते जाळे, विमानतळ, मेट्रो रेल्वे, खरेदी मॉल, व्यावसायिक केंद्रे इत्यादी नागरी सोयी-सुविधा शहरांमध्ये उपलब्ध असतात.

(८) **विभक्त कुटुंबपद्धती :** शहरी भागात व्यक्ति-केंद्रिततेमुळे येथील विभक्त कुटुंबांची संख्या वाढते आहे.

(९) **पुरोगामी :** सुशिक्षित व्यक्तींत हक्कांची जाणीव असून ते पुरोगामी आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील आधुनिक घडामोडींशी येथील लोक संपर्कात येतात.

(१०) **औपचारिक सामाजिक नियंत्रण :** कायदे, विधिविधान, पोलीस यंत्रणा आणि न्यायालये ही औपचारिक यंत्रणा लोकांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवते.

(११) **गुंतागुंतीचे श्रमविभाजन :** शहरी भागात स्पष्ट आणि विशेषीकृत श्रमविभाजन आढळते. संस्थेच्या मागण्यांनुसार लोकांना त्यांच्या कामाचे प्रशिक्षण दिले जाते. विविध व्यवसायांचे एकमेकांवरील अवलंबित्व दिसून येते.

**(४) शहरी समुदायाच्या प्रमुख समस्या :**

(१) **अस्ताव्यस्त शहरे :** लोकसंख्या आणि भौगोलिक संदर्भाने शहरांचा वाढता पसारा हे शहरी समस्यांचे मूळ आहे. शहरांच्या अवाढव्य आकारामुळे समस्यांवर तोडगा काढण्यासाठी येथील अर्थव्यवस्था अपुरी पडते.

(२) **दाटीवाटी :** कमीत कमी जागेत भरपूर लोक राहतात अशी दाटीवाटीची परिस्थिती शहरांमध्ये आढळते. शहरी भागांतील लोकसंख्या वाढल्याने त्याचा परिणाम म्हणजे निवास व्यवस्थेची कमतरता.

(३) **झोपडपट्ट्या :** झोपडपट्ट्यांची समस्या गंभीर आहे. मुंबई शहरामध्ये जवळपास ५० टक्के लोकसंख्या झोपडपट्ट्यांमध्ये राहते. महानगरपालिकेने या लोकांचे पुनर्वसन करण्याचे प्रयत्न केले असले तरी ही समस्या अजून सुटलेली नाही. चंदीगढसारख्या नियोजित शहरामध्येही झोपडपट्ट्यांची समस्या आहे.

**तुम्हांला हे माहीत आहे का?**

**भारतातील विविध शहरांमध्ये झोपडपट्ट्यांसाठी वेगवेगळ्या संज्ञा वापरल्या जातात.**

| शहर | झोपडपट्ट्यांसाठी संज्ञा |
|---|---|
| मुंबई | झोपडपट्टी |
| दिल्ली | झुग्गी – झोंपडी |
| कोलकाता | बस्ती |
| चेन्नई | चेरी |
| बेंगळुरू | केरी |
| कानपूर | आहाता |
| जयपूर | कच्ची बस्ती |
| भोपाळ, इंदूर | गंदी बस्ती |
| चहा मळ्यांच्या भागात | बराक |
| खाणींच्या भागात | घोबारा |

(४) **बेरोजगारी :** भारतातील शहरी बेरोजगारीचे प्रमाण श्रमिकांच्या प्रमाणाच्या १५ – २५ टक्के इतके आहे. शिक्षित लोकांमध्ये ही टक्केवारी अजून जास्त आहे.

(५) **भिक्षावृत्ती :** शिक्षण आणि कौशल्यांची कमतरता असल्यामुळे शहरातील गरीब लोक हे भिक्षावृत्तीकडे वळताना दिसतात. मोठ्या शहरांमध्ये भिक्षेकऱ्यांच्या संघटित टोळ्या सक्रिय असल्याचे आढळते.

(६) **दळणवळण :** वाहतुकीचे प्रमाण आणि वाहतूक कोंडीमुळे भारतातील जवळजवळ प्रत्येक शहर आणि गावामध्ये सार्वजनिक वाहतुकीची समस्या गंभीर आहे.

(७) **पाण्याचा तुटवडा :** शहरांचे आकारमान आणि तेथील लोकसंख्या वाढू लागली तसा पाणीपुरवठा कमी पडू लागला. आज व्यावहारिक दृष्टिकोनातून पाहिले असता, भारतातील कोणत्याही शहरामध्ये नागरिकांच्या गरजा भागवण्यासाठी पुरेसा पाणीपुरवठा होत नाही.

(८) **सांडपाण्याच्या विल्हेवाटीची समस्या :** अपुऱ्या किंवा अपरिणामकारक सांडपाण्याच्या व्यवस्था ही भारतातील बहुतांश शहरी भागांची समस्या आहे. भारतातील एकाही शहरात सांडपाण्याची सुयोग्य व्यवस्था नाही.

(९) **कचऱ्याची विल्हेवाट :** भारतातील शहरांची संख्या आणि आकारमान वाढल्यामुळे कचरा विनियोगाची समस्या गंभीर बनली आहे. शहरांमध्ये निर्माण होणारा प्रचंड कचरा आरोग्यास हानिकारक आहे.

(१०) **शहरी गुन्हेगारी :** संघटित टोळ्यांद्वारा पैसा व बळाचा वापर करून लोकांना वेठीस धरले जात आहे. अभिजन वर्गाच्या आशीर्वादाने गुन्हेगारी फोफावत आहे. झोपडपट्ट्यांप्रमाणेच पांढरपेशा वर्गात गुन्हेगारी करण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

**(५) शहरी विकासाचे प्रयत्न :** अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू असलेल्या शहरी भागाचा विकास होणे गरजेचे आहे. त्यासाठीचे विकास कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहेत :

(१) गरिबांसाठी शहरीमूलभूत सेवा कार्यक्रम

(२) शहरी झोपडपट्ट्यांतील पर्यावरणीय सुधारणा कार्यक्रम

(३) लहान आणि मध्यम गावांचा एकत्रित विकास कार्यक्रम

(४) निवास आणि शहरी विकास मंडळाच्या (हुडको) विविध निवास आणि पायाभूत सोयी-सुविधांना पतपुरवठा करणाऱ्या योजना

(५) मेगा शहर प्रकल्प आणि

(६) एकत्रिकृत शहरी दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम.

**भारतातील अलीकडचे शहर विकास कार्यक्रम**

(१) स्मार्ट सिटी मिशन

(२) अटल मिशन फॉर रेज्यूव्हिनेशन अँड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन (अमृत) प्रोजेक्ट.

(३) प्रधानमंत्री आवास योजना किंवा हाऊसिंग फॉर ऑल बाय २०२२ मिशन

(४) हेरिटेज सिटी डेव्हलपमेन्ट अँड ऑगमेंटेशन योजना (हृदय)

(५) जवाहरलाल नेहरू नॅशनल अर्बन रिनीव्हल मिशन

(६) अर्बन ट्रान्स्पोर्टेशन

(७) स्वच्छ भारत मिशन

## प्रश्नोत्तरे

### वस्तुनिष्ठ प्रश्न

**प्र. १ कंसातील पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण करा :** ***(प्रत्येकी १ गुण)***

**[ १ ]**

*(१) ------- समुदायामध्ये दुय्यम प्रकारचे नातेसंबंध महत्त्वाचे असतात. *(ग्रामीण, आदिवासी, शहरी)*

*(२) ५५% पेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या भारताच्या ------- भागात आढळते. *(पश्चिम, मध्य, दक्षिण)*

(३) ग्रामीण समुदायात लोकांचे संबंध --------- स्वरूपाचे असतात. *(औपचारिक, प्राथमिक, दुय्यम)*

(४) --------- समुदायात ऐच्छिक संस्था विपुल प्रमाणात आढळतात. *(आदिवासी, ग्रामीण, नागरी)*

(५) --------- समुदायात श्रमविभागणी आणि विशेषीकरणाला अधिक वाव असतो. *(आदिवासी, ग्रामीण, नागर)*

**उत्तरे :**

(१) शहरी समुदायामध्ये दुय्यम प्रकारचे नातेसंबंध महत्त्वाचे असतात.

(२) ५५% पेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या भारताच्या मध्य भागात आढळते.

(३) ग्रामीण समुदायात लोकांचे संबंध प्राथमिक स्वरूपाचे असतात.

(४) नागरी समुदायात ऐच्छिक संस्था विपुल प्रमाणात आढळतात.

(५) नागर समुदायात श्रमविभागणी आणि विशेषीकरणाला अधिक वाव असतो.

**[ २ ]**

(१) ग्रामीण समुदायाचे स्वरूप --------- आहे. *(औपचारिक, गुंतागुंतीचे, एकजिनसी)*

(२) ग्राम पंचायत --------- पातळीवर स्थापन केली जाते. *(गट, जिल्हा, ग्राम)*

(३) भारतीय राज्यघटनेस आदिम लोकांसाठी --------- ही संज्ञा वापरली आहे. *(अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, गिरिजन)*

(४) आदिम लोक भारताचे मूळ रहिवासी आहेत असे मानले जाते. त्यामुळे त्यांना --------- असे म्हटले जाते. *(भूमिपुत्र, आदिवासी, मूळ जमाती)*

(५) नागरी समुदायावर --------- स्वरूपाचे नियंत्रण असते. *(धार्मिक, सामाजिक, औपचारिक)*

**उत्तरे :**

(१) ग्रामीण समुदायाचे स्वरूप एकजिनसी आहे.

(२) ग्राम पंचायत ग्राम पातळीवर स्थापन केली जाते.

(३) भारतीय राज्यघटनेस आदिम लोकांसाठी अनुसूचित जमाती ही संज्ञा वापरली आहे.

(४) आदिम लोक भारताचे मूळ रहिवासी आहेत असे मानले जाते. त्यामुळे त्यांना आदिवासी असे म्हटले जाते.

(५) नागरी समुदायावर औपचारिक स्वरूपाचे नियंत्रण असते.

**[ ३ ]**

(१) --------- तंत्रज्ञान हे आदिवासी समुदायाचे लक्षण आहे. *(अविकसित, विकसित, परंपरागत)*

(२) --------- समुदायात स्थलांतरित शेतीचा अवलंब केला जातो. *(ग्रामीण, आदिम, नागरी)*

(३) आदिवासी जमातीची स्वतःची --------- असते. *(भाषा, बोलीभाषा, लिपी)*

(४) आदिवासी समुदायात --------- संबंधाला जास्त महत्त्व असते. *(स्थानिक, रक्त, वैवाहिक)*

(५) सामाजिक सजातीयता हे --------- समुदायाचे वैशिष्ट्य आहे. *(औद्योगिक, ग्रामीण, नागर)*

**उत्तरे :**

(१) अविकसित तंत्रज्ञान हे आदिवासी समुदायाचे लक्षण आहे.

(२) आदिम समुदायात स्थलांतरित शेतीचा अवलंब केला जातो.

(३) आदिवासी जमातीची स्वतःची बोलीभाषा असते.

(४) आदिवासी समुदायात रक्त संबंधाला जास्त महत्त्व असते.
(५) सामाजिक सजातीयता हे ग्रामीण समुदायाचे वैशिष्ट्य आहे.

**[ ४ ]**

(१) दलितांसह --------- समुदाय भारतातील सीमांत समुदाय आहे. *(आदिवासी, स्त्री, अल्पसंख्य)*
(२) जीवात्मवाद, चेतनावाद आणि कुलप्रतीकवाद ही --------- समुदायाची श्रद्धास्थाने आहेत. *(आदिम, ग्रामीण, नागर)*
(३) व्याघ्रदेवता ही सर्वोच्च देवता आहे, अशी ---------तील अनेक आदिम जमातींची श्रद्धा आहे. *(नागालँड, कर्नाटक, महाराष्ट्र)*
(४) आदिवासी विकास घडवून आणण्यासाठी प्रधानमंत्री --------- यांनी 'पंचशील' तत्त्वज्ञानाची मांडणी केली. *(नरेंद्र मोदी, पी. व्ही. नरसिंहराव, जवाहरलाल नेहरू)*
(५) बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशींनुसार --------- स्थापना करण्यात आली. *(ग्राम पंचायतीची, पंचायतीराजची, सहकारी बँकांची)*

**उत्तरे :**
(१) दलितांसह आदिवासी समुदाय भारतातील सीमांत समुदाय आहे.
(२) जीवात्मवाद, चेतनावाद आणि कुलप्रतीकवाद ही आदिम समुदायाची श्रद्धास्थाने आहेत.
(३) व्याघ्रदेवता ही सर्वोच्च देवता आहे, अशी महाराष्ट्रातील अनेक आदिम जमातींची श्रद्धा आहे.
(४) आदिवासी विकास घडवून आणण्यासाठी प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू यांनी 'पंचशील' तत्त्वज्ञानाची मांडणी केली.
(५) बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशींनुसार पंचायती राजची स्थापना करण्यात आली.

**[ ५ ]**

(१) सन २०११च्या जनगणनेनुसार भारतातील लोकसंख्येच्या ---------% लोक ग्रामीण भागात राहतात. *(६४.२०, ६८.८४, ८६.८४)*
(२) पंचायतीराज ही --------- व्यवस्था आहे. *(एकस्तरीय, द्वीस्तरीय, त्रिस्तरीय)*
(३) --------- संस्था ग्रामीण समुदायाच्या केंद्रस्थानी आहे. *(कुटुंब, जाती, धर्म)*
(४) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम सन --------- पासून राबवण्यात आला. *(१९५२, १९७९, २०१४)*
(५) बाजारपेठ-आधारित अर्थव्यवस्था --------- समुदायांचे वैशिष्ट्य आहे. *(शहरी, आंतरराष्ट्रीय, ग्रामीण)*

**उत्तरे :**
(१) सन २०११च्या जनगणनेनुसार भारतातील लोकसंख्येच्या ६८.८४% लोक ग्रामीण भागात राहतात.
(२) पंचायती राज ही त्रिस्तरीय व्यवस्था आहे.
(३) कुटुंब संस्था ग्रामीण समुदायाच्या केंद्रस्थानी आहे.
(४) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम सन १९७९ पासून राबवण्यात आला.
(५) बाजारपेठ-आधारित अर्थव्यवस्था शहरी समुदायांचे वैशिष्ट्य आहे.

## प्र. २ पुढील प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व दुरुस्त करून लिहा : *(प्रत्येकी १ गुण)*

**[ १ ]**

*(१) (अ) जमीन मालक – जमीनदार
(ब) ग्रामीण विकासासाठी घेतलेला पुढाकार – समुदाय विकास कार्यक्रम
(क) शासनाची त्रिस्तरीय व्यवस्था – एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम
(ड) प्राथमिक व्यवसाय – पारंपरिक समाज.

**(२)** (अ) शहरी समुदाय – व्यक्तिवादाचा प्रभाव
(ब) ग्रामीण समुदाय – औद्योगिकीकरण
(क) आदिवासी समुदाय – बोलीभाषा
(ड) ग्रामीण समुदाय – कृषी उद्योग.

**(३)** (अ) गारो जमात – ईशान्य भारत
(ब) मिझो समाज – अंदमान-निकोबार
(क) गोंड जमात – मध्य भारत
(ड) वारली जमात – पश्चिम भारत.

**(४)** (अ) तोडा – दक्षिण भारत
(ब) कातकरी जमात – पश्चिम भारत
(क) संथाल जमात – मध्य भारत
(ड) नागा जमात – दक्षिण भारत.

**(५)** (अ) आदिम जमाती – भौगोलिक अलिप्तता
(ब) आदिम जमाती – स्थिर शेती
(क) आदिम जमाती – अंतर्विवाही समूह
(ड) आदिम समाज – निसर्गवाद.

**उत्तर : दुरुस्त जोड्या :**
**(१)** (क) ग्रामीण शासनाची त्रिस्तरीय व्यवस्था – पंचायती राज.
**(२)** (अ) शहरी समुदाय – औद्योगिकीकरण.
**(३)** (ब) मिझो समाज – ईशान्य भारत.
**(४)** (ड) नागा जमात – ईशान्य भारत.
**(५)** (ब) आदिम जमाती – स्थलांतरित शेती.

**[२]**

**(१)** (अ) लोकसंख्येची घनता अधिक – शहरी समुदाय
(ब) वैविध्यपूर्ण आणि संमिश्र समुदाय – शहरी समुदाय
(क) व्यवसायाचे विशेषीकरण – शहरी समुदाय
(ड) कृषिमालावर आधारित उद्योग – शहरी समुदाय.

**(२)** (अ) अधिक सामाजिक गतिशीलता – शहरी समुदाय
(ब) रूढी-परंपरांचा पगडा – ग्रामीण समुदाय
(क) कुपोषण आणि अधिक प्रमाणात बालमृत्यू – शहरी समुदाय
(ड) निवासी जागेची टंचाई – शहरी समुदाय.

**(३)** (अ) विभक्त कुटुंब – शहरी समुदाय
(ब) संयुक्त कुटुंबाचे घटते प्रमाण – ग्रामीण समुदाय
(क) रक्त नात्याने बांधला गेलेला समुदाय – ग्रामीण समुदाय
(ड) वनोपज निर्वाहाचे प्रमुख साधन – आदिम समुदाय.

**(४)** (अ) सर्वाधिक निरक्षरता – आदिम समुदाय
(ब) सर्वाधिक साक्षरता – शहरी समुदाय
(क) सर्वाधिक दारिद्र्य – ग्रामीण समुदाय
(ड) सर्वाधिक लोकसंख्या – ग्रामीण समुदाय.

**(५)** (अ) सर्वाधिक दुर्लक्षित समुदाय – आदिम समुदाय
(ब) सर्वाधिक लोक शेती व्यवसायात – ग्रामीण समुदाय
(क) सर्वाधिक रोजगाराची उपलब्धता – शहरी समुदाय
(ड) सर्वाधिक विकसित समुदाय – ग्रामीण समुदाय.

**उत्तरे : दुरुस्त जोड्या :**

**(१)** (ड) कृषिमालावर आधारित उद्योग – ग्रामीण समुदाय.
**(२)** (क) कुपोषण आणि अधिक प्रमाणात बालमृत्यू – आदिम समुदाय.
**(३)** (क) रक्त नात्याने बांधला गेलेला समुदाय – आदिम समुदाय.
**(४)** (क) सर्वाधिक दारिद्र्य – आदिम समुदाय.
**(५)** (ड) सर्वाधिक विकसित समुदाय – शहरी समुदाय.

### प्र. ३ प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा : *(प्रत्येकी १ गुण)*

*[१] | शहरी समुदाय, देवराई, ग्रामदेवता.

(१) आदिवासी समुदायातील पवित्र वने
(२) पांढरपेशी गुन्हेगारीची उदाहरणे.

**उत्तरे :**

(१) आदिवासी समुदायातील पवित्र वने – देवराई
(२) पांढरपेशी गुन्हेगारी – शहरी समुदाय.

**[२]** | ग्रामदेवता, चेतनावाद, झोपडपट्टी

(१) प्रत्येक गावाचे दैवत
(२) शहरी भागाची समस्या.

**उत्तरे :**

(१) प्रत्येक गावाचे दैवत – ग्रामदेवता
(२) शहरी भागाची समस्या – झोपडपट्टी.

**[३]** | चेतनावाद, जीवात्मवाद, निसर्गवाद

(१) पूर्वजांच्या आत्म्याचे पूजन
(२) निर्जीव वस्तूंवरील श्रद्धा.

**उत्तरे :**

(१) पूर्वजांच्या आत्म्याचे पूजन – जीवात्मवाद
(२) निर्जीव वस्तूंवरील श्रद्धा – चेतनावाद.

**[४]** | निसर्गवाद, मानववाद, चेतनावाद

(१) नदी, जंगले इत्यादींची पूजा
(२) अमूर्त, अलौकिक वेगवान शक्ती.

**उत्तरे :**

(१) नदी, जंगले इत्यादींची पूजा – निसर्गवाद
(२) अमूर्त, अलौकिक वेगवान शक्ती – मानववाद.

**[५]** | अंतर्विवाह, ग्राम, शहर

(१) जमातीअंतर्गत विवाह करण्याची सक्ती
(२) ५००० पर्यंत लोकसंख्या असलेला समुदाय.

**उत्तरे :**

(१) जमातीअंतर्गत विवाह करण्याची सक्ती – अंतर्विवाह
(२) ५००० पर्यंत लोकसंख्या असलेला समुदाय – ग्राम.

### प्र. ४ अधोरेखित शब्दांच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा : *(प्रत्येकी १ गुण)*

**[१]**

*(१) शहरी समुदायातील व्यक्तीचे स्थान बहुतांश वेळा <u>अर्पित</u> स्वरूपाचे असते.
*(२) निर्जीव वस्तूंचे पूजन करण्याच्या पद्धतीला <u>जीवात्मवाद</u> असे म्हणतात.
(३) <u>आदिम समुदायावर</u> जातिव्यवस्थेचा पगडा आहे.
(४) शहरी समुदाय <u>समस्याविहित</u> आहे.
(५) आदिवासी समुदायाची स्वत:ची <u>लिपी</u> असते.

**उत्तरे :**

(१) शहरी समुदायातील व्यक्तीचे स्थान बहुतांश वेळा <u>अर्जित</u> स्वरूपाचे असते.
(२) निर्जीव वस्तूंचे पूजन करण्याच्या पद्धतीला <u>चेतनावाद</u> असे म्हणतात.

(३) ग्रामीण समुदायावर जातिव्यवस्थेचा पगडा आहे.
(४) शहरी समुदाय समस्याग्रस्त आहे.
(५) आदिवासी समुदायाची स्वतःची बोलीभाषा असते.

[ २ ]

(१) राज्यघटनेच्या कलम ३७० नुसार अनुसूचित केलेला समुदाय म्हणजे अनुसूचित जमाती होय.
(२) तोडा, कोटा, इरुला, बदागा, चेंचू व कुरुंबा या पश्चिम भारतातील आदिवासी जमाती आहेत.
(३) ग्रामीण समुदायात अनारोग्याचे प्रमाण सर्वाधिक असते.
(४) राष्ट्रीय उत्पन्नातील जवळपास ४० टक्के वाटा हा कृषी क्षेत्राचा आहे.
(५) शुद्धता व अशुद्धता या कल्पनेचा शहरी समुदायावर पगडा आहे.

**उत्तरे :**

(१) राज्यघटनेच्या कलम ३४२ नुसार अनुसूचित केलेला समुदाय म्हणजे अनुसूचित जमाती होय.
(२) तोडा, कोटा, इरुला, बदागा, चेंचू व कुरुंबा दक्षिण भारतातील आदिवासी जमाती आहेत.
(३) आदिवासी समुदायात अनारोग्याचे प्रमाण सर्वाधिक असते.
(४) * राष्ट्रीय उत्पन्नातील जवळपास २० टक्के वाटा हा कृषी क्षेत्राचा आहे.
(५) शुद्धता व अशुद्धता या कल्पनेचा ग्रामीण समुदायावर पगडा आहे.

[ *पाठ्यपुस्तकातील सदोष मजकुराची दुरुस्ती ]

## लघूत्तरी प्रश्न

**प्र. ५ टिपा लिहा :** ***(प्रत्येकी ४ गुण)***

### *(१) आदिम समुदायाच्या समस्या.

**उत्तर :** आदिम समुदायाच्या समस्या पुढीलप्रमाणे आहेत :

**(१) जंगल व आदिवासी जमिनींपासून अलगता :** वनप्रदेश आणि तेथील संसाधने ही आदिम समाजाच्या उपजीविकेची प्रमुख साधने होत. आदिम समाज जमिनींपासून अलग होण्याची सुरुवात ब्रिटिश कालखंडापासून झाली. याखेरीज सावकार, जमीनदार आणि व्यापाऱ्यांनीही आदिम समाजाच्या जमिनींवर ताबा घेतला होता. औद्योगिकीकरण आणि धरण बांधकामांमुळे शासनानेही आदिम समाजाच्या जमिनींचे संपादन केले.

**(२) दारिद्र्य आणि कर्जबाजारीपणा :** आदिम जमातीचे व्यवसाय साध्या तंत्रज्ञानावर आधारित आहेत. बहुतांश आदिम जमाती दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहेत. स्थानिक सावकार आणि जमीनदार या परिस्थितीचा फायदा घेऊन आदिम जमातींचे शोषण करतात. कर्जाची परतफेड करण्यासाठी आदिम व्यक्तीला जमीन तारण ठेवावी लागते किंवा विकावी लागते.

**(३) अनारोग्य आणि कुपोषण :** भारतातील बहुतांश आदिम जमाती पाण्यापासून होणाऱ्या संसर्गजन्य रोगांनी बाधित आहेत. लहान मुले जन्मतःच कुपोषित असतात. कुपोषणामुळे बालमृत्यूंचे प्रमाण अधिक आहे.

**(४) निरक्षरता :** भारतात सर्वाधिक निरक्षरता आदिवासी समुदायात आहे. दारिद्र्यामुळे मुलांनी अर्थार्जन करावे अशी पालकांची अपेक्षा असते. आदिवासी वस्तीपासून दूर अंतरावर शाळा असतात. अभ्यासक्रम ज्या भाषेत आदिवासी अनभिज्ञ आहेत त्यात शिकवला जातो. शासकीय प्रयत्नानंतरही आदिवासी समुदायात शिक्षणाविषयी स्वारस्य निर्माण झालेले नाही.

### *(२) शहरी समुदायाची वैशिष्ट्ये.

**उत्तर :** *यासाठी प्रश्न ११ मधील प्रश्न ४ (ब) पाहा.*

(**नोंद :** *'टिपा लिहा' हा ४ गुणांचा प्रश्न आहे. संदर्भादाखल दिलेला प्रश्न १० गुणांचा आहे. विद्यार्थ्यांनी ही बाब लक्षात घ्यावी.*)

### (३) आदिवासी समुदायाच्या आर्थिक समस्या.

**उत्तर :** आदिवासी समुदाय आर्थिकदृष्ट्या भारतातील सर्वांत कमकुवत समाजघटक आहे. त्याच्या आर्थिक समस्या पुढीलप्रमाणे आहेत :

**(१) दारिद्र्य :** आदिवासी समुदायाचे शेती, वनोपज संकलन, शिकार इत्यादी आर्थिक उपक्रम मागासलेले व कालबाह्य स्वरूपाचे असल्याने आदिवासी समुदायातील बहुसंख्य लोकसंख्या दारिद्र्य-रेषेखाली जीवन जगते. निम्नस्तरीय जीवनमान, उपासमार आणि कुपोषण या दारिद्र्यातून उद्भवणाऱ्या समस्यांमुळे आदिवासी समुदाय हलाखीचे जीवन जगतो.

**(२) कर्जबाजारीपणा :** दारिद्र्यामुळे आपल्या गरजा भागवण्यासाठी आदिवासी सावकारांकडून अवाजवी व्याजदराने कर्जे घेतात. त्यासाठी आपल्या जमिनी सावकारांकडे गहाण ठेवतात. कर्जाची परतफेड करता येत नसल्याने सावकार त्यांच्या जमिनी जप्त करतात किंवा सावकाराकडे विनामोबदला काम करण्याची सक्ती त्यांच्यावर करण्यात येते. म्हणजेच ते भूमिहीन होतात किंवा वेठबिगार म्हणून जीवन जगतात.

**(३) शोषण :** असंख्य भूमिहीन आदिवासी आज खाणकाम, बांधकाम इत्यादी बिगर-शेती व्यवसायांत कामे करतात. त्यांच्या निरक्षरतेचा व असाहाय्यतेचा फायदा घेऊन, मालकवर्ग त्यांचे अपरिमित शोषण करतात. वेठबिगारांची अवस्था त्याहूनही वाईट असल्याचे दिसून येते.

**(४) विस्थापन :** औद्योगिकीकरण, जलसिंचन, वीजनिर्मिती, रस्तेबांधणी इत्यादी विकास प्रकल्पांसाठी शासन आदिवासी लोकांच्या जमिनी ताब्यात घेते. असंख्य आदिवासी खेड्यांचे स्थलांतर करण्यात येते. या विस्थापितांना दिली जाणारी नुकसानभरपाई पुरेशी नसते.

### (४) आदिवासी विकासाचे 'पंचशील'.

**उत्तर :** स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आदिवासींच्या विकासाविषयी विशेष आस्था होती. आदिवासी विकासविषयक धोरणासाठी मार्गदर्शक अशा 'पंचशील' सूचनांची मांडणी त्यांनी केली. पं. नेहरूप्रणीत पंचशील पुढीलप्रमाणे :

(१) आदिवासी व्यक्तींच्या गुणांनुसार त्यांचा विकास व्हावा. त्यांच्यावर कोणतीही बाह्य बाब लादणे आपण टाळूया.

(२) वनप्रदेशात आदिवासींच्या हक्कांचे संरक्षण व्हावे.

(३) प्रशासन आणि विकासासाठी आदिवासींना प्रशिक्षण देऊन त्यांची गटबांधणी करावी.

(४) आदिवासींच्या प्रदेशांत गरजेपुरतेच प्रशासन करावे. त्यांच्यावर विविध योजनांचा भडिमारदेखील करू नये. त्यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांच्या विरोधात नव्हे तर त्याच्या आधारानेच काम करावे.

(५) आदिम समाजावर किती पैसा गुंतवला त्याच्या सांख्यिकी मांडणीवरून परिणामांची पडताळणी करू नये; तर मानवी जीवनाच्या गुणवत्तेवरून ही परीक्षा व्हावी.

राज्यघटनेतील ही ढोबळ मार्गदर्शक तत्त्वे आणि तरतुदी ध्यानात घेऊन आदिम समाजासाठी अनेक विशेष योजना आणि कार्यक्रम राबवण्यात आले आहेत.

### (५) ग्रामीण समुदायाच्या समस्या.

**उत्तर :** ग्रामीण समुदायाच्या समस्या पुढीलप्रमाणे आहेत :

**(१) दारिद्र्य :** दारिद्र्य ही सामाजिक-आर्थिक बाब आहे. समाजातील काही लोक त्यांच्या मूलभूत गरजाही पूर्ण करू शकत नाहीत तेव्हा ते दारिद्र्यावस्थेत असतात. ग्रामीण भागातील बहुतांश लोक दरिद्री अवस्थेत असतात.

**(२) निरक्षरता :** शहरी लोकसंख्येशी तुलना करता, ग्रामीण भागात निरक्षरतेचे प्रमाण अधिक असते. प्रौढांमध्ये निरक्षरतेचे मोठे प्रमाण आजही कायम आहे. ग्रामीण भागातील शिक्षणाची गुणवत्ता ही चिंताजनक बाब आहे.

**(३) पारंपरिकता, पुराणमतवाद आणि अंधश्रद्धा :** भारत आजही पुराणमतवादी समाज आहे. येथील लोकांचे विचार आणि श्रद्धा पारंपरिक आहेत. रूढी व धर्म यांना आजही महत्त्व आहे. अशी जीवनपद्धती आणि दृष्टिकोन बदलण्यास ग्रामीण अभिजन विरोध करतात.

**(४) जातिव्यवस्थेचा प्रभाव :** जातिव्यवस्थेनुसार पारंपरिक हक्क, अधिकार आणि दंड या बाबी आज फारशा नजरेस पडत नाहीत. परंतु, जातिव्यवस्था लोकांच्या विचारांत इतकी भिनली आहे की, सामाजिक संबंध या व्यवस्थेमुळे आकार घेतात. जातिभेद आणि अस्पृश्यता पालन ग्रामीण जीवनाचे वास्तव्य आहे.

**(५) स्त्रियांचे दुय्यम स्थान :** कुटुंब, धर्म, रूढी आणि परंपरांच्या नियंत्रणांमुळे समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान आहे. समाजाच्या प्रत्येक स्तरावर पितृसत्ताक मूल्ये आणि पद्धतींचा पगडा आहे. त्यामुळे समाजात दुजाभाव निर्माण होतो आणि लिंगभावाबाबत ठाम मते तयार होतात.

### (६) शहरी समुदायाच्या समस्या.

**उत्तर :** शहरी समुदायाच्या प्रमुख समस्या पुढीलप्रमाणे आहेत :

**(१) लोकसंख्येचा वाढता दबाव :** नैसर्गिक कारणांमुळे आणि स्थलांतरामुळे शहरांतील लोकसंख्येची झपाट्याने वाढ झाली. यामुळे निवास, आरोग्यरक्षणार्थ सुविधा, दळणवळण, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, आरोग्य, शिक्षण इत्यादी नागरी सुविधांवर प्रचंड ताण आला. त्यांतून दारिद्र्य, बेरोजगारी आणि अल्प रोजगार, भीक मागणे, चोरी, घरफोडी यांसारख्या इतर सामाजिक समस्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढते आहे.

**(२) अस्ताव्यस्त शहरे :** अस्ताव्यस्त शहरे किंवा लोकसंख्या आणि भौगोलिक संदर्भाने शहरांचा वाढता पसारा हे शहरी समस्यांचे मूळ आहे. शहरांच्या अवाढव्य आकारामुळे समस्यांवर तोडगा काढण्यासाठी येथील अर्थव्यवस्था अपुरी पडते.

**(३) निवास आणि झोपडपट्ट्या :** लोकसंख्येच्या दाटीवाटीमुळे शहरी भागात निवास व्यवस्थेची कमतरता निर्माण होते. ग्रामीण भागातून शहरांमध्ये स्थलांतर केलेल्यांना शहरामध्ये राहण्याची सोय उपलब्ध नाही. त्यातून झोपडपट्टीची समस्या उद्‌भवते.

**(४) बेरोजगारी :** भारतातील शहरी बेरोजगारीचे प्रमाण श्रमिकांच्या प्रमाणाच्या १५–२५ टक्के इतके आहे. शिक्षित लोकांमध्ये ही टक्केवारी अजून जास्त आहे. सर्व शिक्षित शहरी बेरोजगारितांपैकी निम्मे लोक चार महानगरांमध्ये (दिल्ली, मुंबई, कोलकाता आणि चेन्नई) आहेत.

**(५) भिक्षावृत्ती :** शिक्षण आणि कौशल्यांची कमतरता असल्यामुळे शहरातील बहुतांश गरीब लोक हे भिक्षावृत्तीकडे वळताना दिसतात आणि ती त्यांची जीवनशैली बनून जाते. महानगरांमध्ये भिक्षेकऱ्यांच्या संघटित टोळ्या सक्रिय होताना आढळतात. बऱ्याचदा पालकांकडूनच मुलांना भीक मागण्यासाठी विकले जाते किंवा काही प्रकरणांमध्ये मुलांचे अपहरण करून व त्यांना अपंग करून या व्यवसायात त्यांचा गैरवापर केला जातो.

**प्र. ६ फरक स्पष्ट करा :** *(प्रत्येकी ४ गुण)*

***(१) ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शहरी अर्थव्यवस्था.**

| उत्तर : ग्रामीण अर्थव्यवस्था | शहरी अर्थव्यवस्था |
|---|---|
| (१) ग्रामीण अर्थव्यवस्था कृषिप्रधान आहे. ग्रामीण भागातील २०% लोकसंख्येच्या उपजीविकेचे एकमेव साधन शेती व शेतीशी निगडित व्यवसाय आहे. | (१) शहरी अर्थव्यवस्था बाजारपेठ-आधारित आहे. कारखानदारी व सेवा क्षेत्रात लोकांना रोजगार उपलब्ध होतात. |
| (२) स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण अर्थव्यवस्थेला उर्जितावस्था प्राप्त व्हावी यासाठी कृषिमालावर प्रक्रिया करणारे उद्योग सहकारी तत्त्वावर सुरू करण्यात आले. | (२) स्वातंत्र्यपूर्व कालखंडात १९व्या शतकाच्या माध्यमातून औद्योगिक शहरे विकसित झाली. स्वातंत्र्योत्तर कालखंडात औद्योगिकीकरणास प्रोत्साहन देण्यात आले. |
| (३) ग्रामीण अर्थव्यवस्थेवर बड्या जमीनदार वर्गाचे वर्चस्व आहे. | (३) शहरी अर्थव्यवस्थेवर कारखानदार–भांडवलदार वर्गाचे वर्चस्व आहे. |
| (४) ग्रामीण अर्थव्यवस्थेत छोटे व सीमांत शेतकरी व शेतमजूर दुर्बल घटक आहेत. | (४) शहरी अर्थव्यवस्थेत असंघटित क्षेत्रातील कामगार हे दुर्बल घटक आहेत. |

***(२) आदिम (आदिवासी) समुदाय आणि शहरी (नागरी) समुदाय.**

| उत्तर : आदिम (आदिवासी) समुदाय | शहरी (नागरी) समुदाय |
|---|---|
| (१) आदिवासी समूह विखुरलेले असून एक जमात दुसऱ्या जमातीपासून अलग असते. | (१) शहरी समुदाय अनेक जाती, धर्म व पंथ यांनी बनलेला असून हे लोक एकमेकांजवळ एकाच वस्तीत राहतात. |
| (२) दळणवळणाच्या अपुऱ्या साधनांमुळे या समूहांचा बाहेरच्या जगाशी फारसा संपर्क नसतो. त्यांचे जीवन त्यांच्याच भूप्रदेशात सामावलेले असते. | (२) दळणवळणाच्या साधनांमुळे विविध शहरे व खेडी एकमेकांशी जोडलेली असून हवाई मार्गाने परदेशांशीही जोडली गेली आहेत. नोकरी, धंदा, व्यवसाय यांकरिता शहरी लोकांना घरापासून दूर जावे लागते व इतरांची मदत घ्यावी लागते. |
| (३) या समुदायाचे जीवन सर्वस्वी निसर्गावर अवलंबून असते. त्यामुळे त्यांच्या जीवनावर निसर्गाचा प्रभाव असतो. | (३) या समुदायावर कृत्रिम व मानवनिर्मित पर्यावरणाचा प्रभाव अधिक असतो. पाणीपुरवठा, वीजपुरवठा, अन्नधान्यपुरवठा इत्यादी सुविधा मानवनिर्मित आहेत. |
| (४) या समुदायात शैक्षणिक व आर्थिक मागासलेपण आढळते. शिक्षण आणि रोजगाराच्या सोयी अत्यल्प आसतात. | (४) या समुदायातील लोक सुशिक्षित असतात. विविध प्रकारचे शिक्षण देणाऱ्या अनेक शैक्षणिक संस्था शहरांत उपलब्ध असतात. शहरांत उद्योग-व्यवसाय आणि सेवाक्षेत्रात चांगली आर्थिक प्राप्ती होत असते. |

**(३) ग्रामीण समुदाय आणि नागरी (शहरी) समुदाय.**

| उत्तर : ग्रामीण समुदाय | नागरी (शहरी) समुदाय |
|---|---|
| (१) ग्रामीण समुदायाचा आकार लहान असून, लोकसंख्या ५००० पेक्षा कमी असते. | (१) शहरी (नागरी) समुदायाचा आकार आणि लोकसंख्या ग्रामीण भागाच्या तुलनेत अधिक असते. |
| (२) शेती हा ग्रामीण समुदायाचा प्रमुख व्यवसाय असतो. | (२) शहरी भागातील लोक प्रामुख्याने बिगरशेती व्यवसाय करतात. |
| (३) प्रादेशिक भागांतून व्यवहार चालतात. तसेच जातिधर्माचाच व्यवसाय निवडला जातो. | (३) अनेक देशी-विदेशी भाषांतून व्यवहार चालतात. उपजीविकेकरिता कोणताही व्यवसाय केला जातो. |
| (४) मोठ्या प्रमाणात संयुक्त कुटुंबपद्धती असते. तसेच परस्परसंबंध जिव्हाळ्याचे असतात. कुटुंबसंस्था व धर्मसंस्था सामाजिक नियंत्रणाचे कार्य करतात. | (४) विभक्त कुटुंबाचे प्रमाण वाढते असून परस्परसंबंध दुय्यम स्वरूपाचे असतात. त्यांत जिव्हाळा नसतो. सामाजिक नियंत्रणाचे कार्य प्रामुख्याने पोलीस यंत्रणा करते. |

**(४) आदिवासी समुदाय व ग्रामीण समुदाय.**

| उत्तर : आदिवासी समुदाय | ग्रामीण समुदाय |
|---|---|
| (१) भारतीय आदिवासी समुदाय विखुरलेले असून एक जमात दुसऱ्या जमातीपासून अलग आहे. | (१) भारतीय खेडी भौगोलिकदृष्ट्या एकमेकांपासून अलग आहेत. त्यामुळे ग्रामीण समुदाय विखुरलेला आहे. |
| (२) आदिवासी समुदाय डोंगरदऱ्या व पाण्याने वेढलेल्या भागांत राहत असल्यामुळे त्याचा बाहेरच्या जगाशी फारसा संपर्क नसतो. | (२) अलीकडच्या काळात दळणवळणाच्या साधनांनी ग्रामीण समुदाय एकमेकांशी जोडला गेला आहे. तसेच वीज, दूरध्वनी, दूरदर्शन या संपर्क-साधनांमुळे तो शहरांशीही जोडला गेला आहे. |
| (३) आदिवासी समुदायात टोळीयुक्त किंवा विस्तृत प्रकारची संयुक्त कुटुंबव्यवस्था आढळते. | (३) ग्रामीण समुदायात तीन पिढ्यांपर्यंतची संयुक्त कुटुंबपद्धती आढळते. |
| (४) प्रत्येक जमात आपापल्या संस्कृतीची, बोलीभाषेची, धंद्याची व जीवनपद्धतीची ओळख भावी पिढीला करून देत असते. | (४) ग्रामीण समुदायात अनेक व्यवसाय असतात; परंतु प्रत्येक जातीचा व्यवसाय ठरलेला असतो. प्रत्येक जात आपला व्यवसाय नव्या पिढीला शिकवत असते. |

**प्र. ❼ पुढे दिलेल्या संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा :**

***(प्रत्येकी ४ गुण)***

***(१) शहरी गुन्हेगारी.**

**उत्तर :** शहरी गुन्हेगारी वाढत्या शहरीकरणाचा परिपाक आहे. असा प्रचलित समज आहे की, झोपडपट्टीत राहणारे दरिद्री आणि उपेक्षित गुन्हेगारीकडे वळतात. मात्र हा समज चुकीचा आहे कारण झटपट पैसा प्राप्त करून ऐशआरामी जीवन जगण्यासाठी वरिष्ठ वर्गातील लोकही गुन्हेगारीकडे वळतात. आयुष्यात एका टप्प्यावर अयशस्वी झालेले सुशिक्षित तरुणही गुन्हेगारीकडे वळतात. राजकारणी आणि अभिजन वर्गाच्या आशीर्वादाने गुंडांच्या टोळ्या पोसल्या जातात. कालांतराने हेच गुंड पैसा आणि पाशवी बळाचा वापर करून राजकारणात प्रवेश करतात आणि उच्चपदस्थ बनतात. स्त्रियांचे अपहरण व अतिप्रसंग, सायबर व आर्थिक गुन्हे शहरांत मोठ्या प्रमाणात वाढले आहे. गुन्हेगारीमुळे शहरी जीवन अत्यंत असुरक्षित बनली आहे.

**उदाहरण :** दाऊद इब्राहीम आणि छोटा राजन हे गुंडांच्या टोळ्यांचे म्होरके, तर हर्षद मेहतासारखे पांढरपेशा गुन्हेगार.

***(२) आदिवासी कुल.**

**उत्तर :** कुल हा आदिम समाजाचा अविभाज्य भाग आहे. कुल म्हणजे रक्ताच्या नात्यांनी बांधली गेलेली कुटुंबे होत. त्यांच्या वंशाची सुरुवात वास्तविक किंवा काल्पनिक व्यक्तीपासून किंवा वस्तूपासून झालेली असते. भारतातील बहुतांश जमाती बहिर्विवाह, कुल आणि वंशपरंपरा यांमध्ये विभागलेल्या आहेत. कुल संघटन असल्यामुळे दृढ नातेसंबंध निर्माण होतात.

**उदाहरण :** महाराष्ट्रातील वारली व कातकरी जमातींचे कुल संघटन.

**(३) आदिवासी समुदाय.**

**उत्तर :** डॉ. आंद्रे बेते यांच्या मते, ''ज्या समाजाच्या विशिष्ट भाषिक मर्यादा आणि सुनिश्चित राजकीय मर्यादा आहेत अशा समाजाला आदिम समाज असे म्हणता येईल. राजकीय मर्यादा म्हणजे समाजातील सदस्यांसाठी 'वर्तनाच्या सुनिश्चित पद्धती' बंधनकारक करणे असा अर्थ अभिप्रेत आहे. आदिम जमातींचे सांस्कृतिक परिक्षेत्रदेखील ठरलेले असते. सांस्कृतिक परिक्षेत्राची नेमकी व्याख्या नसली तरी, त्यामध्ये ढोबळमानाने, चालीरीती, रूढी आणि सदस्यांच्या औपचारिक आणि अनौपचारिक आंतरक्रिया समाविष्ट असतात.''

**उदाहरण :** महाराष्ट्रातील भिल्ल, कातकरी व वारली समुदाय.

**(४) देवराई.**

**उत्तर :** देवराई ही एक स्वतंत्र संस्था आहे असे म्हणता येईल. इथे विविध नातेसंबंध निर्माण होतात. त्यांतून विशिष्ट संस्कृती निर्माण होते. स्थानिक लोकांच्या मनात त्यांची शेती, वने आणि एकमेकांप्रती आस्था निर्माण होते. पवित्र वनांबाबतचा पूजनीय भाव आदिम जमाती आणि ग्रामीण लोकांच्या जगण्यासाठी आवश्यक असलेल्या शेती आणि वनांशी संबंधित आहे. यासाठी वनांचा विस्तृत प्रदेश सुरक्षित ठेवण्यात आला आहे. त्यामुळे आपोआपच जैवविविधतेचे संरक्षणही झाले आहे. पवित्र वनांचे संरक्षण करणारा कोणताही कायदा नसल्याने आता मात्र अनेक पवित्र वनांचा ऱ्हास होत आहे ही दुर्दैवी बाब आहे.

**उदाहरण :** ठाणे जिल्ह्यात मुरबाड तालुक्यातील 'शेडोबाचे वन'.

**(५) ग्रामीण समुदाय.**

**उत्तर :** भारताच्या सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतीय ग्रामीण समुदाय म्हणजे जवळपास ५००० लोकांचा समुदाय होय. हा समुदाय कृषी आणि पूरक व्यवसायांवर अवलंबून असतो. या समुदायाचे विशिष्ट भौगोलिक प्रदेशात कायमस्वरूपी वास्तव्य असते.

समुदायाच्या काही सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक रूढी समान असतात.

**उदाहरण :** सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतात ६८.२०% लोक ग्रामीण भागात–खेड्यात राहतात. त्या गावांची संख्या ६.४ लक्ष इतकी आहे.

**(६) पंचायती राज.**

**उत्तर :** भारत सरकारने १९५७ साली सामूहिक विकास कार्यक्रमांचे मूल्यमापन करण्यासाठी बलवंतराय मेहता समितीची नेमणूक केली होती. या समितीने लोकशाही विकेंद्रीकरण म्हणजेच पंचायती राजची शिफारस केली होती. ग्रामीण शासन लोकशाही पद्धतीने चालावे या उद्देशाने त्रिस्तरीय पंचायती राज व्यवस्था निर्माण करण्यात आली. त्याअंतर्गत गाव पातळीवर ग्राम पंचायत, विकास गट किंवा तालुका स्तरावर पंचायत समिती आणि जिल्हा स्तरावर जिल्हा परिषदेची स्थापना करण्यात आली. त्यासाठी राज्य विधिमंडळांनी कायदे पारित केले.

**उदाहरण :** मुंबई ग्राम पंचायत कायदा १९५८ आणि महाराष्ट्र पंचायत समिती व जिल्हा परिषद कायदा, १९६१.

**(७) नागरी/शहरी समुदाय.**

**उत्तर :** औद्योगिक क्रांतीनंतर व्यवसायाच्या निकषांवर बिगरशेती व्यवसाय करणाऱ्या लोकांचा समुदाय 'नगर' किंवा 'शहर' म्हणून ओळखला जाऊ लागला. 'नगर' या शब्दापासून 'नागरी समुदाय' (Urban Community), 'नागर संस्कृती' (Urban Culture) इत्यादी संकल्पना समाजशास्त्रज्ञांनी मांडल्या आहेत. नागर समुदायाचे वास्तव्य शहर, नगर आणि महानगरात असल्याने त्यास 'शहरी समुदाय' असेही म्हणतात. **लुईसवर्थ** यांच्या मते, लोकसंख्येच्या घनतेच्या निकषावर दाट लोकवस्तीचा भूभाग म्हणजे शहर. मॅक्स वेबर या समाजशास्त्रज्ञाने शहरी समुदायाची पुढील पाच लक्षणे सांगितली आहेत :


(१) ठरावीक भूप्रदेश (२) बाजारपेठ (३) कायदे संहिता आणि न्यायव्यवस्था (४) शहरी नागरिकांच्या संघटनेतून नागरी सहकार्याची जाणीव आणि (५) शहरातील अधिकारी नेमण्यासाठी शहरातील नागरिकांना पुरेशी राजकीय स्वायत्तता.

**(८) झोपडपट्टी.**


**उत्तर :** शहरी समुदायाला भेडसावणारी सर्वांत महत्त्वाची समस्या निवास व्यवस्थेची कमतरता आणि त्यातून विस्तार पावणाऱ्या झोपडपट्ट्या ही आहे. झोपडपट्टीला गलिच्छ वस्ती असेही म्हणतात. कारण अशा वस्त्यांमध्ये नागरी सुविधांची कमतरता असल्याने सार्वजनिक आरोग्य आणि व्यक्तिगत स्वच्छता पूर्णपणे दुर्लक्षित असते. अशा वस्त्यांमध्ये ग्रामीण भागांतून व देशाच्या अन्य भागांतून स्थलांतरित दारिद्र्यरेषेखाली जगणारे बेरोजगार असतात. अवास्तव किमती असलेल्या निवासी जागा त्यांच्या आर्थिक क्षमतेपलीकडच्या असतात. मुंबईसारख्या शहरात झोपडपट्टी पुनर्वसनाचे कार्यक्रम हाती घेतले तरी ते अपुरे ठरतात कारण झोपडपट्ट्यांचा विस्तार सातत्याने होत असतो.

**प्र. ८ पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा : *(४ गुण)***


***(१) आदिम समुदायाशी सांस्कृतिक संपर्क येण्याची कारणे.**




**उत्तर :**




**(२) आदिवासींचे धर्म–श्रद्धाप्रणाली.**



**उत्तर :**

आदिवासींचे धर्म–श्रद्धाप्रणाली
- जीवात्मवाद
- चेतनावाद
- कुलप्रतीकवाद
- मानववाद

### (३) पश्चिम भारतातील (महाराष्ट्रातील) आदिवासी जमाती.

पश्चिम भारतातील (महाराष्ट्रातील) आदिवासी जमाती
- ______
- ______
- ______
- ______

**उत्तर :**

पश्चिम भारतातील (महाराष्ट्रातील) आदिवासी जमाती
- कातकरी
- भिल्ल
- वारली
- बैना

### (४) ग्रामीण विकासाचे शासकीय उपक्रम (कार्यक्रम).

ग्रामीण विकासाचे शासकीय उपक्रम (कार्यक्रम)
- ______
- ______
- ______
- ______

**उत्तर :**

ग्रामीण विकासाचे शासकीय उपक्रम (कार्यक्रम)
- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना
- सर्व शिक्षा अभियान
- स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना
- संसद आदर्श ग्राम योजना

### (५) शहर विकास कार्यक्रम.

शहर विकास कार्यक्रम
- ______
- ______
- ______
- ______

**उत्तर :**

शहर विकास कार्यक्रम
- स्मार्ट सिटी मिशन
- प्रधानमंत्री आवास योजना
- जवाहरलाल नेहरू नेशनल अर्बन रिज्युव्हेशन मिशन
- स्वच्छ भारत मिशन

## प्र. ९ पुढील विधाने चूक की *बरोबर* हे सांगून सकारण स्पष्ट करा : *(प्रत्येकी ४ गुण)*

* **(१) शहरी समुदायामध्ये गुंतागुंतीचे श्रमविभाजन दिसून येते.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारणे :** (१) शहरांत व्यवसायांचे विशेषीकरण झालेले असते.

(२) व्यावसायिक कारणास्तव आवश्यक ते श्रमविभाजन करण्यात आलेले असते.

(३) विशेष पात्रता असणाऱ्या व्यक्तींना विशेष व्यावसायिक संधी उपलब्ध असते. **उदा.,** वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर.

(४) जागतिकीकरणानंतर विशिष्ट पात्रता असणाऱ्या व्यक्तींना देशात आणि देशाबाहेर व्यावसायिक संधी उपलब्ध असतात.

***(२) अलीकडील काळामध्ये जातिव्यवस्थेचा पारंपरिक प्रभाव हा कमी होत चालला आहे.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारणे :** (१) १९व्या शतकाच्या उत्तरार्धापासून औद्योगिकीकरण आणि नागरीकरणाचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाल्याने पारंपरिक समाजव्यवस्था आणि त्यातील जातिव्यवस्थेत परिवर्तन घडून येऊ लागले आहे.

(२) औद्योगिकीकरणामुळे पारंपरिक जातिनिहाय व्यवसाय हा विचार मागे पडला आहे. शिक्षणाचा प्रसार झाल्याने कनिष्ठ जातीतील कर्तबगार व्यक्ती मोठ्या अधिकारपदावर जाऊन पोहोचल्या आहेत किंवा स्वतःचे उद्योग-व्यवसाय करीत आहेत.

(३) १९व्या शतकातील समाजसुधारकांनी जातिव्यवस्था आणि त्यातील अन्यायमूलक बाबींवर प्रखर टीका केली. त्यांनी बहुजन समाजाला व दलितांना संघटित केले. या कनिष्ठ जातींनी जातीचे निर्बंध झुगारून दिले आहेत.

(४) भारताच्या संविधानाने समतेचे तत्त्व स्वीकारले आहे. जातींच्या आधारे भेदभाव करण्यास मनाई केली आहे. अस्पृश्यतेचे निर्मूलन केले आहे आणि अस्पृश्यतेचे पालन हा दखलपात्र गुन्हा घोषित केला आहे.

**(३) शहर हे सामाजिक समस्यांचे केंद्र आहे.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारणे :** (१) शहरी भागात लोकसंख्येत प्रचंड वाढ झाली असल्याने निवासाच्या जागेची तीव्र टंचाई भासते.

(२) जागेच्या टंचाईमुळे गलिच्छ वस्त्यांची समस्या निर्माण झाली आहे.

(३) लोकसंख्येच्या दबावामुळे नागरी सेवांवर प्रचंड ताण पडतो. वाहतुकीची कोंडी, अनियमित व कमी प्रमाणात पाणीपुरवठा इत्यादी समस्या उद्‌भवतात.

(४) शहरात बेरोजगार व्यक्तींची संख्याही मोठी असल्याने त्यांच्यातील असंतोषाचा वारंवार उद्रेक होत असतो. अलीकडे असे शहरी बेरोजगार तरुण गुन्हेगारीकडे वळल्याने शहरात वाढती गुन्हेगारी ही समस्या निर्माण झाली आहे.

**(४) नागरी समुदायात गतिशीलतेला भरपूर वाव असतो.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारणे :** (१) नागरी समुदायात वाहतुकीची प्रगत साधने उपलब्ध असल्याने एका शहरातून दुसऱ्या शहरात स्थलांतर करणे/प्रवास करणे सहज शक्य असते.

(२) नागरी समुदायात व्यावसायिक संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध असतात. त्यामुळे व्यावसायिक/पगारदार आपल्या मर्जीप्रमाणे व्यवसाय/रोजगार बदलू शकतात.

(३) नागरी समुदायात व्यक्तीचा सामाजिक दर्जा त्याच्या जातीच्या आधारे ठरत नाही. व्यक्तीचा सामाजिक दर्जा त्याची गुणवत्ता, बौद्धिक क्षमता आणि संपादन केलेल्या कौशल्यांच्या आधारे ठरतो स्वप्रयत्नाने कनिष्ठ जाती/वर्गातील व्यक्तीस आपला सामाजिक दर्जा उंचावण्याची संधी असते.

(४) नागरी समुदाय संमिश्र स्वरूपाचा असतो. त्यात विविध जाती, धर्म, भाषा, संस्कृती इत्यादींची सरमिसळ झालेली असते. व्यापक दृष्टिकोन असलेल्या व्यक्तीला आपली प्रगती साध्य करणे, कोणत्याही जाती व धर्माच्या व्यक्तीबरोबर विवाह करणे सहज शक्य होते.

**(५) आदिवासी समुदायाची अर्थव्यवस्था साधी आहे.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारणे :** (१) आदिवासी समुदाय हा दुर्गम भागात वास्तव्य करणारा असल्याने मुख्य समाजप्रवाह आणि त्यातील प्रगत तंत्रज्ञानापासून तो अनभिज्ञ असतो.

(२) शेती, पशुसंवर्धन, शिकार आणि वनोपज संकलन हे अत्यंत प्राथमिक अर्थव्यवस्थेत आढळणारे आर्थिक उपक्रम आदिवासी समुदायात आजही अस्तित्वात आहेत.

(३) आदिवासींचे शेतीचे तंत्र हे प्राथमिक अवस्थेतील आणि कालबाह्य स्वरूपाचे आहे. त्यात आधुनिक शेती तंत्रांचा वापर केला जात नाही.

(४) आदिवासी समुदायात आजही वस्तुविनिमय पद्‌धत प्रचलित आहे. पैशांचा वापर कमी आहे. नफ्याची प्रेरणा त्यांच्यात आढळून येत नाही.

**(६) भारतात शेतीची उत्पादकता कमी आहे.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारणे :** (१) ग्रामीण समुदायात आजही शेती प्रामुख्याने कालबाह्य पारंपरिक पद्‌धतीने केली जाते. पारंपरिक उत्पादन पद्‌धती कमी उत्पादक आहे.

(२) बहुसंख्य शेतकरी अल्पभूधारक आहेत. भूधारणा अत्यंत कमी आणि खंडित स्वरूपाची आहे. त्यात आधुनिक उत्पादन तंत्रांचा अवलंब करणे कठीण आहे.

(३) अल्पभूधारक शेतकऱ्यांची आर्थिक कुवतही मर्यादित असते. शेतीची आधुनिक आदाने खरेदी करण्याची आर्थिक क्षमता त्यांच्याकडे नाही.

(४) भारतातील शेती बहुतांशी कोरडवाहू पद्‌धतीची, म्हणजेच पावसावर अवलंबून असते. जलसिंचनाच्या साधनांचा अभाव असल्याने शेतीचा हंगाम एकच असतो. अतिवृष्टी किंवा अवर्षण यांमुळे शेतीचे उत्पादन वारंवार घटत असते.

**(७) स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शासनाने जमीन सुधारणा (Land reforms) कायदे पारित केले.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारणे :** (१) स्वातंत्र्यपूर्व काळात अस्तित्वात असलेल्या भूधारणा पद्धती विषमता आणि शोषणमूलक होत्या. जमीनदारी भूधारणा पद्धती ज्या भागात अस्तित्वात होती, त्या भागात जमीनदार स्वतः शेती करीत नसत, तर आपल्या कुळांकडून शेती करवून घेत असत. ते कुळांकडून जास्तीत जास्त खंड उकळून त्यांचे शोषण करीत असत.

(२) प्रत्यक्ष शेती करणाऱ्या कुळांचे शोषण होत असल्याने, त्यांच्यात उत्पादन वाढवण्याची प्रेरणा लोप पावली होती.

(३) कुळांचे शोषण थांबवण्याची आणि उत्पादनातील न्याय्य वाटा त्यांना मिळावा यासाठी कायदे करून, कुळांना संरक्षण देण्याची गरज होती. म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शासनाने जमीन सुधारणा (Land reforms) कायदे पारित केले.

(४) अल्पभूधारकांची भूधारणा अत्यंत कमी व खंडित होती. उत्पादनवाढीसाठी सामूहिक शेतीद्वारा या असंख्य भूधारणा क्षेत्रांचे संकलन/एकत्रीकरण करणे गरजेचे होते.

**(८) शासनाने १९५७ साली बलवंतराय मेहता समिती नियुक्त केली.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारणे :** (१) १९५२ साली भारत सरकारने सामूहिक विकास कार्यक्रम सुरू केला. पाच वर्षांनंतर त्या कार्यक्रमाचे मूल्यमापन करण्याची तरतूद करण्यात आली होती.

(२) ग्रामीण भागातील लोकांना विकास कार्यक्रमांच्या कार्यवाहीत सहभाग आवश्यक होता. त्यासाठी ग्रामीण भागातील स्थानिक शासनसंस्थांत बदल करणे गरजेचे होते.

(३) स्वातंत्र्यपूर्व कालखंडात देशातील प्रांतांत ग्रामीण स्थानिक शासनसंस्था अस्तित्वात असल्या तरी त्यात मोठ्या प्रमाणात तफावत होती. संपूर्ण देशात समान ग्रामीण स्थानिक शासनसंस्था स्थापन करण्याची गरज होती.

(४) ग्रामीण भागातील स्थानिक नेतृत्वाला विकासप्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी लोकशाही विकेंद्रीकरणाची गरज होती. म्हणून भारत सरकारने (शासनाने) १९५७ साली बलवंतराय मेहता समिती/नियुक्त केली.

**(९) आदिवासींचे अपरिमित शोषण झाले.**

**उत्तर :** वरील विधान **बरोबर** आहे.

**कारणे :** (१) आदिम समाजाच्या खनिज आणि नैसर्गिक संसाधनांवर ब्रिटिशांना ताबा हवा होता.

(२) काही मिशनऱ्यांना आदिम समाजाचे धर्मांतर करावयाचे होते. यामुळे अस्मितेचे संकट निर्माण झाले.

(३) आदिम जमातींच्या प्रदेशात वैद्यक क्षेत्रातील व्यावसायिक, अडते आणि विक्रेत्यांचा प्रवेश झाल्यामुळे आदिम जमाती त्यांच्या पारंपरिक वैद्यक शास्त्राला दुरावल्या.

(४) आदिम प्रदेशात व्यापार आणि दळणवळणाच्या विकासामुळे या प्रदेशात बाह्य प्रदेशातील बिगर-आदिवासी लोकांचा प्रवेश झाला.

(५) औद्योगिक उभारणी आणि धरण बांधणीमुळे आदिम जमातींचे त्यांच्या पारंपरिक मूलस्थानापासून विस्थापन झाले.

## प्र. १० आपले मत नोंदवा : *(प्रत्येकी ४ गुण)*

*** (१) शहरांमध्ये समुदाय ऐक्य भावनेचा अभाव का आहे?**

**उत्तर :** शहरांमध्ये समुदाय ऐक्य भावनेचा अभाव आहे; कारण—

(१) शहरांमध्ये विविध प्रांतांतून आलेल्या, विविध जाती व धर्मांचे लोक एकत्र राहतात व आपले वेगळेपण जोपासतात.

(२) शहरांमधील सामाजिक संबंध दुय्यम-औपचारिक आहेत. त्यामुळे समुदाय ऐक्य भावना वाढीस लागत नाहीत.

(३) महानगरे भौगोलिकदृष्ट्या पसरलेली आहेत. निवासाचे स्थान कामाच्या स्थानापासून लांब अंतरावर असते. निवासी क्षेत्रात व्यक्तीचे वास्तव्य दिवसातील अल्पकाळ असल्याने इतरांच्या संपर्कात ते येत नाहीत.

(४) 'फ्लॅट संस्कृती'च्या प्रसारामुळे आपल्या शेजारी कोण राहतात तेही अनेकांना माहीत नसते. प्रत्येक कुटुंब स्वकेंद्रित असते. ते समुदाय ऐक्य भावनेला पोषक नसते.

*** (२) शहरी विकासाची गरज स्पष्ट करा.**

**उत्तर :** शहरी विकासाची गरज पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल :

(१) स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण भागातून शहरी भागात लोकांचे स्थलांतर मोठ्या प्रमाणात झाले आहे. सन २०३० अखेर भारतातील बहुसंख्य लोकांचे वास्तव्य शहरात असेल.

(२) औद्योगिक उत्पादनाची चक्रे शहरी भागातच फिरतात. त्यातून रोजगारांची निर्मिती होती.

(३) राष्ट्रीय उत्पन्नात शहरी भागाचा वाटा ७०% पेक्षा अधिक आहे.

(४) जागतिकीकरणाच्या या कालखंडात टिकून राहायचे असेल तर शहरांचा विकास करणे गरजेचे आहे.

**(३) आदिम समाजात सांस्कृतिक बदल होत आहेत.**

**उत्तर :** या विधानाशी मी सहमत आहे; कारण—

(१) दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी समाजाचा अलीकडच्या काळात बाहेरील जगाशी संपर्क प्रस्थापित झाल्याने, या समाजात सांस्कृतिक परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली. त्यामुळे आदिवासी जमातीत धर्मकल्पना, वेशभूषा, केशभूषा, भाषाउच्चार, विवाहपद्धती, खाण्यापिण्याच्या पद्धती इत्यादींबाबत बदल घडून आले आहेत.

(२) ज्या आदिवासी समाजाचा हिंदू समाजाशी संबंध आला त्यांच्यावर हिंदू संस्कृतीचा प्रभाव पडल्यामुळे त्यांच्या धर्मकल्पना व श्रद्धा यांत हिंदूंच्या धर्मकल्पनांचा शिरकाव झाला. हिंदूंच्या चालीरीती, पद्धती, पोशाख, अलंकार, भाषा यांचा त्यांनी स्वीकार केला. त्यांच्या विवाहपद्धतीत हिंदूंतील बालविवाह, हुंडा या प्रथाही रूढ झाल्या.

(३) ज्या आदिवासी जमातींचा ख्रिश्चनधर्मीयांशी संबंध आला, त्यांच्यावर ख्रिश्चन धर्माचा प्रभाव वाढला. त्यामुळे त्यांच्या चालीरीती, पद्धती बदलल्या. परंपरागत धार्मिक कर्मकांड बदलले जाऊ लागले.

(४) आदिवासींचा हिंदू व ख्रिश्चन समाजांशी संपर्क आल्याने पुरुषप्रधान एकविवाह पद्धती रूढ होऊ लागली आहे. युवागृहांचे महत्त्व कमी झाले आहे.

**(४) आदिवासींना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.**

**उत्तर :** या विधानाशी मी सहमत आहे; कारण –

(१) आदिवासी समुदाय हा भारतीय समाजातील आर्थिकदृष्ट्या सर्वाधिक कमकुवत घटक आहे.

(२) प्रदीर्घ काळ मुख्य समाजाशी अलिप्त राहिल्याने, हा समुदाय निरक्षर राहिला. त्यांचे उत्पादन तंत्र मागस आहे.

(३) वेगाने कमी होणाऱ्या जंगलांमुळे आणि आदिवासींच्या जमिनींवर बिगर-आदिवासींचे आक्रमण होत असल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत केविलवाणी आहे.

(४) आदिवासींच्या निरक्षरतेचा, असाहाय्यतेचा व दारिद्र्याचा गैरफायदा घेऊन सरकारी अधिकारी, जंगल ठेकेदार व सावकारांनी त्यांचे अपरिमित शोषण केले.

**(५) शहरी भागातील कुटुंबे ही अधिक समतावादी होत आहेत.**

**उत्तर :** वरील विधानाशी मी सहमत आहे; कारण –

(१) वाढते औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यांमुळे अधिकारवादी संयुक्त कुटुंबपद्धती उतरणीस लागली आहे. त्याची जागा विभक्त कुटुंबपद्धतीने घेतली आहे.

(२) १९व्या शतकातील सामाजिक सुधारणा चळवळीनंतर २०व्या शतकात स्त्री-शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला आहे.

(३) १९व्या शतकात निरक्षर स्त्रिया आर्थिकदृष्ट्या परावलंबी असल्याने कुटुंबात स्त्रियांचे स्थान दुय्यम असे. २०व्या शतकात स्त्री-पुरुष समतेचे तत्त्व स्वीकारण्यात आले आहे. स्त्री-शिक्षणाच्या प्रसारामुळे स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आणि आपल्या अधिकारांबाबत जागरूक झाल्या आहेत.

(४) कुटुंबातील निर्णयप्रक्रियेचे लोकशाहीकरण झाल्याने, कुटुंबविषयक निर्णय घेण्यात स्त्रियांच्या सहभागात वाढ झाली आहे. मुलगा आणि मुलगी यांच्यात केल्या जाणाऱ्या भेदभावाचे प्रमाण घटले आहे. या सर्वांचा परिणाम म्हणजे आज कुटुंबे अधिक समतावादी झाली आहेत.

**(६) भारतामध्ये संयुक्त कुटुंबाचे विघटन होत आहे.**

**उत्तर :** वरील विधानाशी मी सहमत आहे; कारण –

(१) पाश्चात्त्य संस्कृतीचा सर्वत्र प्रसार झाल्याने, संयुक्त कुटुंबपद्धतीचे अस्तित्व संपुष्टात आले आहे.

(२) औद्योगिक क्रांतीनंतर रोजगाराच्या शोधार्थ ग्रामीण कुटुंबाच्या काही सदस्यांनी औद्योगिक शहरात स्थलांतर केले. त्या भागात ते स्थायिक झाल्याने संयुक्त कुटुंबाचे विभाजन झाले.

(३) ग्रामीण भागात संयुक्त कुटुंबातील रीतिरिवाजांमुळे नव्या पिढीची कुचंबणा होऊ लागल्याने ते कुटुंबाच्या बाहेर पडले.

(४) स्त्री-मुक्ती, स्त्रियांचे आर्थिक स्वावलंबन या विचारांच्या वाढत्या प्रसारामुळे संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊ लागले आहे.

(५) शहरी समाजात निवासाची जागा लहान असल्याने मुलांचे विवाह झाल्यानंतर ती स्वतंत्रपणे राहतात आणि त्यामुळे संयुक्त कुटुंब विघटित बनते.

## दीर्घोत्तरी प्रश्न

**प्र. ११ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**
**(कमीत-कमी १५० शब्द)** ***(१० गुण)***

***प्रश्न १. 'पारंपरिक समाज रूढी, परंपरा आणि श्रद्धांना अनुसरून वागणारा असतो.' वरील विधान कुटुंब अथवा धर्म व्यवस्थेच्या संदर्भाने उदाहरणे देऊन स्पष्ट करा. पारंपरिक समाजात बदल घडवून आणण्याच्या तीन मार्गांवर चर्चा करा.**

**उत्तर : (अ) पारंपरिक समाज :** भारतातील ग्रामीण समुदाय हा परंपरानिष्ठ समाज आहे. ग्रामीण समाजावर रूढी, परंपरा व श्रद्धांचा पगडा असल्याने, कालबाह्य झालेल्या परंपरा व अंधश्रद्धांच्या आधारे सामाजिक नियमन होत असते. ग्रामीण समुदायातील बहुसंख्य लोक निरक्षर किंवा अर्धशिक्षित असल्याने विवेकनिष्ठ पद्धतीने सामाजिक संस्था व व्यवहाराकडे बघण्याची क्षमता त्यांच्यात नसते. प्रस्थापित नेतृत्वाचे हितसंबंध हे सामाजिक रूढी व परंपरांशी निगडित असल्याने, त्याविरुद्ध वक्तव्य वा कृती करणाऱ्या समाजसुधारकांना सामाजिक रोषास सामोरे जावे लागले होते.

**(ब) उदाहरणे :** कुटुंब व्यवस्थेच्या संदर्भात पारंपरिक समाजावरचा रूढी, परंपरा व अंधश्रद्धांचा पगडा पुढील उदाहरणांद्वारा स्पष्ट होईल :

**(१) बालविवाह :** मध्ययुगापासून बालविवाहाची प्रथा रूढ झाली, ब्रिटिश राजवटीत व स्वातंत्र्योत्तर कालखंडात बालविवाह प्रतिबंधक कायदे करण्यात आले असले तरीही हे ग्रामीण भागात

आणि विशेषतः मागास राज्यात बालविवाह मोठ्या संख्येने होतात. बालविवाहातून बालविधवा आणि सतीची प्रथा जन्माला येते. रूपकँवरसारख्या सती प्रकरणाचे धर्माच्या नावाने उद्‌दातीकरण केले जाते.

**(२) स्त्रियांचे दुय्यम स्थान :** पुरुषप्रधान समाज आणि पितृसत्ताक कुटुंबात स्त्रियांचे स्थान दुय्यम/गौण आहे. १९व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत त्यांना शिक्षणाचा अधिकार नाकारण्यात आला. आर्थिकदृष्ट्या त्या परावलंबी होत्या आणि मनुस्मृतीसारख्या ग्रंथात शूद्रांपेक्षा स्त्रियांना हीन लेखण्यात आले होते. मनुवादी विचारांचा पगडा आजही ग्रामीण समाज आणि परंपरानिष्ठ कुटुंबांवर असणे हे दुर्दैवी वास्तव आहे. २० व्या शतकात स्त्री-पुरुष समानता सैद्धांतिक पातळीवर स्वीकारण्यात आली असली तरी स्त्रियांचे कुटुंबातील दुय्यम स्थान हे शहरी भागातील सुशिक्षित कुटुंबातील वास्तव परिस्थिती आहे.

**(३) हुंडा पद्धत :** २१व्या शतकात केवळ परंपरागत ग्रामीण समाजात नव्हे तर सुशिक्षित पांढरपेशा मध्यमवर्गीयांमध्ये हुंडा पद्धत उघड वा सुप्तपणे प्रचलित आहे. या अमानुषी पद्धतीतून मंजुश्री सारडा सारखी हुंडाबळीची प्रकरणे घडत असतात. काही उघडकीस येतात. हुंड्याची लग्नाआधी आणि लग्नानंतर मागणी करणे आणि त्यासाठी नववधूचा छळ करणे आणि अपवादात्मक प्रकरणात नववधूचे दहन करणे हा या कालबाह्य आणि अमानुषी सामाजिक रूढीचा परिपाक आहे.

**(क) समाजात बदल घडवून आणण्याचे तीन मार्ग :**

**(१) कठोर कायदे व त्यांची कसोशीने अंमलबजावणी :** बालविवाह प्रतिबंधक, हुंडा प्रतिबंधक आणि कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदे करण्यात आले आहेत. त्यांत सुधारणा करून त्यांतील पळवाटा दूर केल्या पाहिजेत. शासकीय यंत्रणेचे या कायद्यांचा भंग करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली पाहिजे. समाजाने त्यांना वाळीत टाकले पाहिजे.

**(२) सामाजिक मानसिकतेत बदल :** केवळ कायदे करून सामाजिक सुधारणा घडून येत नाही. समाजधुरिणांनी व महिलावादी संघटनांनी याबाबत समाजाचे प्रबोधन केले पाहिजे आणि समाजाची मानसिकता बदलण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत. प्रसार-माध्यमांना या कार्यात सक्रियरीत्या सहभागी करून घेतले पाहिजे. शासनाने सामाजिक प्रबोधनाच्या उपक्रमांना सर्वतोपरी साहाय्य केले पाहिजे.

**(३) शिक्षण :** शिक्षणाच्या प्रसाराद्वारा स्त्री-पुरुष समानता, सामाजिक न्याय व स्वातंत्र्य ही मूल्ये रुजवली पाहिजेत. स्त्री-शिक्षणास प्राधान्य देऊन त्यांना अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्यास प्रवृत्त केले पाहिजे. सामाजिक मानसिकतेत बदल करण्यासाठी ग्रामीण भागात प्रौढ शिक्षणाचे उपक्रम राबवून परंपरानिष्ठ मानसिकता बदलण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

**प्रश्न २. आदिवासी समुदायाची व्याख्या लिहून त्यांच्या वैशिष्ट्यांचे विवरण करा.**

**उत्तर : (अ) आदिवासी समुदायाची व्याख्या :** *राल्फ लिंटन* यांच्या मते, ''आदिवासी जमात हा टोळ्यांचा गट असतो. या समुदायातील लोक विशिष्ट प्रदेशामध्ये परस्परांच्या सान्निध्यात राहतात. त्याच्यामध्ये ऐक्याची भावना असते. ही ऐक्याची भावना समान संस्कृती, सातत्याने येणारा संपर्क आणि समान गरजांतून निर्माण होते.'' भारताच्या संविधानात आदिवासींचा उल्लेख अनुसूचित जमाती असा करण्यात आला आहे.

**(ब) आदिवासी समुदायाची वैशिष्ट्ये :** आदिवासी समुदायाची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :

**(१) भौगोलिक अलिप्तता :** विशिष्ट भूप्रदेशात राहणारा हा प्रादेशिक समुदाय आहे. त्यांचे वास्तव्य दुर्गम भागात, म्हणजेच जंगलदऱ्यांमध्ये आणि डोंगरमाथ्यावर असते. ते स्थलांतर करीत असले तरी ते विशिष्ट क्षेत्रातच स्थलांतर करतात.

**(२) आर्थिक जीवन :** आदिवासींचे आर्थिक जीवन पारंपरिक तंत्रावर आधारित असते. स्थलांतरित शेती, वनोपज गोळा करणे, शिकार आणि मासेमारी त्यांचे आर्थिक उपक्रम असत. विपणनांच्या सोयीच्या अभावी ते वस्तुविनिमय पद्धतीचा वापर करीत असत.

**(३) अस्मितेची जाणीव :** प्रत्येक आदिवासी जमात विशिष्ट नावाने ओळखली जाते. महाराष्ट्रात भिल्ल, कोळी, कातकरी, वारली इत्यादी प्रमुख जमाती आहेत. ते स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण ओळख जोपासतात. या अस्मितेमुळे ते परस्परांशी संलग्न असतात.

**(४) अंतर्विवाही समूह :** आदिवासी समुदाय विवाहसंबंध जमातीच्या आतच करणे ही प्रस्थापित रूढी आहे. ते सहसा जमातीबाहेर विवाह करीत नाहीत. विवाह हा जमातीच्या रूढी व नियमांनुसार होतो. विवाह हा करार मानला जातो. विवाह विच्छेदन आणि पुनर्विवाह निषिद्ध मानले जात नाहीत.

**(५) वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती व बोलीभाषा :** आदिवासी समुदाय रक्तसंबंधांवर आधारित गट असल्याने त्यांच्या सामाजिक रूढी, श्रद्धा व परंपरा वैशिष्ट्यपूर्ण असतात. प्रत्येक जमातीची वैशिष्ट्यपूर्ण वेशभूषा, खानपानाच्या सवयी, उत्सव व सण असतात. आदिवासींना लेखनकला अवगत नाही. मात्र प्रत्येकाची स्वतःची बोलीभाषा असते.

**(६) साधी समाजव्यवस्था :** आदिवासींचे सामाजिक संबंध कौटुंबिक व नातेसंबंधांवर आधारित, म्हणजेच प्राथमिक स्वरूपाचे असतात. त्यांच्यात सामाजिक स्तरीकरणही आढळून येत नाही, त्यामुळे उच्च-नीच हा भेदभाव नसतो.

**(७) धर्म व श्रद्धा :** जीवात्मवाद, चेतनावाद, कुलप्रतीकवाद, निसर्गवाद आणि मानावाद हे आदिवासींचे धर्म व श्रद्धास्थाने आहेत. काळ्या आणि पांढऱ्या जादूवर त्यांचा विश्वास असतो.

**(८) कुल संघटन :** प्रत्येक आदिवासी समुदाय हा रक्तसंबंधांवर आधारित असल्याने, त्यांचे गोत्र व पूर्वज समान असतात. ते रक्त-संबंधांनी एकमेकांशी संलग्न असल्याने, त्यांना आपल्या जमातीतील अन्य व्यक्तींविषयी आत्मीयता वाटते. त्यातून त्यांचा एकसंध व एकात्म समुदाय निर्माण होतो.

**(९) निसर्गपूजा :** निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या आदिवासींना निसर्गाविषयी आदरयुक्त भीती वाटते. निसर्गाला प्रसन्न राखण्यासाठी, म्हणजेच निसर्गाचा कोप होऊ नये यासाठी ते निसर्गपूजा करतात. रोगराईचे निवारण करण्यासाठी मंत्रतंत्र, जादूटोणा, बळी देणे इत्यादी मार्गांचा अवलंब करतात. मांत्रिक, तांत्रिक, भगत इत्यादी त्यांना हे उपचार करण्यात साहाय्य करतात.

**प्रश्न ३. ग्रामीण समुदायाची व्याख्या लिहून, त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

**उत्तर : (अ) ग्रामीण समुदायाची व्याख्या :** ***ए. डब्ल्यू. ग्रीन*** यांच्या मते, ''खेडे समुदाय अथवा ग्रामीण समुदाय मर्यादित भूप्रदेशात निवास करणारा लोकसमूह होय. या प्रदेशातील सर्वांची जीवनपद्धती समान असते.''

***ब्रिटानिका ज्ञानकोश*** मध्ये या संज्ञेचे विस्तृत विवरण करण्यात आले आहे. ''ग्रामीण समाजामध्ये उपलब्ध जागा आणि लोकसंख्येचे गुणोत्तर कमी असते. म्हणजेच, मोठ्या जागेत कमी लोक राहतात. अन्नधान्यांचे, तंतूंचे आणि कच्च्या मालाचे उत्पादन या ग्रामीण समाजातील प्रमुख आर्थिक उपक्रम आहेत.''

**(ब) ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये :** ग्रामीण समुदायाची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :

**(१) ग्राम समुदाय :** ग्रामीण भागामध्ये रहिवाशांच्या गरजांची पूर्तता केली जाते. ग्रामीण समुदायामध्ये ऐक्यभावना अस्तित्वात असते. स्थानिक गरजांच्या पूर्ततेवर ग्रामीण भागाचा विकास आधारित असतो.

**(२) आकाराने लहान भूप्रदेश :** ग्रामीण प्रदेशाचा आकार लहान आणि तेथील लोकसंख्येची घनता कमी असते. भारतीय संदर्भात, सुमारे ५००० लोकसंख्या असलेला समुदाय म्हणजे 'ग्राम' अथवा 'खेडे' होय.

**(३) कृषी क्षेत्राचे वर्चस्व :** ग्रामीण समुदायात कृषी व्यवसाय प्रमुख आहे. परंतु, हा उपजीविकेचा एकमेव स्रोत नसून ती एक जीवनपद्धती आहे. आपल्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील जवळपास २० टक्के वाटा हा कृषी क्षेत्राचा आहे. येथील ८० टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे.

**(४) अनौपचारिकता :** ग्रामीण समुदायात प्राथमिक संबंधांचा पगडा आहे. अनौपचारिकता, व्यक्तिगतता आणि समावेशकता असते. येथे व्यक्तीच्या हितापेक्षा सामुदायिक बांधिलकीला महत्त्व आहे.

**(५) सामाजिक एकजिनसीपणा :** ग्रामीण प्रदेशात विचार, वर्तन, पोशाख, कृती आणि जगण्यामध्ये एकजिनसीपणा असतो. परंपरा आणि रूढींना अनुसरून वर्तन करण्याची वृत्ती ग्रामीण भागात आढळते. ग्रामीण भागातील लोक परस्परांना सहकार्य करतात.

**(६) कुटुंबाला महत्त्व :** कुटुंब व्यवस्था ही ग्रामीण समुदायाच्या केंद्रस्थानी आहे. एकत्र कुटुंबपद्धती हा एकेकाळी ग्रामीण समुदायाचा आधारस्तंभ होता. आता मात्र एकत्र कुटुंबपद्धतीचे महत्त्व हळूहळू कमी झाले आहे.

**(७) स्त्रियांचे स्थान :** ग्रामीण भागातील स्त्रिया आजही पुरुषप्रधान नियंत्रणाखाली राहतात. भारतीय परंपरेनुसार स्त्रियांच्या पतिव्रता असण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. यामुळे ते स्त्रियांनीही जन्मजात कर्तव्य मानले आहे. स्त्रियांनी त्यांची पारंपरिक कर्तव्ये बजावणे अपेक्षित आहे. ग्रामीण कुटुंबात व समाजात स्त्रियांचे स्थान दुय्यम आहे.

**(८) धर्मश्रद्धा :** धर्म, देव आणि धार्मिक परंपरांवर ग्रामीण समुदायाचा प्रगाढ विश्वास आहे. प्रत्येक गावाची ग्रामदेवता असून वर्षातून एकदा गावामध्ये जत्रा किंवा उत्सव साजरा केला जातो.

**(९) जातिव्यवस्थेचा पगडा :** ग्रामीण समुदायापासून जाति-व्यवस्था अलग करता येत नाही. जातिव्यवस्था श्रेणीरचनेवर आधारित आहे. जातिव्यवस्थेमध्ये 'शुद्धता आणि अशुद्धते'च्या कल्पनांनुसार रूढी आणि धार्मिक कृती ठरतात, व्यवसायाचे स्वरूपही यावरूनच ठरते. विविध जातींमधील हे परस्परावलंबित्व बलुतेदारी व्यवस्थेमध्ये पाहावयास मिळते.

**प्रश्न ४. शहरी समुदायाची व्याख्या लिहून, त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

**उत्तर : (अ) शहरी समुदायाची व्याख्या :**

**मेरियम वेबस्टर** शब्दकोशात असे प्रतिपादन करण्यात आले आहे की, ''ज्या समाजामध्ये आधुनिक औद्योगिक स्वरूपाचे नागरीकरण झाले आहे आणि जेथील सांस्कृतिक परंपरा वैविध्यपूर्ण आहे तो समाज म्हणजे शहरी समुदाय होय.''

**(ब) शहरी समुदायाची वैशिष्ट्ये :**

शहरी समुदायाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :

**(१) बहुजिनसीपणा :** शहरी समुदायात सामाजिक व सांस्कृतिक बहुजिनसीपणा असतो. जाती, भाषा, धर्म, वर्ग आणि व्यवसायांची विविधता असते.

**(२) लोकसंख्येची अधिक घनता :** ग्रामीण समुदायाच्या तुलनेत शहरी समुदायात लोकसंख्येची घनता अधिक असते. त्याचे कारण ग्रामीण भागातील लोक शहरी भागात सतत स्थलांतर करीत असतात.

**(३) विभिन्न व्यवसाय :** शहरांत व्यवसायांचे विशेषीकरण झाले असल्याने, व्यापार, उत्पादन, व्यावसायिक व शासकीय सेवेत लोकांना रोजगार प्राप्त होत असतो.

**(४) सामाजिक गतिशीलता :** शहरी भागात वर्गव्यवस्थेचे प्राबल्य असल्याने शिक्षण व व्यवसाय महत्त्वाचे असतात. स्वबळावर व गुणवत्तेच्या आधारे व्यक्तीस आपला सामाजिक दर्जा वाढवता येतो.

**(५) दुय्यम नातेसंबंध :** शहरी समुदायात व्यक्ती-व्यक्तीतील सामाजिक संबंध औपचारिक व्यक्तिनिरपेक्ष आणि तुटक असतात.

**(६) विभक्त कुटुंबपद्धती :** नोकरी-व्यवसायाच्या कारणास्तव स्थलांतर करणाऱ्या व्यक्तींचे कुटुंब पती, पत्नी आणि त्यांची जननी इतपत मर्यादित असते.

**(७) पायाभूत सेवांची उपलब्धता :** पिण्याचे पाणी, वीज, गॅस, इंटरनेट, टेलिफोन, रस्ते व वाहतुकीच्या साधनांची उपलब्धता शहरांत अधिक असते.

**(८) औपचारिक सामाजिक नियंत्रण :** विधिनियम, पोलीस व न्याययंत्रणा ही सामाजिक नियंत्रणाची साधने आहेत.

**उपक्रम**

* • आदिम, ग्रामीण किंवा शहरी भागांतील शासनाच्या प्राथमिक अथवा आश्रम शाळेला भेट द्या. शाळेच्या मुख्याध्यापकांकडून शाळेची पटसंख्या, तिथे घेण्यात येणारे वर्ग, शिक्षकांची संख्या, शिक्षक शिकवत असलेले विषय, त्यांना शिकवताना येणाऱ्या अडचणी, त्यांच्या गरजा यांबाबत माहिती घ्या. तुम्हांला मिळालेल्या माहितीवर अहवाल तयार करा.

* • ग्रामीण पुनर्बांधणी म्हणजे काय? ग्रामीण भारतातील लोकांसाठी (१) सरकार आणि (२) स्वयंसेवी संस्थांनी सुरू केलेल्या योजनांची माहिती काढा. तुमच्या शाळेत किंवा ग्रंथालयात यावरील भित्तिचित्रांचे प्रदर्शन आयोजित करा.

NAVNEET ®

**Based on the New Textbook**




# NAVNEET ENGLISH YUVAKBHARATI Digest

## STANDARD XII

**Navneet Digest** → **Systematic Learning, Assured Success**

**• Salient features :**

1. Exhaustive coverage of all Textual lessons in the form of appropriate Activities
2. Answers/Guidance to all 'Ice Breakers' and 'Brainstorming' Activities, as well as activities given in the panels
3. Division of prose and poems into suitable extracts covering textual and additional activities with answers
4. Meanings of difficult words and phrases
5. Paraphrase and Appreciation of all the poems in simple language
6. All textual figures of speech, grammar and vocabulary topics discussed
7. New topics in writing skills like 'Mind-mapping', 'Statement of Purpose', 'Drafting Virtual Messages', etc. clearly explained
8. Easy-to-understand Synopsis of all novel extracts
9. Non-textual passages (with solutions) for study and reference

**Available from all booksellers.**

NAVNEET EDUCATION LIMITED

MW12h

Like us on /navneet.india | www.navneet.com

E0358